
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

# हाकारा

जानेवारी - जून २००६



## डॉ. इरावती कर्वे स्मृति विशेषांक

वर्ष : सत्ताविसावे
अंक : पहिला व दुसरा

Registered With the Registrar of Newspaper of India under No. 35835 / 80

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## ( द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस - मास )

मानव विज्ञान या संज्ञेमध्ये मानव, समाज, संस्कृती व पर्यावरणाशी असलेले नाते याविषयी सर्वांगीण दृष्टीने अभ्यास करणाऱ्या सर्व विद्याशाखांचा अंतर्भाव होतो. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची स्थापना १९७६ साली पुणे विद्यापीठात झाली. शासन, सामाजिक कार्यकर्ते व संशोधक यांना एका व्यासपीठावर आणून आदिवासी, ग्रामीण तसेच शहरी समाजातील लोकांच्या समस्या समजावून त्या सोडविण्यासाठी ज्ञान व अनुभवाचा उपयोग करणे हे परिषदेचे मुख्य ध्येय आहे. महाराष्ट्र राज्याचे पहिले आदिवासी सचिव - आयुक्त श्री. वसंत मंडलेकर हे संस्थेचे पहिले अध्यक्ष होत. त्यानंतर प्रा. गं. बा. सरदार, श्री जनार्दन वळवी, प्रा. पां. वा. सुखात्मे, प्रा. अ. रा. कुलकर्णी यांनी अध्यक्षपद भूषविले. आदिवासी भागात काम करणारे कार्यकर्ते तसेच आदिवासी साहित्यिक यांना महाराष्ट्रात प्रथमच परिषदेने एका व्यासपिठावर आणले.

केवळ आदिवासींच्या प्रश्नांना वाहिलेले हाकारा त्रैमासिक गेली २५ वर्षे परिषदेतर्फे प्रकाशित होत आहे. लोकांच्या समस्या त्यांच्या नजरेतून समजून, त्यांचा सहभागातून एकात्मिक विकास साधण्याची परिषदेची वैचारिक बैठक आहे. आर्थिक विकास व समता हे परिषदेचे ब्रीद आहे. आदिवासी उत्थान कार्यक्रमाव्दारे आदिवासी समाजाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आदिवासी लोकांचे सबलीकरण करणे व त्या प्रक्रियेतून त्यांचा आत्मविश्वास, आत्मसन्मान व अस्मिता जागृत करणे हा परिषदेचा दृष्टिकोन आहे. त्याव्दारे बहुविध राष्ट्रीय सांस्कृतिक प्रवाहास आदिवासी संस्कृतिच्या योगदानाच्या निरंतर संधी प्राप्त होतील.

यापुढील काळामध्ये आर्थिक परिवर्तनाव्दारे सामाजिक क्षेत्रांचा विकास घडवून आणणाऱ्या सरकारी व स्वयंसेवी संस्थाच्या सहकार्याने वाटचाल करण्याचा परिषदेचा मानस आहे. परिषदेची कार्यकक्षा अधिक विस्तृत व्हावी या हेतूने दोन केंद्रांची स्थापना केली आहे.

१. स्वास्थ्य व विकास संशोधन केंद्र        २. आदिवासी व ग्रामीण विकास केंद्र

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व**

**हाकारा** वार्षिक सभासद १०० रुपये ( व्यक्तींसाठी ) **हाकारा** वार्षिक सभासद १५० रुपये ( संस्थासाठी )
परिषद आजीव सभासद १००० रुपये (व्यक्तींसाठी )

परिषदेच्या आजीव सभासदांना हाकारा विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक / आजीव वर्गणी कृपया खालील पत्त्यावर महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद ( द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस ) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनिऑर्डर पाठवावी. मनिऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद , ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७

आपल्या क्रियाशील सहकार्याबद्दल धन्यवाद

कष्टकरी जनता, भूषण भारता। वंदन करितो पददलिता ॥
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

संपादक
रामचंद्र मुटाटकर

# हाकारा (त्रैमासिक)

कार्यकारी संपादक
ग. शां. पंडित

वर्ष : सत्ताविसावे | जानेवारी-जून २००६ | अंक: पहिला व दुसरा

## अनुक्रमणिका

डॉ. इरावती कर्वे : जीवन-वृत्तांत – प्रा. ना. गो. कालेलकर ........ २
इरावती कर्वे यांची ग्रंथसंपदा ........ ३
मानवशास्त्रज्ञ इरावती कर्वे – प्रा. रा. के. मुटाटकर ........ ४
इरावती कर्वे : चैतन्याचा एक झोत – प्रा. विद्याधर पुंडलिक ........ ११
जागतिक कीर्तीच्या संशोधक 'डॉ. इरावती कर्वे' – डॉ. ह.धी. सांकलिया, प्रा. मुटाटकर ........ १८
भारतातील जाती-पद्धतीचा खरा अर्थ जगापुढे मांडला – प्रा. रा. के. मुटाटकर ........ २०
इरावतीबाईंची गोधडी – डॉ. मिलिंद बोकील ........ २२
डॉ. इरावती कर्वे यांचे 'परिपूर्ती' मधील स्त्रीविचार –डॉ. लता छत्रे ........ २८
भारतातील नातेदारी पद्धतीचे संघटन – प्रा. रा. के. मुटाटकर ........ ३४
डॉ. इरावती कर्वे : व्यक्ती आणि वाड्.मय – डॉ. स्वाती कर्वे ........ ३७
युगान्त –महाभारतातील पात्रांचे एक मानवशास्त्रीय अवलोकन – प्रा. रा. के. मुटाटकर ........ ४१
आठवणी माझ्या आईच्या.... – डॉ. आनंद कर्वे ........ ४९
डॉ. इरावतीबाईंची एक अविस्मरणीय भेट – डॉ. म.आ. नारे ........ ५२
कानोसा आठवणींचा... – डॉ. उषा कोटबागी ........ ५४
संस्कृति म्हणजे काय? – डॉ. इरावती कर्वे ........ ५६

◆ **पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे ४११ ००७.

**छायाचित्रे**
◆ जाई निंबकर, फलटण
◆ सकाळ च्या संग्रहातून

**विशेष सहाय्य**
◆ विदुला पुरोहित
◆ डॉ.पुरुषोत्तम आगाशे
◆ डॉ. शौनक कुलकर्णी

**मुखपृष्ठ मांडणी**
सुनिल शेजवलकर

**अक्षर जुळणी**
आरती परदेशी

◆ **मुद्रक व प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

◆ **मुद्रण स्थळ**
मोनार्क प्रिंट आर्टस, पुणे ३०.

अंक मूल्य ८० रूपये

या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.



# डॉ. इरावती कर्वे : जीवन-वृत्तांत

इरावती कर्वे यांचा जन्म १५ डिसेंबर १९०५ रोजी ब्रह्मदेशात झाला. त्यांचे वडील गणेश हरी करमरकर, बर्मा कॉटन कंपनीत कामाला होते.

वयाच्या ७ व्या वर्षी त्या भारतात आल्या व हुजूरपागा शाळेतून १९२२ साली मॅट्रिक झाल्या. त्या रँग्लर र.पु. परांजपे यांच्या घरी समन्वयक शकुंतला परांजपे यांच्या बरोबर राहिल्या.

१९२६ साली त्या फर्ग्युसन महाविद्यालयातून तत्त्वज्ञान ऑनर्स विषय घेऊन बी.ए. झाल्या. त्याच वर्षी त्यांचा विवाह डॉ. दिनकर धोंडो कर्वे यांजबरोबर झाला.

त्यांनी १९२८ साली मुंबई विद्यापीठात डॉ. घुर्ये यांच्या मार्गदर्शनाखाली परशुरामबाबत दंतकथा व चित्पावन ब्राह्मण अशा दोन प्रबंधांचा अभ्यास करुन एम.ए. पदवी संपादन केली.

१९२८-३० या काळात त्यांनी बर्लिन विद्यापीठातून 'मानवी कवटीच्या भागांचे एकमेकांशी प्रमाण' या विषयावर पीएच.डी. मिळविली.

१९३१-३६ या काळात त्यांनी श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठात कुलसचिव पद भूषविले.

ऑगस्ट १९३९ मध्ये, पूर्वी बंद करण्यात आलेल्या डेक्कन कॉलेजला पदव्युत्तर संशोधन संस्था या नवीन रुपाने परत सुरु करण्यात आल्या . त्यात इरावती कर्वे यांना समाजशास्त्र विषयात प्रपाठक म्हणून निवडण्यात आले. मुंबई विद्यापीठात समाजशास्त्राचा चार पेपरचा अभ्यासक्रम होता.

१९४९ साली पुणे विद्यापीठाची स्थापना झाल्यावर, समाजशास्त्राच्या आठ पेपरचा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. त्यात प्रथम डॉ. आय.पी. देसाई व त्यानंतर डॉ. य.भा. दामले यांची व्याख्याता पदावर नियुक्ती झाली. समाजशास्त्र इतिहास विभागाच्या अंतर्गत असल्याने इरावतीबाईंना उत्खननात भाग घेता आला.

१९५८ साली योजना आयोगाच्या कार्यक्रम मूल्यमापन समितीने केंद्रीय समाजकल्याण बोर्डाच्या मूल्यमापनाची जबाबदारी श्रीमती दुर्गाबाई देशमुखांच्या शिफारशीनुसार इरावतीबाईंवर सोपविण्यात आली.

१९५९ साली कॅलिफोर्निया, बर्कले विद्यापीठात त्यांना अभ्यागत प्राध्यापक म्हणून पाचारण करण्यात आले.

त्यांच्या महाभारतावरील युगान्त ग्रंथास १९६८ साली साहित्य अकादमीचे गौरव बक्षिस मिळाले.

त्यांचे १०-११, ऑगस्ट १९७० च्या रात्री झोपेत हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

■ प्रा. ना. गो. कालेलकर

# इरावती कर्वे यांची ग्रंथसंपदा

## मराठी

- **परिपूर्ती**, आत्माराम प्रिंटर्स, बडोदा, मूल्य १ रु., प्रथम आवृत्ती १९४९. देशमुख आणि कंपनी, पुणे, द्वितीय आवृत्ती-१९४९. पुनर्मुद्रित प्रथमावृत्ती-१९५३., दहावी आवृत्ती- १९९०.
- **मराठी लोकांची संस्कृती**, देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथम आवृत्ती १९५१.
- **आमची संस्कृती**, देशमुख आणि कंपनी, पुणे, १९६०
- **भोवरा**, देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथम आवृत्ती १९६०-चतुर्थावृत्ती १९७५.
- **हिंदूंची समाजरचना**, नागपूर विद्यापीठ, नागपूर, १९६७
- **युगान्त**, देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती १९६४-अकरावी आवृत्ती १९९८.
- **महाराष्ट्र : एक अभ्यास**, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९७१.
- **धर्म**, देशमुख आणि कंपनी, पुणे, १९७१.
- **गंगाजळ**, देशमुख आणि कंपनी, पुणे प्रथमावृत्ती-१९७२, द्वितीयावृत्ती १९७७.
- **संस्कृती**, देशमुख आणि कंपनी, पुणे, १९७२.
- **हिंदू समाज: एक अन्वयार्थ**, १९७५.

## इंग्रजी

- **Anthropometric measurements of Maharashtra**, Deccan College Monograph Series 8-1-134, 1951. (With Dandekar V.M.)
- **Kinship Organization in India**, Deccan College Monograph Series No. 11, 1-304, II Edi.-1953, Asia Publishing House, 2nd April 1965, 3rd Edi. 1968.
- **Bhils of West Khandesh: A Social and economic survey.** Published by the Anthropological Society of Bombay 1-85, 1958. The Tribals of Maharashtra 1 to 7., 1958.
- **Hindu Society : An Interpretation,** Poona Revised II Edi. Deshmukh Co., Poona, 1961.
- **Group Relations in Village Community,** Deccan College Monograph Series No. 24, 1-483, 1963.
- **Maharashtra Its land and people** of Govt. of Maharashtra Gazzetters Department, Bombay 1-197, 1969.
- **Yuganta-The end of an epoch,** Deshmukh and Compnay, Poona, 30, 1969.
- **A Survey of the people displaced through the Koyna Dam**; Deccan College Building Centenary and Silver Jubliee Series No. 61, 1969. (With Jai Nimbkar)
- **The role of weekly markets in the tribal, rural and urban setting.** Deccan College Building Centenary and Silver jubliee Series No. 70, 1970. (With Hemlata Acharya)



# मानवशास्त्रज्ञ इरावती कर्वे

**एकदा इरावतीबाई म्हणाल्या होत्या की, "आपल्याला जीवनात कोणीही दगा देऊ शकतो. आपले सहकारी, आपले कुटुंबीय, पती, पत्नी. परंतु आपले काम आपल्याला कधीच दगा देणार नाही, ते निष्ठापूर्वक सदैव तुमच्या पाठीशी उभे राहील."**

साधारण ३० वर्षांपूर्वी जगद्विख्यात मानवशास्त्रज्ञ विदुषी मार्गारेट मीड मुंबईस आल्या होत्या. भारतीय समाजविज्ञान संशोधन परिषदेने (ICSSR) त्यानिमित्त एका कार्यशाळेचे आयोजन केले होते. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (SNDT) विद्यापीठाने मार्गारेट मीड यांना सन्माननीय डी.लिट् पदवी बहाल करण्याचा विशेष पदवीदान समारंभ घडविला. मुंबईच्या उच्चभ्रू, सुविद्य, सालंकृत महिलांनी मार्गारेट मीड या विदुषीची एक महिला म्हणून खूप स्तुती केली. त्याच्या उत्तरदाखल त्रिशूळाच्या आकाराच्या आदिवासी भागातील उंच काठीचा आधार घेऊन उभ्या राहणाऱ्या, चालणाऱ्या मार्गारेट मीड यांनी पहिल्याच वाक्यात मी महिला नाही. मी एक मानवशास्त्रज्ञ आहे, (I am not a woman, I am an anthropologist) असा सलामीचा टोला दिला. इरावती कर्वे त्याच पंथातल्या होत्या.

मी इरावतीबाईंना प्रथम पाहिले ते फेब्रुवारी १९५९ साली, एम.ए. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी म्हणून, कलकत्याच्या भारतीय सांख्यिकी संस्थेत समाजशास्त्र परिषदेत. डॉ. लीला दुबे या माझ्या शिक्षक व माझ्या काकी डॉ. सुमती मुटाटकरांच्या धाकटया भगिनी. सागर विद्यापीठात प्रा. शामाचरण दुबे या प्रख्यात सामाजिक मानवशास्त्रज्ञाच्या त्या पत्नी. आम्हा सागर विद्यापीठातील विद्यार्थ्यांना प्रा. दुबे यांनी अखिल भारतीय समाजशास्त्र परिषदेत नेले. तेथे डॉ. लीला दुबे यांनी मला विचारले की 'या उंच बाई कोण आहेत माहीत आहे का?' डॉ. लीलाजी या फारच ठेंगण्या आहेत. माझी प्रश्नांकित मुद्रा बघून त्यांनी सांगितले, या 'इरावती कर्वे'.

आम्ही विद्यार्थी म्हणून त्यांचे नातेदारी-किनशिपचे पुस्तक अभ्यासले होते. शिवाय मराठी मानवशास्त्रज्ञ म्हणूनही कौतुक, आदर वाटला. इरावतीबाई आपल्या समवयस्क, समख्यातीमान शास्त्रज्ञांत मशगूल होत्या. परिषदेत मी ग्वाल्हेरच्या एका खेडेगावातील जातीवाचक राजकारण व गटबाजीवर एक निबंध सादर केला. एम.ए. झाल्या क्षणी सागर विद्यापीठात एक वर्ष प्राध्यापकी करण्याचा योग आला. त्यानंतर मला पुणे विद्यापीठात सामाजिक/ सांस्कृतिक मानवशास्त्राचा व्याख्याता म्हणून अर्ज करण्यास प्रा. शामाचरण दुबे यांनी सांगितले. १९६० च्या उन्हाळ्यात, माझी मुलाखत घेण्यासाठी इरावतीबाई नव्हत्या. कारण त्या बर्कले येथे मानद प्राध्यापक म्हणून गेल्या होत्या. डॉ. य.भा. दामले हे मुलाखतीसाठी विभागप्रमुख म्हणून हजर होते. इरावतीबाईंनी माझ्या नेमणुकीची शिफारस पत्राद्वारे कुलगुरु प्रा. डी.जी. कर्वे यांना केली होती. याप्रमाणे मी पुणे विद्यापीठात जुलै १९६० मध्ये डेक्कन कॉलेज

येथे व्याख्याता म्हणून रुजू झालो. त्यावेळी मानवशास्त्राचा स्वतंत्र अभ्यासक्रम पुण्यास नव्हता. समाजशास्त्रांतर्गत मानवशास्त्राचे काही अभ्यासविषय (Paper) होते. बाई सप्टेंबर १९६० मध्ये अमेरिकेहून परतल्या.

त्यानंतर मी सहकारी व माझे प्रा. गुलाटी यांनी मानवशास्त्राचा स्वतंत्र अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत बाईंकडे लकडा लावला. त्याप्रमाणे १९६३ साली महाराष्ट्रात केवळ पुणे विद्यापीठात मानवशास्त्राचा अभ्यासक्रम सुरु झाला. बाईंनी विद्यापीठाचे रजिस्ट्रार श्री. गोळे यांना पत्र लिहून अभ्यासक्रमाबाबत मी व माझे सहकारी प्रा. गुलाटी या दोघांची पत्रावर सही असल्यास त्यांची 'सही आहे' असे गृहित धरण्याबाबत सांगितले. असा उदंड विश्वास व जबाबदारी त्यांनी आमच्यावर टाकली. अर्थात, त्यावेळी विद्यापीठ हे शिकविण्यासाठी व डेक्कन कॉलेज हे संशोधनासाठी असे विभाजन मानले जाई.

इरावतीबाईंचे संशोधन हे पुरातत्वविज्ञान, भाषाविज्ञान, शारीर मानवशास्त्र, संस्कृती समाज, यांच्या मिश्रणातून म्हणजेच पारंपरिक मानवशास्त्राच्या अंगाने होत असे. तसे पोषक वातावरण डेक्कन कॉलेज पदव्युत्तर संशोधन संस्थेत डॉ. कत्रे, डॉ. सांकलिया, डॉ. शंकरन व डॉ. इरावती कर्वे यांच्या शास्त्रीय साहचर्यामुळे निर्माण झाले होते. इरावती कर्व्यांच्या संशोधनातील खोली ही डॉ. कत्रे व डॉ. सांकलिया यांच्या मदतीने निर्माण झाली. तसेच, घरी त्यांना त्यांच्या पतीचे छत्र मिळाले, हे त्यांनी स्वत: मान्य केले आहे. मलाही त्यांनी हे एका प्रसंगाच्या ओघाने सांगितले.त्यांची नातेदारी संघटनेच्या पुस्तकाची, पतीच्या मस्तकावर डोके ठेवून आशीर्वाद मागणारी, 'अर्पणपत्रिका' ही त्याची द्योतक आहे. (शेवटी दिली आहे.)

त्यांचे ललित साहित्य म्हणून शिक्कामोर्तब झालेले मराठी लेखन हे सामान्य जनांकरिता लिहिलेले सोप्या भाषेतील मानवशास्त्र आहे. युगान्तमधील व्यक्तिचित्रे संस्कृती व व्यक्तिमत्त्व या मानवशास्त्रातील सिद्धांतावर आधारभूत आहेत. त्या त्या वेळची संस्कृती व समाज कुटुंबसंस्थेमार्फत व्यक्तिमत्त्व घडवीत असतो. महाभारत काळात शाश्वत मूल्यांची जपणूक करताना व्यक्तीस्वार्थ, संघर्ष हा अटळ होता असे चित्र उभे राहते. त्याची मीमांसा याच अंकात पुढे आली आहे. मानवशास्त्रात अभ्यासाची दोन् तत्त्वे आहेत. ज्यांचा अभ्यास करावयाचा त्यांच्या नजरेतून वस्तुस्थितीचे विश्लेषण करणे. त्यांची नजर म्हणजे व्यक्तिमत्व हे इतिहास, भूगोल, संस्कृती घडवीत असते.

द्रौपदीने राजदरबारात विचारलेला प्रश्न आजच्या मूल्यातून आपणास महान वाटतो. तसा तो इरावतीबाईंना त्या काळच्या व्यवहारातून वाटत नाही. एका बाजूला पितृप्रधान समाजातील स्त्रीचे गौण स्थान त्यांना समजते. तद्वतच त्या समाजात सगळ्यांनी, कृष्णाने सुद्धा द्रौपदीचे कर्णास प्रलोभन दाखवून, स्त्रियांना हीन वागणूक दिली, याबाबत इरावतीबाईंच्या मानवशास्त्रात आश्चर्य वाटत नाही. मानवशास्त्र विज्ञान असल्याने त्यास साहित्यासारखी विशेषणे वापरण्यास मनाई आहे. आश्चर्य नसते, वस्तुस्थिती असते व त्यास काही कारण असते. साहित्यात लेखकांच्या व्यक्तीगत विचारास, विश्लेषणास वाव असतो, शास्त्रात तो नसतो. इरावतीबाईंच्या मराठी लेखनात मानवशास्त्रीय त्रयस्थ विश्लेषणाबरोबर त्यांच्या व्यक्तीगत विचारांची झालर आहे, म्हणून ते लेखन वेगळे आहे.

भारतीय व जगातील आदिवासी आणि इतर तत्सम शेतकी समाज नातेदारी संघटनेत बांधलेले असल्याने मानवशास्त्रात, आदिवासी व शेतकी समाजाची चर्चा नातेदारी संबंधात गुरफटलेली असते. आजही जवळच्या ठाणे जिल्ह्यातील जव्हार-मोखाडा येथील आदिवासी खेड्यातील विवाहसंबंध गावात किंवा १५-२० किलोमीटरच्या

परिघातच होतात. आते-मामे बहिणभावंडांचे समाजमान्य विवाह जवळच्या नातेदारी समाज-संघटना दर्शवितात. लोकांचा पिंड, त्यांचे आकलन, नवीन आचार-विचार घेण्याची क्षमता नातेसंबंधात अडकून पडते. इरावतीबाईंनी जातीस प्रत्यक्ष नाती-गोती असणारा किंवा तशी नाती प्रस्थापित होण्याची शक्यता असणारा समूह म्हटले ते यासाठीच. (Caste is a group of actual or potential kin) शहरीकरण, नागरीकरणामुळे जातींचा पारंपरिक व्यवसायाशी संबंध तुटला तरी निवडणुकीच्या राजकारणात जातीचे महत्त्व व त्यानुसार राजकीय, आर्थिक, सामाजिक जुळवाजुळव कायम आहे.

डार्विनच्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतानंतर सामाजिक संस्थांच्या उत्क्रांतीबाबत शास्त्रीय विचार पुढे आला. स्पेन्सर, मॉर्गन या मंडळींनी कुटुंब, विवाह, धर्मसंस्था इ. च्या उत्क्रांती बाबत प्रमेय मांडली. त्याचा उपयोग मार्क्स व एंजल्सने साम्यवादाच्या उत्क्रांतीविषयक सिद्धांत मांडताना केला. त्यातून आदिवासींचे सहकारी जीवन किंवा मालमत्तेची सामायिक मालकी यास आदिम साम्यवाद नामकरण झाले. मॉर्गनचे पुरातन समाज (Ancient Society) ग्रंथाची रशियन आवृत्ति अमेरिकन आवृत्तिपेक्षा स्वस्त दरात उपलब्ध आहे.

१९ व्या व २० व्या शतकातील पहिल्या दोन दशकातील मानवशास्त्रज्ञ पाश्चिमात्य असल्याने त्यांनी इतर समाजांचा, विशेषत: बेटांवरील व भौगोलिक अलगतेत शतकानुशतके राहणाऱ्या आदिवासींचा अभ्यास केला व त्यातून संस्कृतीबाबत सिद्धांत मांडले, जे आजही मौलिक आहेत. एवढेच की, त्यात स्थिर समाज-संस्कृतीचा विचार आहे, परिवर्तनशीलतेचा नाही. मानवशास्त्र म्हणजे एका बाजूने आदिवासी व दुसऱ्या अंगाने वंश, मानवसमूहांचे शारीरशास्त्रदृष्टया वैविध्य किंवा साम्य, मानवप्राण्याची व त्याच्या समाजसंस्थांची उत्पत्ती व उत्क्रांती अशी व्याप्ती आहे. इरावतीबाईंनी आदिवासींचे पारंपरिक मानवशास्त्रीय अध्ययन नाही केले. पश्चिम खानदेशातल्या भिल्लांबाबत त्यांनी सामाजिक-आर्थिक पाहणीवजा एक प्रकल्प केला पण ते केवळ सांख्यिकी सर्वेक्षण होते. मानवशास्त्रात इतर समाजांचा, त्यातल्या त्यात आदिम किंवा पारंपरिक शेतकी समाजाचा अभ्यास करण्याकडे कल होता. शेतकी समाजाचा अभ्यासही बराच उशीरा सुरु झाला.

त्रिं.ना. आत्रे यांचे मराठीतील गावगाडा पुस्तक ९० वर्षापूर्वी प्रसिद्ध झाले. परंतु भारतीय खेडेगावांच्या पहिला मानवशास्त्रीय वर्णनात्मक ग्रंथ, प्रा. शामाचरण दुबे यांचा इंडियन विलेज (Indian Village) हा १९५५ साली प्रसिद्ध झाला. भारतासारख्या खंडप्राय देशाची संस्कृती-समाज किंबहुना भारतीय सभ्यतेचा अभ्यास करण्याची प्रवृत्ती नव्हती. आदिवासींचा इतिहास मौखिक असतो, त्याचा भौगोलिक विस्तार फारसा नसतो. भारतासारख्या देशाची परंपरा ग्रंथोक्य आहे. इतिहास व पुराणांची सरमिसळ झाली तरी त्यास भाषाशास्त्र, पुरातत्त्व विज्ञानात पुरावा आहे. इरावतीबाईंनी आदिवासी किंवा शेतकी समाजाच्या खेड्यांवर वर्णनात्मक पुस्तके लिहिली नाहीत; पण भारतीय समाज-संस्कृतीचा गाभा असणाऱ्या नातेदारी-जाती व्यवस्थेबाबत मानवशास्त्रीय विश्लेषण केले. तसेच महाभारताचे विश्लेषण करुन ऐतिहासिक वारसा व भारतीय मूल्यांची चर्चा केली. ते करताना कायम महाभारता नंतरच्या बौद्ध-जैन विचारांशी तुलना केली. भिल्लांच्या पाहणीतही त्यांनी भिल्ल समाज-संस्कृतीची तुलना कायम सपाटीवरील शेतकी जातीनिष्ठ समाजाशी केली.

आज, मानवशास्त्रात भारताबाहेरील दुसऱ्या समाजांचा अभ्यास करण्याची गरज भारतात तरी वाटत नाही. पाश्चिमात्य मानवशास्त्रज्ञ आजही अफ्रिकन देशात किंवा नेपाळ, भूतान्सारख्या देशात संशोधनासाठी जातात.

भारीतय विद्यापीठात, पुणे विद्यापीठातही अजूनही वस्तुनिष्ठ, त्रयस्थ दृष्टिकोन विद्यार्थ्यांत बाणविण्यासाठी आदिवासी समाजाचा, खेड्याचा अभ्यास करावयास विद्यार्थ्यांना नेण्यात येते. लोकसंख्या विचारली असताना मतदारांची संख्या सांगणाऱ्या जातीनिष्ठ शेतकी समाजापेक्षा आदिवासी समाज अध्ययनासाठी सोपा समाज आहे. परंतु जेव्हा आदिवासी विद्यार्थी मानवशास्त्राच्या वर्गात शिकण्यासाठी येतो, तेव्हा त्याला आपल्या समाजाचा विकास, प्रगती कशी करावयाची याचा ध्यास असतो. केवळ नातेदारी किंवा धर्मकल्पनांचा, आचार-विचारांचा वर्णनात्मक अभ्यास करावयाचा नसतो.

इरावतीबाईंना अनुप्रयुक्त मानवशास्त्रात रस नव्हता, तरी त्यांना त्याचे महत्त्व माहिती होते. त्यांनी मला पुण्याच्या सैनिकी वैद्यकीय महाविद्यालयात सामाजिक वैद्यकावर व्याख्याने द्यावयास पाठवले व तो क्रम ३० वर्षे चालला. त्यामुळे बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयातही मानवशास्त्र व सामाजिक वैद्यक हा विषय रूजला. त्यातून कुष्ठरोगावर सामाजिक मानवशास्त्रीयदृष्टया संशोधन झाले व वैद्यक मानवशास्त्र ही उपशाखा भारतात लोकप्रिय झाली. हिंदू समाज-एक विश्लेषण (हिंदू सोसायटी) या पुस्तकातील शेवटचे ७ वे प्रकरण भारतातील सदय सामाजिक परिस्थितीवर लिहिले आहे. त्यात अनुसूचित जाती-जमातीविषयक आरक्षणाचे धोरण, हिंदू विवाह कायदा, भाषाविषयक प्रश्नांचा व देशाच्या ऐक्याबाबत त्यांनी उहापोह केला आहे. त्यांच्या मते आरक्षण आर्थिक निकषांवर करावयास हवे. सामाजिक निकषांवर केल्याने, जातीनिष्ठ नवीन घरवसाहती निर्माण केल्याने, अलगपणा कायम राहतो व तो देशाच्या ऐक्यास घातक ठरु शकतो असा त्यांचा विचार आहे. त्यांनी महाराष्ट्र शासनाकरिता महाराष्ट्र-प्रदेश व लोक हा एक गॅझेटिअर ग्रंथ लिहिला. तो उत्तम संदर्भ ग्रंथ आहे.

महाराष्ट्रात इरावतीबाई त्यांच्या मराठी लेखन-साहित्यामुळे प्रसिद्ध आहेत. परंतु जगात त्या त्यांच्या भारतातील नातेदारी व्यवस्थेवरील पुस्तकामुळे मानवशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत. भारतातील जाती व्यवस्थेचा उलगडा जगातील विद्वानांना करता आला नाही, मार्क्सलाही तो जमला नाही. भारतात जाती मोडण्यासाठी जे संप्रदाय निर्माण झाले ते स्वत: जातीरुपाने व्यवहारात मान्यता पावले. अशा जातींचा सोपा संबंध नातेदारीशी इरावतीबाईंनी लावला. 'अंतर्विवाही जात म्हणजे नात्यागोत्यांचा एक गट' हीच ती सोपी व्याख्या. आज बरेच कुलवृत्तांत प्रकाशात येतात. पितृप्रधान व पितृनिवासी समाजात, एका कुळातील, परिवारातील सुना-मुलींच्या द्वारे होणाऱ्या नातेसंबंधांचा शोध वंशावळी तयार करुन घेतला तर एका जातीची नातेव्यवस्था संपूर्णपणे लक्षात येते. विवाह ही राजकीय किंवा व्यापारी सोयरिक असू शकते. नवीन राजकीय लोकशाही प्रणालित, अर्थव्यवस्थेत, आपला सत्तेतील प्रभाव वाढविण्यासाठी जातींचे समीकरण व्हावयास लागले आहे.

जातींचे विघटन व समीकरण या विषयावर मानवशास्त्र-समाजशास्त्रज्ञांचे विपुल लेखन आहे. कुटुंब, विवाह व सामाजिक संघटनेचा अभ्यास करण्यासाठी मानवशास्त्रात वंशावळी पद्धतीचा उपयोग करण्यात येतो. इरावतीबाईंनी युगान्तमध्ये महाभारतातील नातेदारी व युद्धातील समीकरण लिहिली तर आहेच, त्याबाबतच्या वंशावळ्याही दिल्या आहेत.

पारंपारिक मानवशास्त्र म्हणजे मानवाचा सर्वांगीण अभ्यास. मानवशास्त्र म्हणजे मानवाचा आरसा-मिरर फॉर मॅन सामान्य लोकांसाठी लिहिलेल्या विज्ञानातील सर्वोत्तम म्हणून गौरविलेल्या या प्रसिद्ध पुस्तकाचे लेखक प्राध्यापक क्लाईड क्लकहॉन यांचा ऋणनिर्देश इरावतीबाईंनी हिंदू सोसायटी पुस्तकाच्या प्रस्तावनेत आवर्जून

केला आहे. इरावतीबाईंनी मानवशास्त्रज्ञ म्हणून मानवशास्त्राच्या सर्व उपशाखा-सामाजिक, सांस्कृतिक, शारीरमानवशास्त्र, पुरातत्त्वविज्ञान, भाषाविज्ञान यांचा त्यांच्या अध्ययनात, लेखनात ठसा उमटवला आहे. आता असा समन्वय बांधू शकणारा विद्वान जगात नाही. तसे करावयाचे झाल्यास एक गट (टीम) म्हणूनच काम करावे लागेल. त्यादृष्टीने बघितल्यास इरावती कर्वे या भारतातील शेवटच्या पारंपरिक मानवशास्त्रज्ञ होत.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद - महाराष्ट्र असोसिएशन ऑफ एन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस या स्वयंसेवी संशोधन संस्थेची मुहुतमेढ नोव्हेंबर १९७५ मध्ये विद्यापीठात समाजविज्ञान संशोधन पद्धतीवरील भरलेल्या कार्यशाळेत रोवण्यात आली. त्यात महाराष्ट्रातील समाज विज्ञान शिकविणारे बहुसंख्य ज्येष्ठ प्राध्यापक हजर होते. आदिवासी प्रशासनात कार्यरत असणारे काही शासकीय अधिकारी व काही आदिवासी समाजात काम करणारे कार्यकर्तेही हजर होते. रीतसर औपचारिक नोंदणी मे १९७६ मध्ये झाली.

'हाकारा'चा पहिला अंक १ जानेवारी १९८० साली संस्थेचे अध्यक्ष प्रा. गं. बा. सरदार यांच्या प्रेरणेने पुण्यातील केळकर वस्तुसंग्रहालयाचे काका केळकर यांच्या हस्ते १ जानेवारी १९८० साली टिळक स्मारक मंदिरात झाला. हाकारा'ची धुरा जगदीश गोडबोलेने समर्थपणे व जिद्दीने स्वीकारली. काका केळकरांना आपल्या संग्रहालयात आदिवासी दालन मांडण्याची प्रबळ इच्छा होती म्हणून हाकारावर व आमच्यावर प्रेम होते.

इरावतीबाईंचे ११ ऑगस्ट १९७० ला अकस्मात निधन झाल्याने डेक्कन कॉलेजात व पुणे विद्यापीठात मानवशास्त्रास पोरकेपण प्राप्त झाले. १९६३ साली जरी मानवशास्त्राचा स्वतंत्र अभ्यासक्रम पुणे विद्यापीठात सुरु करण्यात आला, तरी स्वतंत्र विभाग नसल्यामुळे विद्यापीठाच्या प्रशासकीय व आर्थिक व्यवस्थेशी, विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासन, तसेच भारत सरकारच्या मानवशास्त्र सर्वेक्षण विभागांशी थेट संबंध येत नव्हता. योगायोगाने, महाराष्ट्रातील प्राध्यापकांनी, समाजविज्ञानांतर्गत विद्वत संस्थेची गरज असल्याने, आम्हा १९७५ सालच्या कार्यशाळेच्या संघटकांना याबाबत पुढाकार घेण्याची त्यांनी मागणी केली.

मानवशास्त्र मानवाचा सर्वांगीण अभ्यास करणारे विज्ञान असल्याने, मानवाचा वेगवेगळ्या अंगांनी अभ्यास करणारी शास्त्रे एन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस या बहुवचनी संस्थेत सामावू शकतात, असा आम्ही विचार मांडला व तो सर्वमान्य झाला. आंतरराष्ट्रीय पातळीवर मानवशास्त्राच्या विद्वत संस्थेचे व संमेलनाचे नावही बहुवचनी आहे. त्यामुळे त्यात मानवाशी निगडीत सर्वच शाखांचे विद्वान सहभागी होतात. आता तर वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, शरीरशास्त्र, वैद्यक इ. शास्त्रात मानवाशी या शास्त्रांचा संबंध लक्षात घेऊन वेगवेगळ्या उपशाखा निर्माण झाल्या आहेत., जसे एथ्नोबॉटनी, एथ्नोफिजियॉलॉजी (Ethnobotony, Enthrophysiology, Ethno-science). आधुनिक युगात प्रत्येक विषयात विशिष्टीकरण किंवा सर्वोत्तम होण्याची प्रतियोगिता.

वाढत असताना मानवाचा सर्वांगीण विचार करणाऱ्या मानवशास्त्रासारख्या एकात्मिक विज्ञानाची गरज लक्षात येते. एरवी विज्ञानाची, तंत्रज्ञानाची, उत्पादनाची वाढ व आर्थिक विकास होत असताना, विकासाच्या यंत्रणेतील मानव केवळ एक पुर्जा, साधन (Tool) बनून राहतो आणि गरीब-श्रीमंत देशांतील व लोकांमधील विषमतेची दरी वाढत राहते.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या समितीने विद्यापीठाच्या पंचवार्षिक योजनेबाबत भेट दिलेली असताना मानवशास्त्रास विद्यापीठात स्वतंत्र विभागाचा दर्जा द्यावा, अशी शिफारस केली होती. त्याबाबत, त्यांची

इरावतीबाईंशीही चर्चा झाली होती व आम्हा तरुण प्राध्यापकांच्याही मुलाखती झाल्या. मुंबईच्या टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचे संचालक प्रा. माधवराव गोरे यांनी आयोगातर्फे यात पुढाकार घेतला. परंतु मानवशास्त्र विभाग विद्यापीठात स्थापन होण्यास इरावतीबाईंच्या निधनानंतर तब्बल ७ वर्षे लागली व तो सुदिम १२ ऑगस्ट १९७७ आला. ज्यादिवशी माननीय कुलपती, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांनी संबंधित दस्तावैजावर सही केली. तत्पूर्वी, इरावतीबाईंच्या निधनानंतर व डेक्कन कॉलेजचे संचालक डॉ. सुमित्र मंगेश कत्रे व डॉ. हंसमुख सांकलिया यांच्या कारकीर्दीनंतर समाजशास्त्र व मानवशास्त्र हा संयुक्त विभाग १९७३ च्या शैक्षणिक सत्राच्या आरंभी विद्यापीठात हलविण्यात आला. त्यास त्यावेळेचे कुलगुरु रँग्लर महाजनी यांनी भरीव मदत केली.

१९७६ साली महाराष्ट्र मानव-विज्ञान परिषदेची स्थापना व १९७७ साली पुणे विद्यापीठात स्वतंत्र मानवशास्त्र विभागाची स्थापना झाल्याने इरावतीबाई गेल्यावर पोरके झालेले मानवशास्त्र पुन्हा जोमाने कार्यरत झाले. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेत अलिकडे प्रामुख्याने वैद्यक मानवशास्त्र व आदिवासी विकास यावर संशोधन चालते. 'हाकारा' आदिवासीविषयक अभ्यासास वाहिलेले त्रैमासिक आता प्रकाशनाच्या २७ व्या वर्षात आहे. संस्थेचा रौप्यमहोत्सव सन २००१ साली साजरा झाला परंतु हाकारा'चा रौप्यमहोत्सव अजून साजरा करावयाचा आहे.

एकंदर भारतीय समाजाच्या, महाराष्ट्राच्या अध्ययन-संशोधनातील इरावतीबाईंची समग्रता, एकाग्रता व उंची आम्ही गाठू शकत नाही; परंतु त्यांच्या विचाराची दिशा आम्हाला मानवशास्त्राचे अभ्यासक म्हणून उमजले आहे. आधुनिक काळाचे, गरीब जनतेच्या आकांक्षा, समस्यांचे भान राखून आमच्या मानवशास्त्राच्या ज्ञानाचा, अनुभवांचा आणि संस्थेचा उपयोग अनुप्रयुक्त मानवशास्त्राच्या दिशेने चालू राहील.


इरावती कर्वे यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, (द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ एन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) व हाकारा तर्फे मानवशास्त्रज्ञ इरावती कर्वे यांना अभिवादन. त्यांच्या स्मृती आम्हास कायम प्रेरणा देत राहतील. आम्हास त्यांची माया व आशीर्वाद लाभले हे आमचे परमभाग्य.

**प्रा. रा. के. मुटाटकर**
**संपादक**

१ जानेवारी २००६


---

किनशीप ऑर्गनायझेशन इन इंडिया या ग्रंथातील हीच ती अर्पणपत्रिका.


KINSHIP ORGANISATION IN INDIA

BY

Mrs. IRAWATI KARVE, M.A. (BOMBAY), PH.D. (BERLIN)
Reader in Sociology, Deccan College
Post-graduate and Research Institute, Poona


TO
MY HUSBAND

While dedicating to you this book which would never have been either thought out or written but for you, let me express my feelings in the traditional Hindu manner:

I PLACE MY HEAD ON YOUR FEET
AND ASK FOR YOUR BLESSING

# इरावती कर्वे : चैतन्याचा एक झोत

## प्रा. विद्याधर पुंडलिक

अगदी सहज जाता जाता जरी ज्या माणसांची इरावतीबाईंशी ओळख होई ती सारी माणसं चमकून जायची. हे काम साधेसुधे नाही, एकदम वेगळे, विलक्षण आहे असे त्यांना वाटत रहायचे.

आणि असे वाटावे असे इरावतीबाईंचे सर्व काही होते. खरोखरच सर्वार्थाने त्यांचे व्यक्तिमत्त्व जबरदस्त होते. अविस्मरणीय होते !

सहसा बाईमाणूस असत नाही (खरे म्हणजे पुरुषमाणूसही) इतक्या त्या उंच होत्या. बांध्याने थोराड होत्या. त्यांचे हात-पाय लांबट अन् पंजाही रुंद बळकट होता. नाक मोठे पण उंच अन् धारदार होते. त्यांच्या सासूबाई त्यांना दीपमाळ म्हणत-आणि हे वर्णन खास सासूचे असले तरीही-बरोबर होते, यात शंका नाही ! पण इतके असूनही जे फक्त स्त्रीचेच असू शकते असे त्यांचे रुप होते. त्यांची कांती अस्सल केतकी. त्या गोरेपणात एक झळाळी होती. अन् पासष्टी ओलांडून आणि दोन हार्ट -ॲटॅक्समुळे आलेले कृशपण येऊनही ती कायम होती. डोळे निळे, चकचकीत अन् तेज होते. (माधव ज्यूलियननांनी ते आपल्या कवितेत आणले आहेत.) त्यात एक सावध जरब असे. ओळखीचे किंवा आवडते माणूस समोर आले की ती जरब चटकन विरघळायची. डोळे बारीक होऊन प्रेमाने आणि मनमोकळेपणाने हसायचे. पण एरवी मात्र लोकांना आपल्या जीवनरेषेबाहेर चार हात दूर ठेवण्याइतके



करारीपण त्यांच्या त्या निळ्या घाऱ्या डोळ्यात होते. (त्या गेल्या तेव्हा त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी मी गेलो होतो. त्यांना पाहिल्यावर मला जाणवले की मरणाचा घाव त्यांच्या सौंदर्याने शांतपणे झेलला आहे. डोळे मिटले होते; पण वर्ण तसाच लखलखीत होता. अहेवपणी गेल्या म्हणून कुणीतरी ठसठसीत अधेली एवढे कुंकू लावले होते. तेही खुलून दिसत होते. मरणाच्या अवकळेची पुसटशी सावली सुद्धा त्यांच्या चेहऱ्यावर नव्हती. तिथे आलेल्या बऱ्याच जणांप्रमाणे मलाही या गोष्टीचे एक शांत समाधान वाटले.)

बाईमाणूस असले की ती कुठेतरी दुबळी असते. तिच्या रसायनातला एक कुठलातरी ठिपका दुबळा राहतो. थोडे मनाविरूद्ध झाले, भावनेचा अवेग थोडा जास्त झाला, थोडा राग आला तरी बाईंचे डोळे चटकन भरुन येत, आवाज कापरा होई.

हा एकच दुबळा ठिपका सोडला तर बाईंची जीवनशक्ती मोठी दांडगी, चिवट अन् सळसळती होती. अनेक गोष्टीत ती दिसून येई.

त्यांचा आवाज उंच, कर्कश. हसणेही खूप मोठ्याने अन् उंच. आमच्या कॉलेजच्या कॉरिडरमध्ये तो आवाज एकदा का घुमायला लागला की बाकीच्या विद्वानांचे आवाज मुकाट्याने माघार घेत. (या विद्वानांचे आवाजही कमी बुलंद नाहीत, हे येथे ध्यानात ठेवले पाहिजे.) एकदा कॉलेजच्या बागेत एक शेळी घुसली होती. संतापलेल्या बाई माळ्याला ओरडून सांगत होत्या - 'अरे त्या शेळीला पकड, आणि तिचा उद्या खिमा कर !' - आवाजासारखेच- दातसुद्धा असे भक्कम की लोणावळ्याच्या दाण्यांच्या चिक्कीचा काडकन तुकडा पडे. लॅम्ब्रीटा चालविणाऱ्या त्या पुण्यातल्या पहिल्या महिला. लोक थट्टा करायचे. - बाईंची किक् बसल्यावर काय बिशाद होती स्टार्टिंग ट्रबल देण्याची त्या स्कूटरची ! फिल्डवर्कसाठी आदिवासी वस्तीत गेल्या की शहरच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींना आंघोळ कुठे, कशी करायची पंचाईत. बाई त्यांची हसतहसत निर्भत्सना करीत. खुशाल आडातले थंडगार पाणी शिपायाकडून आपल्या डोक्यावर घेत चांगले बादल्याच्या बादल्या ! मनात एखादी कल्पना आली, प्रॉजेक्टसाठी पैसे मागायचे झाले की आमच्या डायरेक्टर कर्व्यांकडे त्या जायच्या, तेसुद्धा दडदडत-जवळ जवळ पळतपळत. बाईंचे शरीर-चैतन्य हे असे होते ! (१९६९ पर्यंत ते असे गतिमान होते. पुढे हार्टअ‍ॅटक आल्यानंतर मात्र ते कमी होत गेले अन् गेल्या वर्षात तर फारच उताराला लागले.)

एका जबरदस्त, अनावर अशा चैतन्याचा हा आविष्कार त्यांची बुद्धी आणि मन यामधूनही प्रगट व्हायचा. त्यांच्या बुद्धीचा आणि कुतुहलाचा पल्ला आम्हा तरुण सहाध्यायांना लाज वाटेल एवढा मोठा होता. वेद-वाङ्.मय, उपनिषदे, गीता, ज्ञानेश्वरी आणि पाश्चात्य तत्त्वज्ञातला हायडेगर या सर्वातील गाभा त्यांना माहीत होता. ललित-सौंदर्य, सामाजिक आणि सांस्कृतिक आशय आणि मूल्यविचार या तिन्ही पातळ्यांवरुन त्यांचा महाभारत-रामायणाचा व्यासंग होता. महाभारताच्या भव्य आणि शाश्वत अशा ललित आणि विचारसौंदर्याचे क्षितिज त्यांच्या 'युगान्त' मुळे किती विस्तारात गेले आहे हे पहाण्याजोगे आहे. सार्त्र-कामूसारखे आधुनिक पाश्चात्य लेखक आणि मराठीतील निवडक आधुनिक साहित्य हेही त्या आपल्या रसिक अन् चोखंदळ नजरेखालून घालत.

पण या सर्वात प्रेम आणि भक्ती होती ती मात्र स्वत:च्या समाजशास्त्र आणि मानवशास्त्र या विषयांवर. आपल्या बौद्धिक निष्ठेचा अग्रहक्क त्यांनी या विषयांना दिला होता. आणि आपल्या सहकाऱ्यांकडूनही त्यांची नेहमी हीच मागणी असे. 'हिंदु किनशीप', 'हिंदु सोसायटी-अ‍ॅन इंटरप्रिटेशन', 'महाराष्ट्र - लँड अँड पीपल्' आणि 'मराठी संस्कृती' हे चार ग्रंथ, अनेक विपुल लेख आणि आपापल्या विषयातील संशोधन त्या अखेरपर्यंत करु शकल्या ते मुख्यत: या अव्यभिचारी बौद्धिक निष्ठेमुळे आणि अपार कुतुहलामुळे. अगदी शेवटीशेवटीसुद्धा वऱ्हाडापासून कोल्हापूरपर्यंत पसरलेल्या जवळजवळ लाखांच्या घरातल्या धनगर

समाजाच्या अभ्यासाची त्यांनी पहाणी चालविली होती. (याबद्दल आमचे डॉ. पु. म. जोशी त्यांना अहिल्याबाई होळकर म्हणत !) 'शरीर एवढे थकले असताना एवढा मोठा पसारा तुम्ही मांडता आहात, याचं दडपण कसं येत नाही तुमच्यावर?' असं मी त्यांना एकदा विचारलं होतं. त्यांनी हसून उत्तर दिलं - 'येत नाही असं नाही. पण येऊ द्यायचे नाही असं ठरविलं की सगळं होतं.'

आपल्या विषयांच्या या अनन्यसाधारण निष्ठेमागे स्वत:च्या 'करिअर' बद्दलची एक दुर्दम्य आकांक्षाही बाईंमध्ये होती. परदेशाचे वर्षा-दोन वर्षातून प्रवास-परिषदा-परिसंवाद हे सर्व त्यांना हवेहवेसे वाटत असे-याचे कारण ही उदंड, बौद्धिक आकांक्षा. या गोष्टीबद्दल बाई शेवटपर्यंत कधी उदासीन-निरिच्छ किंवा 'सिनिकल' ही झाल्या नाहीत. मला त्या नेहमी या मुद्यावरुन डिवचित, 'तुमच्यात अशी आकांक्षा का नाही? असे कसे तुम्ही? मी गुळगुळीतपणे म्हणे, 'काय करु? नाही खऱ्या माझ्या आयुष्याच्या प्रेरणा तुमच्यासारख्या ! त्या तुमच्यासारख्या धगधगीतही नाहीत अन् पुरेशा उदासीनही नाहीत.'

अशा या आकांक्षेपायी एक बेचैनी येते. प्रभुत्व आणि सत्ता गाजविण्याचे ताण निर्माण होतात. बाईंना ते सहज झेपत. बाईंनी डेक्कन कॉलेजात समाजशास्त्र विभागाच्या प्रमुख म्हणून खूप आणि दीर्घकाळ सत्ता गाजविली. खालच्या लोकांना ती देऊन त्या चटकन बाजूला झाल्या नाहीत. शेवटीशेवटी बाईंनी स्वत:च हे प्रांजलपणे कबूल केले होते. तथापि हे सर्व म्हणूनही बाईंनी आपल्या सत्ताकांक्षेपायी कुणाचे बळी घेतले किंवा आपल्या सहकाऱ्यांना त्यांचे त्यांचे विचार आणि कृतिस्वातंत्र्य दिले नाही असे मात्र अजिबात नाही. आपल्या सहकाऱ्यांशी विचारांची देवघेव तर त्या आवर्जून करीत. 'विचारांच्या संपन्न विनिमयासाठी डेक्कन कॉलेजसारखी दुसरी संस्था नाही.' असे त्या म्हणत. मला एवढेच म्हणायचे आहे की, स्वत:च्या विषयावरचे उदंड प्रेम आणि निष्ठा याबरोबर बाईंजवळ 'करिअर' ची एक प्रखर आकांक्षाही होती.

या मुद्यावरुन आणखी एक गोष्ट सांगतो. बाईंच्या व्यक्तित्वामध्ये काही काही अंतर्विरोध होते. काही मजेदार, काही सुंदर, काही गंभीर.

एक अंतर्विरोध असा की बाई लोकांपासून दूरही होत्या अन् जवळही होत्या.

१९३९ पासून ते जाईपर्यंत म्हणजे एकतीस वर्षे बाई ज्या डेक्कन कॉलेजात काम करीत होत्या, तो शंभर वर्षे खोल असलेला, गोथिक शिल्पकलेचा हा दगडी मनोरा गावापासून दूर, एका पिवळ्या-कबऱ्या माळावर सुरक्षित उभा आहे. (इथल्या एकांड्या विद्वानांच्या लहरीप्रमाणे या माळालाही विक्षिप्त चढउतार आहेत!)

अगदी अलीकडच्या काळापर्यंत एरंडवण्याजवळच्या आपल्या स्वत:च्या बंगल्यात त्या रहात होत्या. शेवटच्या दिवसात गुलटेकडीवरच्या बंगल्यात रहात होत्या. ही दोन्हीही घरे गावापासून खूप दूर आणि दोन टोकांना आहेत. कॉलेजात येण्यापूर्वी पहिली काही वर्षे अण्णासाहेब कर्व्यांच्या-स्वत:च्या मामंजींच्या संस्थेत त्यांनी रजिस्ट्रार म्हणून काम केले. कसे कुणास ठाऊक ! कारण कोणतेही एखादे पत्र शोधायला त्यांच्या टेबलावरची अनेक पत्रे त्या विसकटून टाकीत! कर्वे विद्यापीठाच्या

पदवीपरीक्षेत एका वर्षी विद्यार्थिनींच्या क्रमांकाबाबतच त्यांच्या अमदानीत घोटाळे माजले! (या चुकांच्या गांभीर्याबद्दल काहीही न बोलता, 'भास्कर (बाईंचे दीर) मला जे त्यावरुन बोलला ते मी कधीही विसरणार नाही.' असे बाईंनी एकदा खिन्नपणे मला सांगितले होते !) एकूण सार्वजनिक संस्था किंवा संघटना बांधणे आणि एका भक्कम चौकटीत चालविणे हे चांगल्या कारभाऱ्याचे गुण बाईंमध्ये नव्हते. 'काय काम आहे?' या करड्या व्यवहारी प्रश्नाने चालणारी संस्था ही फक्त एक अमूर्त यंत्रणा आहे. खाडखाड कर्तव्यनिष्ठेने ती चालवायची असते ही अभिजात 'कर्वे' वृत्तीही बाईंमध्ये नाही.

'संस्था चालविण्याव्यतिरिक्त या कर्व्यांना येते काय?' असे चक्क बाई म्हणत ! म्हणूनच एवढे प्रचंड समाजसेवक मामंजी, पण त्यांच्या मिशनरी ध्येयवादाचे दडपण त्यांनी स्वत:वर कधी येऊ दिले नव्हते. मिशनऱ्याचे हे व्रत आपल्या पिंडात नाही, त्या व्रताने होणारी घरच्याच लोकांची म्हणजे बायकापोरांची हत्या आणि दु:ख आपल्याला सहन होणे नाही, तेव्हा सार्वजनिक जीवनात तडफड किंवा तडतड करायची नाही, हेही त्यांनी यामुळेच ठरवले असावे. हे एकदा ठरविल्यावर, मग त्या संभाजी पुलापलीकडे कधी फार फिरकल्या नाहीत आणि जवळच्या पी.वाय.सी. आणि डेक्कन जिमखान्याकडेही त्यांनी पाठ फिरवली. 'मी समाजाचे देणे लागते. ते माझ्याविषयातील संशोधनामार्फत फेडते. बाकी कोणतेही समाजाचे देणे मला नाही.'

या बाण्याने त्यांनी संशोधनाची वाट पकडली आणि शेवटपर्यंत त्या ती चालत गेल्या. अगदी थकून पडेतो चालत गेल्या.

घर, कॉलेज आणि कार्यक्षेत्र या तिन्ही ठिकाणी बाई, लोकांपासून अशा दूर राहिल्या होत्या. घराण्याचा म्हणून चालत आलेला सार्वजनिक जीवनाचा वसा त्यांनी असा नाकारला होता.

पण इतके असूनही बाई लोकजीवनापासून आणि लोकपरंपरेपासून कधी तुटल्या नव्हत्या. अनेक गोष्टींमुळे हे झाले असावे. वेगवेगळ्या नात्याच्या माणसांच्या उच्च पण जुन्या मध्यमवर्गीय कुटुंब-परंपरेत त्या वाढल्या होत्या. कदाचित त्या जीवनाचे आणि संस्कारांचे पाझर त्यांच्या व्यक्तिमत्वात कायम राहिले असावेत, कारणे काहीही असोत संभाजी पुलाअलीकडच्या नारायण-सदाशिव 'वाडा-संस्कृती' तील मुळामुठेचे पाणीही त्यांनी जसे जोखले होते, तसेच पुलापलीकडे रहाण्यातच आधुनिकता आणि सुधारणा नसते याचेही उपजत भान त्यांनी ठेवले होते यात शंका नाही.

आपल्या संशोधनाच्या क्षेत्रातही त्यांनी स्वत:ला असे बंदिस्त करुन घेतले नाही. विषय म्हणून माणसांच्या अस्थी, रक्त आणि 'वांशिक गौडबंगाला' चा छडा त्यांनी सतत धरला. पण त्याच्याबरोबरीने भारताच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत पायांना भिंगरी लावल्यासारख्या लोकांचे जीवन पहातही त्या हिंडल्या. लोक, त्यांचे रीतीरिवाज, त्यांची जातीची आणि भाषेची कुळी, त्यांची नातीगोती या सर्वांबद्दल त्यांना भयंकर कुतुहल होते. असे सर्वांगीण चौकस बौद्धिक कुतुहल असल्याखेरीज समाजशास्त्रज्ञ हा हाडाचा समाजशास्त्रज्ञ होऊच शकत नाही, असे

त्यांचे मत होते. प्रवास, वारी, यात्रा या सर्वांतून त्यांनी आपल्या समाजशास्त्राचे, व ललित साहित्याचे भांडवल गोळा केले. हिंदू किनशीप, हिंदू सोसायटी, या समाजशास्त्रीय पुस्तकात आणि भोवरा, परिपूर्ती या ललित निबंधांच्या संग्रहात बाईंनी हे धन कशारीतीने संचित केले हे स्वच्छ दिसून येते. त्यांच्याशी बोलणे हा म्हणूनच नेहमी एक प्रसन्न अनुभव असे.

'महार जेथपर्यंत पोचले तो महाराष्ट्र', 'ज्याची एक नस पंढरपुराशी तो महाराष्ट्रीय', 'खांडववनाचा दाह म्हणजे जेते आर्य आणि आदिवासी यांतील संघर्षाचे चित्र', 'एकत्र कुटुंबाचे खरे फायदे-तोटे फक्त विधवांना माहीत', 'संन्यासमार्गाची भरभराट धनिकांच्या वर्गावर अवलंबून असते.' 'ही अमक्यातमक्याची आई आहे हे सांगितल्याखेरीज हिंदू स्त्रीच्या सामाजिक स्थानाला पूर्णताच येऊ शकत नाही', 'आज बोकांळलेले' 'ॲब्सर्डीटीचे' तत्त्वज्ञान-अस्तित्व अर्थशून्य आहे,' 'हे हिंदू तत्त्वज्ञानातही आहे आणि गीतेच्या माध्यमातून त्याला उत्तरही दिले गेले आहे'

लोकजीवनमार्गात सामाजिक आणि सांस्कृतिक आशयाची उकल करुन दाखविणारी अशी कितीतरी बाईंची वाक्ये गेली दहा एक वर्षात माझ्या कानावरुन गेली होती. आणि दरवेळी त्यामागचे बाईंचे चलाख, सूक्ष्म निरीक्षण मला जाणवलेले होते. बाईंचे सर्वच्या सर्व समाजशास्त्रीय आणि मानवशास्त्रीय सिद्धांत, भक्कम चिकित्सेच्या आणि कडक वस्तुनिष्ठ बौद्धिक शिस्तीच्या निकषावर मान्य होतीलच असे नाही. पण समाजमनाची स्पंदने जाणणाऱ्या त्यांच्या अंतर्दृष्टीबद्दल आणि सूक्ष्म निरीक्षणाविषयी कोणाचेही दुमत होणार नाही.

एकीकडे परंपरेशी बाई फटकूनही वागल्या. कुंकू नाही, मंगळसूत्र नाही, धर्मविधी नाही, रुढ सामाजिक संकेत पाळणे नाही, काही नाही. पण दुसरीकडे त्यांनी परंपरेशी नाते अतूटही ठेवले होते. वेद, रामायण-महाभारत, तत्त्वज्ञान इत्यादींमध्ये आपली गती खोल नाही हे त्या स्वत:च कबूल करत असत. पण भारतीय समाजजीवनाचा मागोवा घेताना परंपरेचा हा धागा अटळ आहे असे मानणाऱ्या इंडोलॉजिस्ट पिढीच्या संस्कारामुळे आपल्या सगळ्याच विचारात त्यांनी तो गोवण्याचा प्रयत्न केला. इंग्लंड-अमेरिकेत त्या राहिल्या. गोरी माणसे, गोरी जीवनपद्धती काही बाबतीत त्यांना मनापासून आवडत असतही. पण एका मर्यादेपलीकडे बनचुके प्रज्ञावंत रमतात तशा त्या परदेशात रमल्या नाहीत.

मला एकदा त्या म्हणाल्या होत्या - 'दिनू काय जगाच्या पाठीवर कुठेही राहील . मला राहवणार नाही. बर्कलेहून आले - भारतात आले तेव्हा केव्हा एकदा महाराष्ट्रातील डोंगरदऱ्याचा माळ दिसेल असे मला झाले होते.' गुलटेकडीवरचे त्यांचे सध्याचे घर एका टेकडीवर आहे आणि त्या घराचा सज्जा त्यांनी असा ठेवला आहे की पुण्याची डोंगरांच्या कडांनी कातरलेली आकाशरेषा त्यामधून दिसावी. मधून मधून त्यांना पंढरपुराची जी, 'सय' होई तीही अशाच कढाची होती. करमेनासे झाले, हुरहूर लागली, मन अस्वस्थ झाले की त्या सरळ पंढरीची वाट धरत. दिनकरराव, मुली, सर्व थट्टा करीत. जावई तर

चालली 'बॉय फ्रेंडकडे' म्हणायचा. पण प्रतीक-पूजेची ही बाईंची ओढ आणि नेम टळत नसे. त्यात एक खोल वैयक्तिक श्रद्धा तर असेच. पण 'ही वाट आमच्या संतांची -आपल्याहून फार मोठ्या माणसांचे माथे इथे टेकले- तर मी मेली कोण एवढी?' - माझाही टेकू दे. असेही एक समाधान होते.

परंपरेच्या संदर्भातच त्यांना आणखी एक दु:ख होते. तरुण पिढी ही पुढे पहाणारी, तिने पुढचेच पाहिले पाहिजे हे त्यांना मान्य होते. पण मागे काय झाले, केवढा मोठा वारसा आपल्याला मिळाला आहे याचे तिने सतत भान ठेवले पाहिजे असे त्यांना वाटे. 'ही गांधारी कोण बुवा?' 'काय बुवा. तुम्ही एवढे त्या ज्ञानेश्वरीत रमता?' 'सध्याच्या जीवनाचा संदर्भ रामायणात आहे का?' असे काही प्रश्न ऐकले की त्या कासावीस होत. जीवनातील दु:खाची, वैफल्याची समंजस जाण असूनही त्यांना नव्या पिढीचा वैताग समजत नसे. बरे, समजत नाही तर स्वत:ला तोडून काढावे - हेही त्यांना पटत नसे - भावतही नसे. म्हाताऱ्या माणसांनी एका मर्यादेपलीकडे राहू तरी नये, किंवा समाजाने तरी त्यांना मारून टाकावे असा जो एक तोडगा त्यांनी यावर काढला होता, तो मात्र एका परीने 'वैतागच होता ! पण ते काहीही असो, नव्या पिढीतला आणि आपल्यातला दुरावा त्यांना अस्वस्थ करीत असे,' टोकरुन काढीत असे, हे सुद्धा फार बोलके नाही का ?

अशा प्रकारची अस्वस्थता किंवा बेचैनी बाईंना वाटावी- तरुण पिढीचा दुरावा हे मी आपले एक उदाहरण दिले - यात तसे पाहिले तर आश्चर्यही नाही. कारण त्यांच्या संवेदना, भावना आणि प्रेरणा इतक्या काही उत्कट आणि मनस्वी होत्या की कोणत्याही भूमिकेत त्या दूरस्थ किंवा तटस्थ राहूच शकत नसत. मनात येईल ती प्रेरणा त्यांना झपाटून टाकीत असे. ती त्यांचा पुरा कब्जाच घेई. एखादे माणूस आवडले की आवडले-बस्स. नावडले की नावडले- बस्स. विचारातसुद्धा हेच.

एखाद्या विचाराचे किंवा एखाद्या कल्पनेचे स्फुरण व्हायचा अवकाश मग त्यांची बुद्धी सुद्धा त्यामागून धडक दिल्यासारखी जात असे ! जाई निंबकर म्हणतात, त्यांच्या व्यक्तिमत्वात एक लक्षात न येणारा उपरोधही होता. पण हे काही खरे वाटत नाही ते याच कारणामुळे. सीमेचे प्रेम आणि सीमेचा राग, सीमेची आत्मीयता आणि सीमेची तुच्छता, सीमेचा न्याय आणि सीमेचा अन्याय- यामध्येच त्यांचे मन फिरत असे.

विचारांच्या क्षेत्रात बाई अलीकडे फार सहिष्णू, विनयी अन् अलिप्त झाल्या होत्या. 'हे खरं आहे, मला असं वाटतं म्हणून मी असे लिहिलं, दुसऱ्या कोणाला वेगळं वाटेल. माझा काहीच आग्रह नाही.' असे त्या वारंवार म्हणत. अलीकडे त्या विठोबाकडे जाऊन शांत, समाधानी आणि तृप्त होऊन यायच्या. पण तरीसुद्धा त्यांच्या संवेदना-भावना आणि प्रेरणा यामागील चैतन्य-लहरी अशा होत्या की ही शांती, हे समाधान, आणि ही तृप्ती क्षणिक असावी, ती त्यांच्या व्यक्तिमत्वात खोलवर पाझरत गेली नसावी, अशी मला शंका आहे. समबुद्धीमुळे येणारी शांत, समाधानी लय त्यांच्या व्यक्तिमत्त्वात येणेच अशक्य होते का? धीर झाला नाही, म्हणून बाईंना

अनेक प्रश्न विचारायचे राहून गेले. त्यातील हा एक.

ज्या लोकांनी बाईंच्या बुद्धीच्या खानदानीचा 'माझी मी स्वतंत्र' या बाण्याचा विलक्षण लहरी असा अहंकार पाहिला किंवा त्याचा जबरदस्त फटका अनुभवला होता त्यापैकी फार थोड्यांचा, बाई या अतिशय वत्सल होत्या यावर विश्वास बसेल. (माझा बसला आहे याचे कारण मला त्यांचे सीमेचे प्रेमही मिळाले होते आणि सीमेचा रागही सहन करावा लागला होता !) पण हे अगदी खरे होते.

दिनू, जाई, गौरी, नंदू ही नावे त्यांच्या जिभेवर वारंवार होती. त्यांच्या ललित निबंधात किती वेळा आली आहेत, घराभोवती त्यांचे ललिल निबंध किती वेळा फिरतात, यावरुनही ते कळते. आपले 'हिंदू किनशीप' वरचे पुस्तक त्यांनी परंपरागत हिंदू स्त्रीच्या पद्धतीने आपल्या यजमानांना खाली वाकून एका शब्दातीत भावनेने अर्पण केले होते.

कुटुंबजीवनातला सोन्या हा शब्द म्हणूनच त्यांच्या तोंडी बसला होता की काय. कोण जाणे ! नंदू, कॉलेजचा गडी, ड्रायव्हर, मोटारीच्या रस्त्यात 'मध्येच मरायला आलेला' वाटसरु, तरुण सहाध्यायी-सगळे सोन्या ! फार काय वाद-विवादातसुद्धा 'कोंत', 'स्पेन्सर', 'वेबर', वगैरे जागतिक कीर्तीच्या समाजशास्त्रज्ञांचा सुद्धा-अरे पण सोन्या, तुझ्या हे कसं लक्षात येत नाही-असा उल्लेख होत असे. ज्ञानेश्वरांच्या समाधीसारखी व्यथित करणारी दुसरी घटना या जगात नसेल असं मला डबडबत्या डोळ्यांनी त्यांनी एकदा सांगितले होते. त्यामागेही हेच कोवळे अन् वत्सल मन होते.

विठ्ठलराव घाट्यांनी लिहिले आहे ते खरे आहे. कोंबडीसारखी कोणा ना कोणावर तरी पाखर घालण्याचा त्यांना हव्यासच होता. गौरीने-त्यांच्या मुलीने लिहिल्याप्रमाणे हा किंवा ही माझी हे त्यांनी एकदा ठरविले रे ठरविले की त्या माणसासाठी त्या वाटेल ते करीत असत. त्या माणसाची आपली पारख बरोबर का चुकीची असो वा ठरो- हा प्रश्न मग दुय्यम असायचा. त्या माणसासाठी मग स्वत:च्या हाताने त्याला चांगले-चुंगले खायला घातले जाई. एखाद्या गड्याच्या, मोलकरणीच्या संसाराला त्यांचा हातभार लागला जाई. एखाद्या एकट्या असलेल्या सहकाऱ्यासाठी त्या स्वेटर विणू लागायच्या.

माझी मी एकच आठवण सांगतो. चार वर्षापूर्वी माझे एक ऑपरेशन झाले. ऑपरेशन मला वाटते अकराला होते. मी टेबलावर होतो. सर्जन घारपुरे आपले मोजे घालून तयार होते. तोच बाईंचा फोन - 'बंड्या ! त्या पोराचे ऑपरेशन नीट कर. मी त्याच्या असह्य वेदना स्वत: पाहिल्या आहेत !'

बाईंच्या सौंदर्याच्या संवदेना अशाच तल्लख आणि नितळ होत्या. संशोधन हा सुद्धा त्यांना एक प्रकारचा 'एस्थेटिक ॲडव्हेंचर' वाटायचा. आपल्या संशोधनात एखादे लहान-मोठे सूत्र किंवा आकृती सापडली की त्यांचा चेहरा आनंदाने गच्च फुलून यायचा. डोळे मिटून अन् इकडेतिकडे मान हलवून त्या म्हणत रहायच्या, 'किती सुंदर आहे नाही? किती सुरेख आहे !' हे जर संशोधनाबद्दल तर मग साहित्याबद्दल काय सांगवे? बाईंच्या साहित्यातील खास मध्यमवर्गीय

व्यक्तित्वालाही त्यामुळे असाच एक वेगळा रंग आला होता. १९३० च्या आगेमागे सुशिक्षित महाराष्ट्रीय स्त्रियांची - त्यांच्यापैकी बऱ्याच विदुषी झाल्या-एक पिढी बाहेर आली होती. बहुतेकींच्या मनांनी स्त्री-स्वातंत्र्य आणि अधिकार यांच्या ध्येयवादाने उलटेसुलटे गोते खाल्ले.

बाई मात्र प्रथमपासून म्हणत गेल्या 'बायांनो, अग पुरुषांशी समान हक्कांसाठी बरोबरीने करवदून काय भांडता ? नेहमी जास्त हक्कांसाठी भांडत जा.' त्यांच्या बोलण्यात हक्क आणि अधिकार यांच्यापलीकडे जाणाऱ्या स्त्री-पुरुषसंबंधातील गुंतागुंतीच्या भावबंधांची एक सूक्ष्म, प्रगल्भ आणि खोल जाणीव होती. महर्षि कर्वे - र. धों. कर्वे - रँग्लर परांजपे - शकुंतला परांजपे, यासारखी खंदी प्रचारकी आणि स्त्रियांच्या प्रश्नांचा मोठ्या कळवळ्याने विचार करणारी माणसे भोवताली असूनही बाईंच्या या जाणीवा ध्येयवादाने किंवा बोधवादाने ठार झाल्या नाहीत हे केवढे आश्चर्य ! अन् केवढे भाग्यही ! ज्ञानाची, संशोधनाची क्षितिजे पाहता पाहता

महाराष्ट्रात, देशात आणि परदेशातही बाई कीर्तीमान होत गेल्या. पण स्त्रीसुलभ ऋजुतेच्या, पुरुषामुळे स्त्रीला भोगाव्या लागणाऱ्या अपरिहार्य दु:खामुळे आलेल्या खोल शहाणपणाच्या त्यांच्या सौंदर्य जाणीवांना कधी वेडेवाकडे तडे गेले नाहीत. वाढत्या वयाबरोबर त्या अभंग अन् अधिकाधिक टवटवीत राहिल्या. 'कुंती', 'गांधारी', 'द्रौपदी', 'आजोबा' या सर्वांची व्यक्तिचित्रे रंगवताना बाईंनी हाच सूर धरला आहे. - स्त्रीला कोणातरी पुरुषांमुळे फार अटळपणे सोसावे लागणारे दु:ख ! 'नंद्या कर्व्यांची आई' हे शब्द ऐकताच गेलेली हुरहूर. पुरुषाच्या कणखर अस्तित्त्वाच्या अभावी घराला आलेले मलूल सुनेपण, उत्खननात सापडलेल्या स्त्रीचा सांगाडा पाहून सनातन स्त्रीच्या सखीपणाचा झालेला आविष्कार, आजच्या उद्योगप्रधान समाजाच्या भोवऱ्यासारख्या गतिमानतेत, गल्लीतल्या वर्षानुवर्षांच्या भाजीवालीच्या अबोल ओळखीचा वाटणारा आधार - 'परिपूर्ती' आणि 'भोवरा' यामध्ये आलेल्या बाईंच्या भावविश्वातील 'थीम्स' मध्ये याच जाणीवा व्यक्त झालेल्या आहेत.

मला दिसलेल्या-जाणवलेल्या-बाई अशा होत्या.

पुरुषी बांध्याच्या पण अभिजात स्त्रीचे अंतर्बाह्य सौंदर्य घेऊन आलेल्या. संशोधक, स्त्री आणि कलावंत यांचा सुंदर मेळ कधी साधणाऱ्या-कधी न साधणाऱ्या. जितक्या भांडखोर, बंडखोर तितक्याच हळव्या, वत्सल आणि ऋजु. जितक्या वत्सल तितक्याच हट्टी, पिळाच्या आणि करारी. मन लोकांमध्ये ठेवूनही कुठेतरी खानदानी अन् कुर्रेबाज दूरता ठेवणाऱ्या. स्वत:च्या विषयाच्या भक्तीबरोबरच 'करीअर' विषयीची जागरूक आकांक्षा बाळगणाऱ्या-कुठेतरी आधुनिक-कुठेतरी परंपरानिष्ठा आणि परंपरावादी. इतक्या विचित्र गुंतागुंती आणि तऱ्हेतऱ्हेची कोडी कुठेही मोडून न जाता आयुष्यभर वाहणाऱ्या -

म्हणजे पुन: तेच-विलक्षण वेगळ्या-विलक्षण जबरदस्त, चैतन्याचा एक झोत !

■■

( 'माणूस'दिवाळी अंक १९७० मधून साभार)

# जागतिक कीर्तीच्या संशोधक 'डॉ. इरावती कर्वे'

डॉ. इरावतीबाई कर्वे यांनी अडीच तपाहून अधिक काळाच्या संशोधनात जागतिक कीर्ती मिळविली. त्यांच्या मूलगामी संशोधनाचा परिचय डेक्कन कॉलेजातील त्यांचे सहकारी पुराणवस्तू संशोधन विभागाचे प्रमुख डॉ. ह.धी. सांकलिया आणि याच कॉलेजातील एक प्रा. रा.के. मुटाटकर यांनी करून दिला आहे.

डॉ.इरावतीबाई कर्वे, डॉ. कत्रे प्रा. शेजवलकर, प्रा. शंकरन् आणि मी एकाच दिवशी गुरुवारी १७ ऑगस्ट १९३९ या डेक्कन कॉलेज संशोधन संस्थेच्या सुरुवातीच्या दिवशी दाखल झालो. त्या दिवसापासून ते इरावतीबाईचे निधनाच्या ११ ऑगस्ट १९७० आदल्या दिवसापर्यंत आम्ही एक कार्य करीत होतो. इतरांपेक्षा त्यांच्याशी अधिक जवळचा संबंध येण्याचे कारण म्हणजे आमचे उत्खनन.

१९४२ मध्ये जेव्हा मी गुजरातमध्ये लांघनजचे उत्खनन कार्य हाती घेतले होते, त्यावेळी इरावतीबाईंचे बहुमोल सहकार्य मला लाभले. जात्याच त्या कष्टाळू असल्याचे मला तेथे आढळून आले. त्याचे व्यक्तिमत्त्व जेवढे प्रभावी होते तेवढ्याच त्या थोर विद्वानही होत्या. समाजशास्त्र व मानववंश शास्त्र हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. त्या विषयात त्यांनी अव्याहतपणे कार्य करुन अमोल भर घातली, त्यामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळाली.

डेक्कन कॉलेजमध्ये आल्यावर त्यांना सुरुवातीला महाराष्ट्रातील निरनिराळ्या जातींची समाजशास्त्रदृष्टया पाहणी केली. विविध जातींतील स्त्री-पुरुषांचा शरीरमापनाद्वारे मानववंश शास्त्राचा अभ्यास त्यांनी सुरु केला. या संशोधनाची त्यांनी अवलंबिलेली आणखी एक पद्धत म्हणजे रक्तसमुहाचे परीक्षण याशिवाय आप्त रक्तवंश संबंधाचांच (Kinship) त्यांनी सखोल अभ्यास केला होता. या विषयात त्यांनी जो ग्रंथ लिहिला तो भारतातला त्या विषयातील पहिला ग्रंथ. एका वर्षाच्या आत त्याची दुसरी आवृत्ती काढावी लागली. भारतातील व परदेशातील विद्यापीठांत समाजशास्त्रातील ते एक आधारभूत पुस्तक मानले जाते.

दोन-तीन वर्षांपूर्वी त्यांनी महाराष्ट्रातील धनगर जातीचे सर्वांगीण संशोधन सुरु केले होते आणि त्यासाठी त्यांना विद्यापीठ अनुदान मंडळाने दीड लाख रुपयाचे अनुदानही दिले होते. सतत संशोधन हे त्यांचा स्वभावच झाला होता. आतापर्यंत त्यांनी समाजशास्त्र व मानववंश शास्त्रावर ८६ लेख प्रसिद्ध केले आहेत. कोयनेच्या भूकंपामुळे जे सामाजिक व आर्थिक प्रश्न निर्माण झाले त्यावरही त्यांनी संशोधन केले.

डॉ. इरावतीबाई केवळ समाजशास्त्रज्ञ अथवा मानववंश शास्त्राच्याच संशोधक नव्हत्या, तर त्यांना संस्कृत भाषेची अवीट गोडी होती.

कालिदास, भवभूति, महाभारत, रामायण इत्यादींमधील महत्त्वाचे श्लोक त्यांना तोंडपाठ होते. त्यांनी महाभारताचा मानवशास्त्राच्या दृष्टिकोनातून व समाजशास्त्राच्या दृष्टीने सांगोपांग अभ्यास केला होता आणि त्यातूनच युगान्तचा जन्म झाला. या पुस्तकात इरावतीबाईंच्या ज्ञानाचे दर्शन नसून, एका हिंदू स्त्रीला महाभारतकालीन स्त्रिया कशा वाटत होत्या ते द्रौपदी, कुंती, माद्री इत्यादीच्या हृदयात प्रवेश करुन आपणासमोर त्याचे भावपूर्ण; परंतु अगदी आगळे चित्र त्यानी ठेवले आहे. त्यामुळेच युगांतची गणना अभिजात ग्रंथात झाली. त्याला साहित्य अकादमीने पारितोषिक दिले, त्यात काही नवल नाही.

गुजरातमधील लांघनज उत्खननात प्राप्त झालेली जनावरांची हाडे ट्रेमध्ये ठेवली होती. त्याची सहज पाहणी इरावतीबाई करत असता त्यात त्यांना एक लहानसा मानवाच्या कवटीचा तुकडा सापडला. तो पाहून त्या मला म्हणाल्या, 'तुम्ही करत असलेल्या उत्खननात लघुपाषाणकालीन मानवांचा सांगाडा सापडावयाला पाहिजेच'

त्यानंतर आम्ही पुढील चार पाच वर्षे लांघनज येथे उत्खनन करुन त्यांनी त्या ठिकाणी आदी मानवाच्या सांगाड्याचा शोध लावला. या लांघनज उत्खननामुळे माझ्या कामाला खूपच महत्त्व आले व प्रसिद्धी प्राप्त झाली. भारतातून अनेक ठिकाणाहून मला उत्खननासाठी व संशोधनासाठी बोलावण्यात आले. याचे श्रेय इरावतीबाईना आहे. त्यांनी आमच्या लांघनजच्या दुसऱ्या उत्खननात तर त्यांचे अधिकच सहाय्य मिळाले.

मानवाचा पहिला सांगाडा आम्हाला उत्खननात मिळाला तो दिवस मला आठवतो. ती तारीख २८ फेब्रुवारी १९४४. डॉ इरावतीबाईनी माझे हार्दिक अभिनंदन केले, परंतु त्यानंतर मी आजारी पडलो. तेथे नर्स, डॉक्टर कोणीच नव्हते, परंतु इरावतीबाईंनी माझी शूश्रुषा एखाद्या मातेप्रमाणे केली. आज ते दृश्य माझ्या डोळ्यांसमोर उभे राहते.

त्यांची राहणी अत्यंत साधी व नीट नेटकी असे. कसल्याही प्रकराचे काम करण्यात त्यांना कधी कमीपणा वाटत नव्हता. गुजरातमधील नद्यांच्या खोऱ्यात आम्ही संशोधनात्मक पाहणी करत असताना तिकडील लोकांनी आमच्यावर बहिष्कार घातला. कारण आमचेबरोबर हरिजन होते. त्यामुळे आम्हाला आश्रय मिळाला नाही. सबंध दिवसभर आम्ही हिंडत होतो रात्री एका लहान खोलीत ओल्या लाकडावर डॉ. इरावतीबाईंनी स्वयंपाक करुन सर्वांना जेवू घातले.

त्यांच्या दु:खद निधनाचे समाजशास्त्र, मानववंश शास्त्राची फार मोठी हानी झाली, परंतु पहिल्यापासून एकत्रपणे कार्य करणारा माझा सहकारी गेल्याचे दु:ख फार मोठे आहे. आमच्या संस्थेची ती न भरुन येणारी हानी होय. ■■

( रविवार सकाळ, मुंबई-पुणे, ता. १६ ऑगस्ट १९७० )



# भारतातील जाती-पद्धतीचा खरा अर्थ जगापुढे मांडला

प्रा. रा. के. मुटाटकर

डॉ. इरावती कर्वे यांनी समाजशास्त्र, सांस्कृतिक मानवशास्त्र व शारीरिक मानवशास्त्र (Cultural and Physical Anthropology) या तिन्ही विषयांवर अनेक संशोधनात्मक प्रबंध लिहून आपले या विषयावरील प्रभुत्व सिद्ध केले. त्यांनी पीएच.डी जरी शारीरिक मानवशास्त्राच्या क्षेत्रात घेतलेली असली तरी त्या जगप्रसिद्ध झाल्या त्यांच्या सांस्कृतिक मानवशास्त्रातील प्रबंधामुळे. त्यांचा भारतातील नातेदारी संघटनाबाबत ग्रंथ (Kinship organization in India) अमेरिकेतील कॉलेजात व विद्यापीठात मानवशास्त्राच्या अभ्यासक्रमात पाठ्यपुस्तक म्हणून नेमलेला आहे.

संयुक्त कुटुंबसंस्था, ग्रामसंस्था व जातिसंस्था ही भारतीय समाजरचनेची वैशिष्ट्ये आहेत. यातील एकत्र कुटुंबसंस्था व जातिसंस्थाविषयक डॉ. कर्व्यांचे संशोधन मौलिक स्वरूपाचे आहे. भारतीय समाज परंपराबद्ध व शेतकीप्रधान समाज असल्याने इतर परंपराबद्ध समाजाप्रमाणे यातील प्रमुख सामाजिक गट नातेदारी पद्धतीवर आधारलेले आहेत. भारतीय एकत्र कुटुंबसंस्था हे त्याचे ठळक उदाहरण आहे. अखिल जगात समाजशास्त्रज्ञ व मानवशास्त्रज्ञांनी भारतीय जातिसंस्थेवर जेवढे ग्रंथ लिहिले तेवढे इतर कुठल्याही विषयावर लिहिले नाहीत. भारतातील जातिसंस्थाविषयक पाश्चात्य शास्त्रज्ञांना अजूनही कुतुहल व कोडे वाटते. जात हा सामाजिक गट दुसरे - तिसरे काही नसून एक नाते -समूह आहे हा सिद्धांत मांडणाऱ्या डॉ. इरावती कर्वे या पहिल्याच संशोधक आहेत.

त्यांनी दक्षिण व उत्तर भारतातील कुटुंबसंस्था विवाहसंस्था व नाते-पद्धती यांचे जे तुलनात्मक विश्लेषण केले ते त्यांच्या संशोधनातील प्रथम दर्जाचे कार्य होय. त्याबाबत चिंतन करणाऱ्या त्या पहिल्याच, मानवशास्त्रज्ञ अजूनही त्या कामास पुढे कोणीही चालना दिलेली नाही. दक्षिण भारतातील पितृसत्तात्मक कुटुंब उत्तर भारतीय कुटुंबापेक्षा भिन्न नाही. दक्षिण भारतात आते-मामे-बहीण-भावंडांचे परस्पर विवाह संस्था संमत असतात, इतकेच नव्हे तर त्यांना प्राधान्य दिले जाते. त्याकारणाने, विवाहामुळे दोन परिचित कुटुंबांत नवीन नाते-संबंध स्थापित होत नाहीत, तर अगोदरच जमलेले नातेसंबंध जास्त घनिष्ठ होतात. तसेच नववधूस सासरचे लोक पूर्वपरिचित असल्याने त्यांच्या परस्परसंबंधात जास्त संघर्ष संभवनीय नसतो.

याउलट, उत्तर भारतात, आते-मामे-बहीण-भावंडाचे विवाह निषिद्ध आहेत. त्यास स्वैराचार समजतात. त्यामुळे प्रत्येक विवाह दोन कुटुंबात नवीन नातेसंबंध निर्माण करतो. नववधूस सासर अपरिचित असल्याने तिचे सासू-सासऱ्याशी संबंध तुटकपणाचे असतात. आपल्या बाजूने कोणीतरी असावे. या भावनेतून धाकट्या दिरांशी थट्टामस्करीचे संबंध प्रस्थापित केले जातात. उत्तर व दक्षिण भारतातील कुटुंब, विवाह नातेसंबंधाच्या भिन्नतेचा ज्या त्या संस्कृतीवर खोल ठसा उमटला

आहे. उत्तर भारतीय संस्कृती दक्षिण भारतीय संस्कृतीच्या मानाने जास्त पुरुष-प्रधान आहे. यावरुन दक्षिण भारतात पूर्वी मातृसत्ताक संस्कृती असावी असाही एक विचार प्रकट करण्यात येतो. या दोन्ही संस्कृतींना जोडणारा दुवा म्हणजे महाराष्ट्र संस्कृती असा डॉ. इरावती कर्व्यांचा सिद्धांत आहे.

जातीविषयक संशोधनात जात म्हणजे एक विस्तारित नाते-समूह हा नवीन विचार डॉ. कर्व्यांनी प्रथम मांडला. सर्वसाधारणत: एकच नाव धारण करणाऱ्या एका अंतर्विवाही गटास आपण जात म्हणून संबोधतो. जसे कुंभार, महाराष्ट्रीय ब्राह्मण या जाती म्हणून आपण समजतो. या जातीत बरेच अंतर्विवाही गट असतात. जसे कुंभारात परदेशी कुंभार, थोरचाके, लहानचाके, हातवडे सुंगारिया, मारवाडी कुंभार इ. अनेक अंतर्विवाही गट आहेत. यांना आपण पोटजाती म्हणून ओळखतो.

डॉ. इरावती कर्वे प्रत्येक पोटजातीस म्हणजेच सर्वात लहान अंतर्विवाही गटास जात म्हणतात वा मोठ्या अंतर्विवाही गटांची संस्कृती कमी-अधिक प्रमाणात भिन्न असते, असे त्यांनी सिद्ध केले आहे. जातीची ही नवी व्याख्या सोपी, सुटसुटीत व विश्लेषणास उपयुक्त अशी आहे. ती शास्त्रात रुढ होत आहे. या अंतर्विवाही जात-नामक गटातील व्यक्तींचे परस्पर संबंध प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष नात्याचे असणार हे उघड आहे. काहींचे जरी नात्याचे संबंध नसले तरी पुढे मागे, विवाह त्याच गटात होत असल्याकारणाने नाते प्रस्थापित होण्याची शक्यता असते. या नातेदारीमुळे एका जातीच्या लोकांत जवळीक असते. जात हा एक नाते-गट आहे हे समजले म्हणजे देशात चालणारे जातीचे राजकारण समजणे सोपे होते.

जातीच्या उत्पत्तीबाबतही डॉ. इरावती कर्व्यांचा सिद्धांत वैशिष्टपूर्ण आहे. एका जाती-समुच्चयात अनेक जाती असतात. त्या जाती कशा निर्माण झाल्या याबाबत अनेक सिद्धांत आहेत. एका जातीचे विभाजन होऊन अनेक उपजाती निर्माण झाल्या असा जवळजवळ सर्वमान्य सिद्धांत आहे. परंतु डॉ. इरावती कर्व्यांनी शरीर मानवशास्त्राच्या आधारे शरीराची मानवशास्त्राच्या आधारे शरीराची मापने घेऊन व रक्तगटांचे विश्लेषण करुन तसेच एका जाती-समुच्चयातील वेगवेगळ्या जातींचे सांस्कृतिक जीवनाचे विश्लेषण करुन जाती-विभाजनाचा सिद्धांत मोडून काढला. त्यांचे याबाबतचे संशोधन अजून चालूच होते. कुंभार व ब्राह्मणाचा अभ्यास केल्यानंतर त्या अलीकडे दोन वर्षे धनगर जाती-समुच्चयाबाबत संशोधन करीत होत्या.

मानवशास्त्रज्ञाने मानवशास्त्राच्या दोन्ही प्रमुख विभागांवर शारीरिक मानवशास्त्र व सांस्कृतिक मानवशास्त्राची जीवविज्ञानांशी जवळीक आहे, तर सांस्कृतिक मानवशास्त्राचा सामाजिक विज्ञानांशी जवळचा संबंध येतो. मानवशास्त्राच्या दोन्ही शाखांचा दुसऱ्या महायुद्धानंतर झपाट्याने स्वतंत्र शास्त्रे म्हणून विकास झाला. या दोन्हीवर प्रभुत्व ठेवून त्यांची संशोधनात सांगड घालून संस्कृती इतिहासाचे विश्लेषण करणाऱ्या डॉ. इरावती कर्वे जगातील शेवटच्या मानवशास्त्रज्ञ ठरतील व मानवशास्त्राच्या इतिहासात त्यांचे नाव अजरामर राहील. भारतात तर दोन्ही मानवशास्त्र-शाखांची सांगड घालून संशोधन करणाऱ्या त्या पहिल्या व शेवटच्या मानवशास्त्रज्ञ म्हणून नेहमी लक्षात राहतील. ■■

(रविवार सकाळ, मुंबई-पुणे, ता. १६ ऑगस्ट १९७०)

# इरावतीबाईंची गोधडी

डॉ. मिलिंद बोकील

**प्रा.** इरावती कर्वे यांच्याबद्दल बोलण्यात आनंदाचा भाग जसा आहे तसा कर्तव्याचाही. कारण माझी गुरूपरंपरा त्यांच्यापर्यंत पोहोचते. त्या जेव्हा शिकवत होत्या, त्या अखेरच्या वर्षांत मी शाळकरी मुलगा होतो. त्यामुळे त्यांचा शिष्य व्हायची संधी मिळणे शक्यच नव्हते. पण माझे पुणे विद्यापीठातील मार्गदर्शक कै. प्रा. त्रि. ना. वाळुंजकर हे त्यांचे विद्यार्थी होते. त्यांच्या माध्यमातून इरावतीबाईंच्या परंपरेचा धागा माझ्यापर्यंत पोहोचला.



इरावतीबाईंनी समाजशास्त्र, मानवशास्त्र, भारतविद्या, ललित साहित्य अशा अनेक विषयांवर लिहिले आहे. पण त्यांची मुख्य कामगिरी जर कोणती असेत तर ती म्हणजे त्यांनी आपले आपल्या समाजाबद्दलचे आकलन समृद्ध केले. भारतीय समाजशास्त्रातला सर्वात मोठा प्रश्न जर कोणता असेल तर तो म्हणजे हा समाज कसा निर्माण झाला? इतके नाना तऱ्हेचे लोक असलेला, नाना तऱ्हेच्या भाषा बोलल्या जाणाऱ्या, नाना जातींत विभागलेला पण तरीही स्वत:ला एक मानणारा, एक सामायिक संस्कृती असणारा हा समाज अस्तित्वात आला तरी कसा?

आपल्याकडे समाजशास्त्र शिकायला लागले की या प्रश्नाने मन हैराण होऊन जाते. इतका वैविध्यपूर्ण, मजेशीर पण तितकाच विचित्र आणि चिरफाळलेला समाज पृथ्वीच्या पाठीवर दुसरा कोणताच नसेल. समाजशास्त्रात आणि मानवशास्त्रात आता पुष्कळ संशोधन झाले असले तरी भारतीय समाजाविषयीचे हे कोडे अजूनही उलगडत नाही. खरं तर जितकी नवी माहिती उजेडात येते तितके हे कोडे आणखीनच गुंतागुंतीचे होऊन बसते. समाजशास्त्राच्या प्रत्येक खऱ्या अभ्यासकाला या कोड्याला हात घालावाच लागतो, पण फारच थोडे असे असतात की ज्यांना त्याचा काही थांगपत्ता लागतो.

हे कोडे जरी एक मानले तरी त्यामध्ये मुख्यत: तीन गुंते आहेत. एक म्हणजे इथे निरनिराळे म्हणावे असे जनसमूह कसे निर्माण झाले? निरनिराळे गट निरनिराळ्या काळात इथे वस्तीला आले की एकाच कोणत्यातरी समाजातून ते निर्माण झाले? निरनिराळे असले तर त्यांच्यात एवढी एकात्मता का? आणि एकाच समाजातून उत्पन्न झाले असे मानले तर मग एवढे भेदाभेद का?

दुसरी समस्या इथल्या भाषांसंबंधात आहे. भारतात इतक्या भाषा कशा निर्माण झाल्या आणि पूर्वीच्या काळात त्यांचे एकमेकींशी काय संबंध होते? या निरनिराळ्या भाषांची आई एकच होती की निरनिराळ्या बोलीभाषांच्या घुसळणीतून आजच्या प्रमाण भाषा तयार झाल्या? भाषाशास्त्रज्ञ जसे मानतात तशी भाषांची खरोखरच वेगवेगळी कुळे असतात का? जे लोक वेगवेगळ्या भाषा बोलतात ते लोक म्हणून वेगवेगळे आहेत का?

तिसरी आणि सगळ्यात पेंचदार समस्या जातिव्यवस्थेसंबंधीची आहे. माणसांमाणसातला भेदभाव आणि विषमता पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र असली तरी भारतीय उपखंडात जशी जातव्यवस्थेची उतरंड तयार झाली तशी इतर कुठेही तयार झाली नाही. जातव्यवस्था का निर्माण झाली याचे संपूर्णपणे समाधानकारक उत्तर अद्यापही मिळालेले नाही. इरावतीबाईंच्या काळात म्हणजे आजपासून पन्नास वर्षांपूर्वी तर ती नेमकी कशी आहे याबद्दलही खूप मतभेद होते.

इतर सामाजिक प्रश्न असले तरी जातिव्यवस्था हीच भारतीय उपखंडातील सर्वात वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट असल्याने, भारतातल्या कोणाचाही समाजशास्त्रीय विचार समजून घ्यायचा असेल तर जातीव्यवस्थेसंदर्भात तिचे किंवा त्याचे काय योगदान आहे हे बघायला पाहिजे. इरावतीबाईंच्या बाबतीत तर हे प्राधान्याने करता येईल कारण जातिव्यवस्था हा त्यांच्या अभ्यासाचा विषय राहिलेला आहे.

जात म्हणजे आपापसात लग्ने करणारा, एक विशिष्ट व्यवसाय असणारा, सामाजिक उतरंडीत एक स्थान असणारा आणि एका विशिष्ट भौगोलिक प्रदेशात राहणारा एक गट ही माहिती सर्वांना होती. पण जातीअंतर्गत ज्या पोटजाती होत्या त्यांचे स्वरूप काय याबद्दल वैचारिक गोंधळ होता. जातीतल्या पोटजाती म्हणजे एका मोठ्या समूहातून तुकडे होऊन निघालेले लहान लहान समूह अशी समजूत होती. उदाहरणार्थ, ब्राह्मण ही एक जात समजून त्यामधून महाराष्ट्रात देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे, यजुर्वेदी, माध्यंदिन इत्यादी पोटजाती निघाल्या असे मानले जात होते. पण तसे समजल्यास या पोटजाती आपापसात लग्ने का करत नाहीत आणि त्यांना स्वतंत्र अस्तित्व का आहे या प्रश्नांचे उत्तर मिळत नव्हते. दुसरी गोष्ट म्हणजे एका अखंड ब्राह्मण समूहातून प्रत्येक प्रांतोप्रांती अशा अनेक जाती निघाल्या असतील ही गोष्ट असंभवनीय होती. आणि हा प्रश्न फक्त ब्राह्मणांनाच नाही तर कुणबी, सोनार, लोहार, सुतार, कुंभार अशा सर्वांनाच लागू होता.

इरावतीबाईंच्या बरोबर लक्षात आले की हा गोंधळ जाती-पोटजाती या संज्ञांमुळे होतो आहे. ज्यांना पोटजाती म्हटले जाते त्याच खऱ्या जाती आहेत. युरोपियन समाजशास्त्रज्ञांना भारतातील क्लिष्ट आणि गुंतागुंतीची समाजरचना समजली नव्हती; त्यांच्या डोक्यात वर्ण व जातींचा गोंधळ तर होताच पण आर्य व अनार्य असल्या कल्पनांचेही भूत स्वार होते. त्यामुळे त्यांनी जाती-पोटजाती (कास्ट-सबकास्ट) या संकल्पना स्वीकारल्या. पण भारतीय समाजस्थितीला त्या चपखल बसत नव्हत्या.

पोटजाती याच खऱ्या जाती आहेत हे लक्षात आल्यानंतर इरावतीबाईंनी, पूर्वी ज्यांना जाती म्हणत त्यांना जातिसमूह (कास्ट-क्लस्टर) असे नाव दिले. म्हणजे कुणबी, ब्राह्मण, सोनार हे जातिसमूह झाले; निरनिराळ्या जातींनी बनलेले जातिसमूह. आज वाचताना आपल्याला हे सगळे स्वाभाविक (कॉमन सेन्स) वाटेल पण पन्नास वर्षांपूर्वी इरावतीबाईंनी जेव्हा हे म्हटले तेव्हा ते नवीन होते. जाती कशा तयार झाल्या हे गूढ जरी त्यामुळे पूर्णांशाने उकलले नाही तरी जातव्यवस्थेचे स्वरूप कसे आहे हा गुंता काही प्रमाणात सुटला.

इरावतीबाईंनी ही जी दृष्टी दिली तिचा एक अन्वयार्थ असा होता की समान व्यवसाय असले तरी जातीची खरी ओळख आपापसांत लग्ने करणारा

समूह हीच आहे. जात म्हणजे विस्तारित नातेसंबंधांचे वर्तुळ, जे लग्नांमुळे जुळले आणि विस्तारले जाते. (जातीभेद नष्ट करायचा असेल तर म्हणूनच आंतरजातीय विवाहाला पर्याय नाही). या अन्वयार्थाबद्दल दुमत वा मतभेद होण्याचे कारण नाही. दुसरा अन्वयार्थ असा होता की प्रादेशिक म्हणजे ठिकठिकाणचा समाज हा निरनिराळ्या गटांची जुळणी, मेळणी, विभागणी, पुन्हा जुळणी अशा प्रक्रियांनी बनलेला आहे.

ही जी दुसरी गोष्ट आहे ती भारताच्या समाजरचनेसंदर्भात सर्वात महत्वाची आहे. भारतीय समाज कसा आहे या संदर्भात जेव्हा तर्क-वितर्क केले जात होते तेव्हा इरावतीबाईंनी त्याला गोधडीची उपमा दिली. आपल्या समाजातले निरनिराळे गट हे गोधडीतल्या कापडांच्या तुकड्यांप्रमाणे एकाशी एक आणि एकावर एक जोडलेले आहेत असा त्याचा अर्थ. गोधडी तुकड्या-तुकड्यांनी बनते पण तिची शिवण इतकी घट्ट आणि पक्की असते की सगळ्या तुकड्यांनी मिळून एक सलग, एकसंध, उबदार वस्त्र बनते. गोधडी ही काही फक्त एक बायकी उपमा नव्हे, तिच्यामागे शास्त्रीय आधार आहे. इतर शास्त्रज्ञांना हा समाज एका शेजारी एक असे तुकडे बसवलेल्या कोड्याप्रमाणे (जिग सॉ पझल) वाटत होता. गोधडीची उपमा ही इरावतीबाईंसारख्या एका शहाण्या स्त्रीलाच सुचू शकत होती.

भारतीय समाजाला गोधडी म्हणणे हीच इरावतीबाईंची भारतीय समाजशास्त्राला मुख्य देणगी आहे. कारण इथे जे निरनिराळे गट आहेत त्यांचा एकमेकांशी असणारा संबंध हा गोधडीसारखाच आहे. हे गट कसे आणि कधी उत्पन्न झाले हे जरी आपल्याला पूर्णतया समजले नाही तरी त्यांची एकमेकांशी असणारी जोडणी गोधडीसारखीच आहे. मात्र या गोष्टीचे महत्व किंवा क्रांतिकारकता बाईंच्या पूर्णपणे लक्षात आली होती का याच्याबद्दल माझ्या मनात शंका आहे. कारण हा अन्वयार्थ जर नीट लक्षात घेतला तर केवळ त्या काळातल्याच नाही तर सध्याच्या काळातही भारतीय सांस्कृतिक इतिहासाविषयी ज्या समजुती आहेत-आणि ज्या समजुती इरावतीबाईंच्या इतर लिखाणातून दिसतात-त्यांनाच आव्हान मिळते.

आपल्या इतिहासातली प्रमुख समजूत (खरे तर गैरसमजूत) अशी आहे की वायव्येकडून पशूपालक भटके आर्य लोक आले, त्यांनी नागर सिंधू संस्कृतीवर हल्ला करून ती नष्ट केली, मग ते प्रथम उत्तर भारतात आणि मग दक्षिण भारतात पसरले. त्यांच्यासमोर एतद्देशीय द्रविड लोक टिकले नाहीत. आर्यांनी त्यांना विंध्यापार हाकलले आणि म्हणून द्रविड दक्षिण भारतात आणि आर्य उत्तर भारतात अशी विभागणी झाली. आज त्यांच्यात सरमिसळ झाली असली तरी त्यांच्या भाषांवरून ही ऐतिहासिक विभागणी सिद्ध होते. या दोन मुख्य संस्कृतींशिवाय पूर्व भारतात ईशान्येकडून आलेले मुंडारी लोक आहेत. त्यांच्या भाषा आर्य वा द्रविड यांच्यापेक्षा निराळ्या आहेत. हे आणि नंतर आलेले इतर गट यांच्यामधून भारतीय संस्कृती तयार झाली. यातल्या इतर आणि मोंगलांसारख्या अर्वाचीन काळात आलेल्या समूहांचा संदर्भ वेळोवेळी घेतला जात असला तरी प्राचीन भारतीय सांस्कृतिक इतिहाससंबंधीचे आपले आकलन हे मुख्यत: आर्य-द्रविड संघर्ष या संज्ञेपुरतेच सामावलेले आहे.

याच समजुतीचे पुढचे भयावह रूप असे होते की भारतातले उच्चवर्णीय हे सगळे

आर्यकुलोत्पन्न आहेत तर निम्नवर्णीय (त्यात आदिवासी, दलित, शेतकरी, कारागीर सगळे आले) हे अनार्यकुळांतील आहेत. आर्य बाहेरून आले तर अनार्य स्थानिक होते. यांच्यात जो संघर्ष झाला त्यात अनार्यांचा पराभव झाला व त्यांना आर्यांचे दास्यत्व पत्करावे लागले. हे दास्यत्व किंवा गुलामगिरी सगळ्याच बाबतीतली होती - राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक. या गुलामगिरीतूनच भारतात वर्णव्यवस्था, जातव्यवस्था आणि अस्पृश्यतेसारख्या जुलुमी प्रथा निर्माण झाल्या. मात्र अनार्यांच्या द्रविड किंवा संथाळीसारख्या भाषा पूर्णपणे नष्ट झाल्या नाहीत. त्या भाषा टिकल्या म्हणून त्यांचे सांस्कृतिक अस्तित्व टिकले. किंबहुना या भाषांचे वेगळेपण हाच सांस्कृतिक संघर्षाचा प्रमुख पुरावा आहे.

इरावतीबाईंचे आपल्या समाजाविषयीचे प्रत्यक्ष ज्ञान इतर (विशेषतः पुरूष) समाजशास्त्रज्ञांपेक्षा पुष्कळच उजवे होते पण त्या काळातल्या ज्ञानाला धरून त्यांच्याही डोक्यात आर्य-द्रविड संघर्षाच्या कल्पनांचा पगडा होता. त्यांचे शिक्षण १९२०-३० या दशकात आणि तेसुद्धा युरोपात झाल्यामुळे तसे होणे साहजिक होते. परंतु नंतरच्या दशकातही त्यात फार काही फरक पडला असे वाटत नाही. मराठी लोकांची संस्कृती या पुस्तकाच्या १९६२ सालच्या दुसऱ्या आवृत्तीतही त्या म्हणतात की सिंधु प्रदेशातील नागर-संस्कृतीवर धाड घालणारे लोक हेच ऋग्वेदकालीन आर्य होत. आर्यांचा हा हल्ला व विध्वंसन पुढे दोन सहस्त्रकांनी गझनीच्या महमुदाने केलेल्या हल्ल्यासारखेंच होते (मराठी लोकांची संस्कृती, देशमुख आणि कंपनी, पुणे, १९६२: १९९).

इरावतीबाईंची या संदर्भातील मते ही अर्थातच त्या काळात प्रचलित असणाऱ्या ज्ञानाला धरून होती. त्याबद्दल त्यांना दोष देता येणार नाही. त्या काळात शारीरिक मानवशास्त्राच्या ज्या पद्धती उपलब्ध होत्या आणि प्राचीन इतिहासाबद्दलची जी माहिती मुख्यतः संस्कृत वाङ्मयातून मिळत होती त्यावर ही मते आधारलेली होती. नंतरच्या पन्नास वर्षात अर्थातच अनेक तऱ्हेची नवीन माहिती आणि अनेक पुरावे समोर आले, मानवशास्त्रातल्या पद्धतीही अधिक अचूक झाल्या.

पुरातत्वशास्त्रात जे नवीन संशोधन झाले त्यावरून असे दिसून आले की मोहेंजोदडोमध्ये मिळालेल्या ज्या सांगाड्यांवरच्या खुणांवरून आर्यांच्या आक्रमणाचा सिद्धांत रचला गेला, त्या खुणा लढाईच्या नाहीच आहेत. हडप्पा संस्कृतीचा ऱ्हास हा पर्यावरणाचा उजाडपणा, नद्यांना येणारे पूर आणि समुद्राच्या पाण्याचा दबाव या कारणांनी झाला असावा; बाह्य आक्रमणामुळे नाही. मानवशास्त्रातील संशोधनाप्रमाणे माणसांच्या वेगवेगळ्या प्रजाती नसतात तर माणसां-माणसांतले फरक हे पर्यावरणामुळे, जैविक घडामोडींमुळे आणि सरमिसळणीतून होत असतात. त्यामुळे शारीरिक मानवशास्त्रात आता डोक्याची किंवा नाकाची मापे घेऊन त्यावरून माणसांच्या वंशाविषयी ठोकताळे मानणे कालबाह्य झाले आहे.

एवढेच नाही तर रक्ताच्या तपासणीवरून असे अंदाज बांधणे हेसुद्धा मर्यादित उपयोगाचे आहे हे लक्षात आले आहे. जागतिक पातळीवर तर आता वंश (रेस) ही कल्पना रद्दबातल ठरवण्यात आली आहे. आता मानवी डी.एन.ए. चे पृथक्करण करून त्यावरून मानवाच्या जैविक घडामोडींविषयी निष्कर्ष

काढण्याचे शास्त्र उदयास आले आहे. ते निष्कर्षही काही अंतिम आहेत असे नाही; त्याची तर अद्याप सुरवात आहे. पण त्यात तर्कापेक्षा वस्तूनिष्ठतेला जास्त स्थान आहे. जुन्या काळात अपुऱ्या माहितीवरून तर्क करणे एवढेच संशोधकांच्या हातात होते. अपुऱ्या माहितीवरून घाईघाईने एवढ्या संवेदनशील विषयाबद्दल तर्क करावे का असा प्रश्न जरूर विचारता येईल, पण कोणत्याही काळातल्या संशोधकांना साहसी मानीवे (हायपोथिसेस) ही पुढे मांडावीच लागतात. त्याबद्दल त्यांना दोष देता येणार नाही.

मानवाच्या भारतातील आद्य वसाहतीचा काळ इतका आधीचा आहे की कोण आधीचे आणि कोण नंतरचे हा प्रश्न खरं तर गैरलागू आहे. भारतात सुमारे २०,००० वर्षांपासून मानवी वसतीचे सातत्य आहे आणि एका अवस्थेतून दुसरी अवस्था उमलत आलेली आहे. गेल्या पंधरा ते वीस हजार वर्षांच्या काळात उपखंडातल्या हवामानात पुष्कळच बदल झाले आहेत, जगण्याच्या पद्धती बदलल्या आहेत, मानवी स्थलांतरे तर अनेक झाली आहेत.

शिकार आणि अन्नसंग्राहक जीवन जगणाऱ्यांनी शेती व्यवसाय स्वीकारणे, पाऊसमान कमी होऊन पर्यावरण उजाड झाल्याने शेतकऱ्यांनी पशुपालनाकडे वळणे, शेतीत भागत नाही म्हणून काहींनी कायमचा व्यापारी पेशा स्वीकारणे, परकीय हल्लेखोरांपासून बचाव करण्यासाठी काहींनी परत जंगलाचा आणि दऱ्याखोऱ्यांचा आश्रय घेणे, शेतीच्या अर्थव्यवस्थेत काही समूहांना दास किंवा सेवक बनवले जाणे, काही समूहांनी जगण्यासाठी कायमचीच भटकंती स्वीकारणे आणि नवे नवे समूह समाजात सामील होणे अशा नानाविध प्रक्रिया या देशात निरनिराळ्या काळात घडलेल्या आहेत.

आदिम काळापासून जे लोक इथे राहात होते आणि जे लोक निरनिराळ्या काळात इथे आले, त्यांच्यामधूनच इथला ग्रामीण आणि नागरी समाज निर्माण झाला आहे. इतिहासातल्या निरनिराळ्या कालखंडात नाना प्रकारचे लोक इथे आले आणि इथल्या प्रवाहात सामील होऊन त्यांनी हा प्रवाह पुष्ट आणि समृद्ध केला. त्या प्रत्येकाने आपले काहीतरी योगदान ह्या परंपरेला दिले; कुणी प्रभावी भाषा दिली, कुणी शिल्पकला आणली, कुणी स्थापत्यशास्त्र आणले, कुणी कपड्यालत्त्यांची पद्धत बदलली. त्यातल्या काहींनी आपली काही वैशिष्ट्ये अबाधित ठेवली, काही पूर्णपणे नाहीसे होऊन गेले. या सगळ्या गुंतागुंतीच्या प्रक्रिया समजुन न घेता केवळ आर्य-द्रविड संघर्षाच्या विचारव्यूहात हा प्राचीन इतिहास बघणे हे अशास्त्रीय तर आहेच पण स्वाभाविक ज्ञानाला (कॉमन सेन्सलाही) न पटणारे आहे.

मात्र या सगळ्या शास्त्रज्ञांत इरावतीबाईंचे वैशिष्ट्य हे की त्यांना भारतीय समाजरचनेच्या गुंतागुंतीचा सुगावा निश्चितच लागलेला होता आणि त्यांच्या वृत्तीत शोधण्याचा, सापडवण्याचा भाव तुलनेने अधिक होता. साहसी विधाने त्यांनीही केलेली आहेत पण एक मराठमोळी स्त्री असल्याने असेल कदाचित, ज्याबद्दल नक्की माहीत नाही तिथे त्यांनी ठाशीव निष्कर्ष काढण्याचे टाळलेले आहे. त्या त्या ठिकाणी त्या आपली साशंकता व्यक्त करतात. मुख्य म्हणजे त्यांची दृष्टी ही लोककेंद्री होती. आजच्या समाजशास्त्रात वंचितांचा अभ्यास करण्याचा जो विशेष दृष्टीकोन आहे (सुबाल्टर्न स्टडीज) तो त्यावेळी जरी प्रचलित नसला तरी

धनगर, रामोशी, कुंभार, कुणबी इत्यादी बहुजनसमाजांशी जोडलेल्या असल्याने इरावतीबाईंचा दृष्टीकोन अधिक उदार आणि व्यापक होता. त्यांच्या या दृष्टीकोनामुळे नंतरच्या काळात जे ज्ञान तयार झाले किंवा आजच्या महाराष्ट्रात कॉ. शरद पाटील, डॉ. रा.चिं. ढेरे वा रा. विश्वनाथ खैरे यांनी जे पर्यायी विचारव्यूह वा मानीवे मांडली आहेत त्यांचे महत्व त्यांना अधिक चांगल्या रीतीने समजू शकले असते.

इरावतीबाईंच्या वैचारिक मांडणीत (कन्सेप्च्युअल फ्रेमवर्क) ही ताकद किंवा लवचिकता होती हे मला त्यांच्या समाजविचाराचे सर्वात प्रधान वैशिष्ट्य वाटते. कोणतेही ज्ञान परिपूर्ण असत नाही आणि त्याला त्या त्या स्थळकाळाच्या मर्यादा तर असतातच पण संशोधकाचा दृष्टिकोन खऱ्या अर्थाने शोधकाचा आहे की नाही यावरूनच त्याचा योगदानाचे महत्व ठरत असते. इरावतीबाईंची भारतीय समाजाबद्दलची जी प्रमुख दृष्टी आहे (सेन्ट्रल इनसाइट) ती त्यांच्या गोधडीच्या उपमेत व्यक्त झाली आहे आणि ती अशी आहे की त्यांच्या नंतरच्या काळात निर्माण झालेल्या ज्ञानाने वा माहितीने ती बाधीत झालेली नाही. किंबहुना तिच्या मांडणीत ही ताकद आहे की नंतर निर्माण झालेले ज्ञान ती सहजपणे कवेत घेऊ शकते.

समाजाला गोधडी म्हणणे यात फार मोठा अन्वयार्थ आहे. समाजातल्या निरनिराळ्या गटांना स्वतंत्र आकारमान असले तरी स्वतंत्र अस्तित्व नसते. गोधडीतल्या तुकड्यांचा आकार वेगवेगळा असतो, रंग वेगवेगळा असतो, कापडाचा पोत, स्पर्श आणि नक्षी वेगवेगळी असते. पण त्यांची जेव्हा गोधडी बनते त्यावेळी प्रत्येक तुकड्याचा आकार आणि रंग दिसत राहिला तरी तुकड्याचे म्हणून स्वतंत्र अस्तित्व राहत नाही. आणि काळाच्या प्रवाहात अनेक वेळा धुतला गेल्यावर तर पोत आणि रंगही एकसारखा होऊन जातो. ते एकच वस्त्र होते. आणि तुकडे जरी निरनिराळ्या कापडाचे असले तरी मुळात त्यातला कापसाचा तंतू तर एकच असतो.

माणसांचेही असेच आहे. काळाच्या ओघात, परिस्थितीच्या रेट्याने माणसांचे निरनिराळे गट तयार होतात. ते एकमेकांच्या जवळ येतात, मिसळतात, तूटतात, दूर होतात, पुन्हा एकत्र येतात. ही प्रक्रिया सदैव चालू राहते. आपण लहानश्या कालखंडात जगतो म्हणून आपल्या लक्षात ती येत नाही. काळाचा लांबचा पसारा पाहिला की मात्र समजते. हे समजणे म्हणजेच समाजाचे आकलन होणे. इरावतीबाईंमुळे आपले हे आकलन समृद्ध झाले.

इरावतीबाई एक कर्तबगार पंडिता होत्या. त्यांनी विपुल समाजशास्त्रीय व ललित लेखन केले. थोडेसे अलंकारिक भाषेत बोलायचे झाले तर असे म्हणता येईल की मराठीच्या अंगावर त्यांनी अनेक भरजरी वस्त्रे चढवली, पण ही गोधडीची जी भेट त्यांनी आपल्याला दिली ती त्यांची सर्वोत्तम भेट आहे. भावी काळात स्वतःच्या भूमीवर ठाण मांडण्यासाठी, एक दणकट वैचारिक अंथरूण म्हणून तर ती आपल्याला उपयोगी पडेलच पण जागतिकीकरणाच्या थंडीवाऱ्यात एक उबदार, भावनिक पांघरूण म्हणूनही कामास येईल.

■■

*(महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे येथे १० डिसेंबर २००५ रोजी प्रा. इरावती कर्वे जन्मशताब्दीनिमित्त सादर केलेला निबंध. याचा काही अंश सकाळ, पुणे अंकात दि. ११ डिसेंबर २००५ रोजी प्रसिद्ध झाला आहे.)*

मागोवा

# डॉ. इरावती कर्वे यांचे 'परिपूर्ती' मधील स्त्रीविचार

डॉ. लता छत्रे

इरावती कर्वे हे एक व्यासंगी व्यक्तिमत्त्व. मानवशास्त्राच्या अभ्यासक म्हणून त्यांचा मानवशास्त्राचा अभ्यास होताच; पण लहानपणी रँग्लर परांजप्यांच्या घरात राहिल्यामुळे संस्कृत तसेच पाश्चात्य वाङ्‌मयाचा त्यांना केवळ परिचयच होता, असे नाही तर त्यांच्या मनावर त्याचे संस्कारही झाले होते. त्यातूनच त्यांचा संस्कृतीच्या अभ्यासासाठी आवश्यक असणारा दृष्टिकोन तयार होत गेला.

याशिवाय कर्वेबाई स्वत: तत्त्वज्ञ होत्याच, पण त्यांचा भारतीय धर्म आणि तत्त्वज्ञान यांचा अभ्यास होता. त्यामुळेच त्यांच्यामध्ये संस्कृतीचा अभ्यास करताना मानवशास्त्राला आवश्यक असणारी, संस्कृतीशी समरस होऊन जाणारी वृत्ती जशी दिसते, तशीच संस्कृतीचा अन्वयार्थ लावत असताना आवश्यक असणारी तत्त्वज्ञानाची तटस्थ आणि विचारशील वृत्तीही दिसते. थोडक्यात त्यांच्या लिखाणामध्ये मानवशास्त्र आणि तत्त्वज्ञान यांचा सुरेल संगम झालेला दिसतो. संस्कृतीचे स्वरूप, तिची जडणघडण सांगत असतानाच त्या मानवी स्वभावाचे विविध पैलू सांगत, त्याचे अंत:करण उलगडत जातात; तर कधी मानवी स्वभावाची जडणघडण सांगत असताना संस्कृतीचे स्वरूप उलगडत जातात.

संस्कृतीचे स्वरूप सांगत असताना इरावती कर्वे यांनी 'मनुष्य समाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तूरूप निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी



पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती' अशी संस्कृतीची व्याख्या केलेली आहे. या व्याख्येनुसार संस्कृतीच्या दोन बाजू असतात; वस्तुरुप आणि मनोमय. या दोन संस्कृतीच्या बाजूंमधील संबंधांच्या संदर्भात आपल्याला असे म्हणता येईल की, मनोमय संस्कृतीच्या आधारे आपल्याला वस्तूरूप संस्कृतीचा अन्वयार्थ लावता येतो, तर वस्तूरुप संस्कृतीमध्ये मनोमय संस्कृती अभिव्यक्त होत असते.

अर्थात मनोमय संस्कृती ही केवळ वस्तूरुप संस्कृतीमध्ये अभिव्यक्त होते, असे नाही तर रुढी, परंपरा, रीतीरिवाज यांच्यामध्येही अभिव्यक्त होत असते. या मनोमय संस्कृतीच्या आधारे आपल्याला त्या संस्कृतीच्या तात्त्विक, तसेच तात्त्विक मानवशास्त्रीय विचारांचा पैलू दिसतो. या सांस्कृतिक घटनांचे तसेच रीतीरिवाज, रुढीपरंपरा यांच्यावर

आधारीत संस्कृतीचे स्वरूप इरावती कर्वे यांनी आपल्या 'परिपूर्ती' या ललित निबंधाच्या संग्रहामध्ये स्पष्ट केलेले आहेच; पण त्या स्वरुपामागे असलेले तत्त्वज्ञान आणि तात्त्विक मानवशास्त्रही त्यांनी उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

'परिपूर्ती' हा कर्वेबाईंचा १८ ललित निबंधांचा संग्रह आहे. हे निबंध वेगवेगळ्या व्यक्तींना आणि प्रसंगांना अनुसरुन लिहिलेले असले तरी त्या निबंधांच्या माध्यमातून कर्वेबाई मानवी स्वभाव आणि संस्कृती यांच्यातील संबंध सांगण्याचा प्रयत्न करतात. कधी हा संबंध स्त्री आणि संस्कृती यांच्यामधला असतो, तर कधी तो स्त्री-पुरुष यांच्यामधील नाते आणि संस्कृती यांच्यामधील असतो. हा संबंध उलगडत असताना कर्वेबाई भारतीय स्त्रीच्या मानसिकतेवर प्रकाश टाकतात. 'परिपूर्ती' या ललित निबंधाच्या आधारे कर्वेबाईंनी उलगडलेली भारतीय स्त्रीची मानसिकता समजून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखामध्ये केलेला आहे.

जेव्हा आपण भारतीय स्त्रीच्या मानसिकतेचा विचार करायला लागतो तेव्हा या मानसिकतेचे सामाजिक, सांस्कृतिक, भावनिक असे विविध आयाम आपल्यापुढे येऊ लागतात. हे आयाम एकमेकांमध्ये इतके सुंदर गुंफलेले असतात की त्यातून भारतीय स्त्रीचे एकसंध रुप पुढे येते आणि त्यातूनच भारतीय संस्कृतीचे अंतरंग उलगडत जाते; पण त्याबरोबर भारतीय संस्कृतीमधील एकजिनसीपणाचे एक रहस्य स्त्रीस्वभावात कसे दडून बसले आहे याची प्रचितीही येते. भारतीय स्त्रीचे हे एकजिनसी, परिपूर्ण आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्व कर्वेबाईंच्या 'परिपूर्ती' या छोटेखानी ललित निबंधातून उलगडत जाते.

स्त्रीच्या बहुआयामी स्वरूपाचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा पहिला प्रश्न उपस्थित होतो, तो म्हणजे स्त्रीचा स्वभाव हा संस्कृतिनिरपेक्ष असतो की नसतो? स्त्रीचा संस्कृतिनिरपेक्ष स्वभाव म्हणजे एक स्त्री म्हणून असलेला स्त्रीचा स्वाभाविक स्वभाव आणि तिचा संस्कृतिसापेक्ष स्वभाव म्हणजे स्त्रीच्या स्वाभाविक स्वभावाची, ती ज्या संस्कृतीमध्ये वाढलेली असेल त्यानुसार होणारी अभिव्यक्ती. 'परिपूर्ती' या ललित निबंध संग्रहाच्या आधारे इरावतीबाईंची याविषयीची काय मते असतील याचा जेव्हा आपण विचार करतो, तेव्हा लक्षात येते की त्यांच्या मते स्त्रीचा स्वभाव संस्कृतिनिरपेक्षही असतो आणि संस्कृतीसापेक्षही असतो. उदा. मातृत्व हा स्त्रीचा संस्कृतीनिरपेक्ष स्वभाव आहे.

मातृत्वाला सार्वत्रिक सत्य म्हणायला काहीच हरकत नसावी. तो स्त्रीचा संस्कृतीनिरपेक्ष स्वभाव आहे. मातृत्व ही स्त्रीची खरी ओळख आहे.त्याशिवाय एक स्त्री म्हणून तिची ओळख कशी अपुरी आहे हे कर्वेबाईंनी 'परिपूर्ती' या निबंधामध्ये दाखवून दिलेले आहे. कर्वेबाई एका समारंभासाठी गेलेल्या असतात. त्यांचा परिचय त्या अमक्याची पत्नी, अमक्याची सून असा करून देण्यात येतो. परंतु या परिचयात काहीतरी राहून गेले आहे असे त्यांना सारखे जाणवत असते. समारंभ संपून घरी येताना शाळेतील एक मुलगा आपल्या मित्रांना सांगतो, 'अरे ही आपल्या वर्गातील कर्वेची आई.' हे ऐकल्यावर त्यांना आपला परिचय पूर्ण झाला आहे याचे समाधान वाटते.

अर्थात मातृत्वाचा हा स्वभाव केवळ विवाहित, मुलाला जन्म दिलेल्या स्त्रीमध्येच असतो असे नाही तर तो अविवाहित स्त्रीमध्ये देखील कसा

असतो, हे कर्वेबाईंनी 'सुप्तइच्छा' या निबंधामध्ये मिशनरीबाईची आई होण्याची सुप्त इच्छा वेगवेगळ्या प्रसंगातून कशी अभिव्यक्त होते, हे त्यांनी अतिशय सुरेख मांडून दाखविलेले आहे.

मूल हे स्त्रीचे सर्वस्व असते. त्यासाठी ती वाटेल ते करायला धजावते. आपल्या बाळासाठी बुरुजावरुन उडी मारणाऱ्या हिरकणीची गोष्ट तर प्रसिद्धच आहे. आपल्या बाळावर संस्कार व्हावेत म्हणून ती धडपडत असते. धांगडधिंगा घालणाऱ्या पोरांवर रागवत असते, ओरडत असते. बालमानसशास्त्रातील सगळे नियम धुडकावून देत असते. कारण तिचा विश्वास असतो की आपले मूल या धडपडण्यातून आणि आपल्या रागवण्यातून शहाणे होणार आहे, जबाबदार होणार आहे. एका आईचा हा विश्वास आणि प्रेम कर्वेबाईंनी 'वेड लागलेले घर' या निबंधामध्ये सुरेख मांडला आहेच; पण 'प्रेमाची रीत' या निबंधामध्येही दाखवून दिलेले आहे.

'वेड लागलेले घर' हा निबंध दोन दृष्टिकोनांतून महत्त्वाचा आहे. एक म्हणजे स्त्रीचे मातृप्रेम आणि दुसरे म्हणजे शिक्षणपद्धती विषयी कर्वेबाईंचे विचार. भारतीय स्त्रीचे एक वैशिष्ट्य आहे, ती कितीही शिकली, सावरली तरी घर हे तिचे विश्व असते. घरावर, आपल्या मुलाबाळांवर तिचे अतीव प्रेम असते. त्यामुळे मुले धडपडली, त्यांनी गोंधळ केला तर ती जरुर चिडते, रागावते; पण तिची मुले जेव्हा शहाण्यासारखी, न धडपडता वागतात तेव्हा मात्र तिला जरा गडबडल्यासारखे, चुकल्यासारखे वाटते. अशाप्रकारे आईला आपल्या मुलांबद्दल वाटणे ही देखील एक प्रेमाची रीतच आहे.

आपण प्रत्येक जणच सामाजिकीकरण आणि संस्कृतिकीकरणाच्या माध्यमातून शिकत असतो. कधी हे शिकणे स्वयं म्हणणे आपलेच आपण धडपडत, ठेचकाळत शिकणे असते तर कधी दुसऱ्यांनी शिकवणे असते. आता दुसऱ्यांनी शिकवण्याचा मुद्दा निघतो तेव्हा ते कसे शिकवायचे हा प्रश्न उपस्थित होतो. तेव्हा साहजिकच रागावून, मारून, मुटकून म्हणजेच पंतोजीपद्धतीने शिकवायचे का? त्यामुळे मानसिक विकास खुंटणार नाही का? असे प्रश्न उपस्थित होतात.

कर्वेबाईंना कदाचित यावर असे सुचवायचे असेल की जर मुलांना रागावले नाही, ती धडपडली नाहीत तरच त्यांचा बौद्धिक विकास थांबेल आणि ती अधिकाधिक निष्काळजी आणि बेफिकीर बनतील. बाईंना आपले हे विचार आई या नात्याने 'वेड लागलेले घर' यामध्ये मांडायचे असावेत. 'प्रेमाची रीत' या निबंधात झोपडीत रहाणारी स्त्री आपला मुलगा पडल्यावर त्याला कुठे लागलंय हे बघण्यापूर्वी त्याला रट्टे देते आणि म्हणते, 'पटकी झाली मेल्याला! कशाला तडफडायला रस्त्यावर गेला होता रे? आई भवानीची खैर म्हणून वाचलास!' या तिच्या वागण्यातून आणि बोलण्यातून त्याच्यावरचे तिचे प्रेमच दिसते.

स्त्री ही स्वत:साठी नसतेच, ती कायम दुसऱ्यांसाठीच असते. स्त्रीवादी म्हणतात त्याप्रमाणे असे संस्कार जन्मापासूनच समाजाने आणि संस्कृतीने तिच्यावर केले असतीलच; पण ती वस्तुस्थिती आहे. तिने तसे असावे का? समाजाने तिच्या या स्वभावाचा गैरफायदा घ्यायचा का? हे नक्कीच मानवतावादी दृष्टिकोनातून महत्त्वाचे मुद्दे आहेत. पण त्याचा विचार येथे करणे अप्रस्तुत आहे.

तिचे हे दुसऱ्यासाठी करणे एकापरीने

स्वत:साठीच करण्यासारखे असते. कारण ती ज्या दुसऱ्यासाठी करीत असते. ते एकतर तिचा प्रियतम, परमेश्वर असतो किंवा त्या परमेश्वराच्या छोट्या छोट्या प्रतिकृती असतात. त्या छोट्या प्रतिकृतीमध्ये तिला तिचा परमेश्वर दिसत असतो. आपल्या परमेश्वराचे करण्यातच तिचा आनंद कसा सामावलेला असतो, याचे सुरेख चित्रण कर्वेबाईंनी 'स्त्री-राज्य' या कथेत केलेले आहे. हीच भारतीय स्त्रीची मानसिकता आहे. या मानसिकतेमुळेच भारतामध्ये कुटुंबव्यवस्था भक्कम आहे.

कुटुंबव्यवस्थेच्या भक्कमपणाचा विषय निघाला की साहजिकच विचार येऊन थांबतो तो स्त्री-पुरुष यांच्यातील नातेसंबंधाशी. हे नाते आई-मुलाचे असेल, पती-पत्नीचे असेल, प्रियकर-प्रेयसीचे असेल किंवा मुला-मुलींमधील असेल. या प्रत्येक नातेसंबंधातील हळुवारपणा, प्रेमामुळे येणारा अधिकार, सर्वांच्या संरक्षणाची देखभाल करण्याच्या भावनेमुळे आलेला मनाचा मोठेपणा आणि जबाबदारीची जाणीव आणि त्याचबरोबर कोणताही स्वार्थी हेतू मनात नसल्यामुळे आलेला भाबडेपणा, निरागसपणा इरावतीबाईंनी 'गौराई' या निबंधात गौरीच्या रुपकाच्या माध्यामातून दाखवून दिला आहे.

गौराई म्हणजेच गौरी. गौरी भारतीय स्त्रीची मानसिकता आहे. स्त्रीचे कोणत्याही प्रकारे उदात्तीकरण न करता असे म्हणता येते की, गौरी भोळीभाबडी, शिवावर नितांत प्रेम करणारी, त्याला सांभाळणारी, त्याच्याशी भांडणारी, पण त्याचवेळी नवऱ्याचा केलेला अपमान सहन न झाल्यामुळे अग्नीत प्रवेश करणारी, शिव या दैवताभोवतीच फिरणारी अशी आहे. गौरी ही स्त्रीस्वभावाचे प्रातिनिधिक रूप आहे. ती सर्वांना बरोबर घेऊन जाणारी, त्यांच्यावर अधिकार गाजवणारी आहे. भारतीय स्त्रीची ही मानसिकताच भारतातील कुटुंबसंस्थेला अबाधित ठेवण्यास कारणीभूत तर झाली नसेल ना? ही गौरी त्यांना आपल्या मित्रांची काळजी घेणाऱ्या लहान मुलींच्यात जशी दिसते तशीच आपले वय झाले, आपल्याला कष्ट होत नाही म्हणून कामावर जाऊ नकोस म्हणून प्रेमळ आग्रह करतो हे सांगणाऱ्या वृद्धेमध्येही दिसते. स्त्री राज्यातील स्त्रिया याच भावनेतून घरातील पुरुष मंडळींची सेवा करीत होत्या.

स्त्री-पुरुष यांच्यातील नातेसंबंध इरावतीबाईंनी एका वेगळ्या पद्धतीने 'स्त्री व संस्कृती' या निबंधामध्ये दाखवून दिला आहे. चांगले, वाईट, सुसंस्कृत, असंस्कृत या सर्व नैतिक संकल्पना आहेत. प्रत्येकाने चांगले, सुसंस्कृत असावे. वाईट, असंस्कृत असू नये हे नीतिविचार झाले. या संकल्पनांचे नेमके अर्थ काय याची तात्त्विक चर्चा बरीच आहे. पण या तात्त्विक चर्चा मात्र मानवी स्वभावापुढे, संस्कृतीपुढे कशा निष्प्रभ ठरतात हे या लेखिकेने या निबंधात दाखवून दिलेले आहे.

ज्या समाजात नवऱ्याने पत्नीला मारणे रीत असेल आणि पत्नीनेही ते हसतमुखाने स्वीकारलेले असेल, किंबहुना प्रेमाची रीत म्हणून तिचा स्वीकार केला असेल तर अशा समाजात सुसंस्कृत असंस्कृतची व्याख्या कशी करणार? तोच मुद्दा सुशिक्षित स्त्रीच्या संदर्भात उपस्थित होतो. स्त्री सुशिक्षित असली तरी तिला तडफदार, रागावणारा, प्रेम करणारा पण त्यावेळी तिला मुठीत ठेवणारा, तिच्यावर अधिकार गाजवणारा नवरा हवा असतो.

म्हणूनच कर्वेबाईंच्या मनात प्रश्न निर्माण होतो, वरवर संस्कृतीची आभरणे असलेल्या पण आतून रानटी पौरुषाची पूजा करणाऱ्या ह्या तडफदार तरुणी आणि सुसंस्कृत, शिक्षणाने कोमल मनोवृत्ती झालेले अहिंसक तरुण ह्यांची जोडी एकत्र नांदणार कशी?

स्त्री पुरुषांमधील नाते आणखी एका पद्धतीने कर्वेबाईंनी 'वारकरी' या निबंधामध्ये दाखविले आहे. समाजामध्ये स्त्रीला दुय्यम स्थान देणारा, तिला आर्थिक, राजकीय अधिकार न देणाऱ्या पुरुषाने दैनंदिन जीवनातील वागणे मात्र त्याच्या जातीने कसे ठरते हे या निबंधात दिसून येते.

मानवशास्त्राच्या जिज्ञासेने कर्वेबाई ब्राह्मणांच्या दिंडीमध्ये तसेच मराठ्यांच्या दिंडीमध्येही मिसळल्या तेव्हा त्यांना स्त्री-पुरुषांमधील नात्यांना सामाजिक वळण कसे असते हे जाणवले आणि त्यांनी त्याचे वर्णन वस्तुनिष्ठपणे केलेले आहे. ब्राह्मणांच्या दिंडीमधील स्त्रिया रांधण्यापासून सर्व कामे करीत असत. मराठ्यांच्या दिंडीमध्ये मात्र बायका स्वयंपाक करीत; पण वाढणे, पाणी आणणे, मोठे सामान मोटारीत भरणे आदी कामे पुरुष करीत. एकूण बायका पुरुषांचे वागणे जास्त मोकळे होते. याउलट ब्राह्मणांच्या दिंडीमध्ये बायका गप्प गप्पच असत.

स्त्रीची अशाप्रकारे मानसिकता उलगडून दाखवणाऱ्या कर्वेबाईंना स्त्रीच्या यातनांची, त्यांच्या दु:खाची जाणीव नव्हती असे नक्कीच नाही. यासंदर्भात आजच्या स्त्रीवादी लेखिकांप्रमाणे त्यांनी स्त्रीला दुय्यम ठरवणाऱ्या सामाजिक आणि सांस्कृतिक न्यायाला फैलावर धरले नसेलही; पण या न्यायामुळेच स्त्रीवर अन्याय झाला याची पुरेपुर जाणीव त्यांना आहे. त्याचप्रमाणे हजारो वर्षे झाली स्त्रिया शिकल्या, सवरल्या, मोठमोठ्या जबाबदाऱ्या उचलू लागल्या तरी त्यांच्या सामाजिक स्थानामध्ये काही बदल झाला नाही, याची खंत त्यांना जरुर आहे. भारतीय स्त्रीविषयीच्या या भावना त्यांनी 'जन्मांतरीची भेट' 'बीज-क्षेत्र' आणि 'जुळी मुले' या निबंधामधून व्यक्त केल्या आहेत.

'जन्मांतरीची भेट' हा निबंध उत्खननात सापडलेल्या एका स्त्रीच्या सांगाड्याविषयी आहे. उत्तर गुजराथमध्ये कर्वेबाई १५०० वर्षांपूर्वीच्या संस्कृतीचा शोध घेण्याच्या निमित्ताने गेल्या होत्या. त्या उत्खननामध्ये बाईंना एका तरुणाचा, वृद्धाचा, कुत्र्याचा तसेच एका तरुण स्त्रीचा सांगाडा सापडला. एकाच ठिकाणी सापडलेल्या या तीनही सांगाड्यांवर एकत्रित विचार करुन त्या काळातील संस्कृतीविषयी काही अन्वयार्थ लावता येतो का याचा विचार करीत असताना त्यांच्या असे लक्षात आले की वसाहतीमध्ये एखादा पुरुष मेला असावा व त्याला पुरताना त्याचे नोकरचाकर, हत्यारे, पत्नी आदींना त्याच्यासोबत पुरले असावे.

त्यातील स्त्रीच्या सांगाड्यावरून त्यांच्या असे लक्षात आले की तो स्त्री अल्पवयीन होती. ती सांगाडा पाहिल्यावर त्यांच्या मनात विचार आला, 'तू ती मीच कां ग?' त्यांना यातून असे ध्वनित करावयाचे असावे की ती स्त्री की जिला फुलण्यापूर्वीच समाजाच्या दुष्ट रीतीरिवाजानं गाडले होते. तिच्या भावभावनांचा कुसकुटा केला होता.

जी युगानुयुगे या बंदिस्त समाजातून बाहेर पडण्यासाठी धडपडत होती, जी इतकी वर्षे अंधारात कोंडली गेली होती. तिला सूर्यप्रकाशाचा कवडसासुद्धा

दिसत नव्हता, तिला आज शिकून सावरून शहाणी झालेली स्त्री बाहेर काढत होती. सूर्यप्रकाशाचे दर्शन देत होती. येथे कर्वेबाई नकळत सामाजिक, सांस्कृतिक बंधनात जखडलेल्या स्त्रीची स्वत:शीच तुलना करीत होत्या. जणुकाही त्यांना येथे असे सांगायचे असावे की स्त्रीच्या वेदना सारख्याच असतात. आज स्त्री शिकली, सवरली असली, जरा मोकळा श्वास घ्यायला तिला संधी मिळाली असली तरी आजही तिचे जीवन सामाजिक, सांस्कृतिक रीतीरिवाजांच्या चौकटीत बंदिस्तच आहे.

समाजामधील स्त्रीचे दुय्यम स्थान अधोरेखित करण्यासाठी भारतीय संस्कृतीमध्ये वापरलेली संकल्पना म्हणजे 'बीजक्षेत्र'. या संकल्पनेचा स्त्रीवादी अन्वयार्थ लावत असताना स्त्रीयांच्या दुय्यम स्थानाचे समर्थन करण्यासाठी पुरुषांच्या सुपीक डोक्यातून निघालेली संकल्पना असा तिचा अन्वयार्थ लावला जातो. परंतु प्रत्यक्षात मात्र या संकल्पनेचा वापर स्त्री आणि पुरुषांनी आपल्या स्वार्थासाठी व्यवस्थिपणे कसा केला याचा विचार कर्वेबाईंनी 'बीजक्षेत्र' या निबंधात मांडला आहे.

स्त्री ही चामड्याची पिशवी आहे हा विचार केवळ अशिक्षित स्त्री आपल्या सुनेविषयी मांडत नाही, तर सत्यवतीसारखी राजघराण्यातील स्त्रीसुद्धा असाच विचार करते. दोघींमध्ये फरक इतकाच असतो की अशिक्षित स्त्री असा विचार आपला मुलगा श्रेष्ठ आणि सून दुय्यम हे सांगण्यासाठी करते, तर सत्यवती कुरुवंशाची वृद्धी व्हावी म्हणून करते. म्हणजेच दोघीही स्त्रीकडे साधन म्हणूनच बघतात. असे करताना आपण एका स्त्रीवरच अन्याय करीत आहोत, अशी भावना त्यांना शिवतही नाही. एकूण काय बीजक्षेत्राचा वापर स्त्रीवर अन्याय करण्यासाठी तर कधी स्वत:ची सत्ता स्थापित करण्यासाठीच वापरला गेला, कधी हा वापर स्त्रीने केला तर कधी पुरुषाने. हे इरावतीबाईंना या निबंधात सांगावयाचे आहे.

बीजक्षेत्र न्यायाने स्त्रीला समाजामध्ये दुय्यम स्थान का याचे समर्थन केले, तर जुळी मुले असणे या वस्तुस्थितीने स्त्रीला व्यभिचारी, अनैतिक ठरविले. रामायण, महाभारत काळात स्त्रीला व्यभिचारी ठरविण्याचे साधन म्हणजे स्त्रीला जुळी मुले असणे. त्या काळातील ती जनरीतच होती. म्हणूनच रामाला या जनरितीपुढे मान तुकवून सीतेचा त्याग करावा लागला आणि कुंतीला अश्विनकुमारांना आवाहन करण्याचा मंत्र माद्रीला दिल्याबद्दल पश्चाताप झाला. इरावती कर्वे यांनी 'जुळी मुले' या निबंधात जनरीत आणि शास्त्र यांच्यातील सांस्कृतिक संबंध सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अशातऱ्हेने 'परिपूर्ती' या कर्वेबाईंच्या ललित निबंधांच्या संग्रहाच्या आधारे भारतीय संस्कृतीमध्ये वाढलेल्या स्त्रीच्या मानसिकतेचा परिचय होतो. असा परिचय करुन घेत असताना आपल्याला असे दिसते की त्या कधी स्वत:च एक मराठी स्त्री म्हणून अनुभव घेतात तर कधी त्या घटना विश्वाच्या बाहेर राहून त्या घटनांमधील स्त्रीच्या चालण्याबोलण्याचा अन्वयार्थ लावतात. त्यांच्या या स्वानुभवातून तसेच अन्वयार्थातून एका सुखवस्तू, मध्यमवर्गीय, सुशिक्षित, समजूतदार अशी भारतीय स्त्री साकारते. ही स्त्री स्वत:च्या कुटुंबात, तसेच बाह्य समाजात अतिशय आत्मविश्वासाने वावरते. आपल्या सांस्कृतिक मूल्यांचे जतन करीत असतानाच इतरांच्या सांस्कृतिक मूल्यांचा आदर करते. ■■

ग्रंथ-परिचय

# Kinship Organization in India

# भारतातील नातेदारी पद्धतीचे संघटन

प्रा. रा. के. मुटाटकर

इरावती कर्वे यांनी लिहिलेले भारतातील नातेदारी पद्धतीवरील हे एकमेव पुस्तक आहे. मानवशास्त्रात नातेदारी पद्धती व धर्म या दोन संस्थांबाबत सर्वात जास्त संशोधन आणि लेखन झाले आहे. भारतात समाज विज्ञान अंतर्गत सर्वात जास्त चर्चा व लेखन जाती संस्थेबाबत झाले आहे. सगळे आदिवासी व शेती समाज हे नाते संबंधांवर आधारित असतात. कुटुंब संस्था ही समाजाची प्राथमिक स्वरुपाची संस्था असते. नातेसंबंधांची सुरुवात कुटुंबापासून होते. पती-पत्नी यास जोडपे म्हणतात कुटुंब म्हणत नाही. पती-पत्नी व अविवाहित मुलं, स्वत:ला झालेली किंवा दत्तक घेतलेली, यास बीज कुटुंब म्हणतात. विवाहित मुले, सुना, नातवंडे याबरोबर राहणाऱ्या समूहास संयुक्त किंवा सामाईक कुटुंब म्हणतात.

भारतीय संस्कृतीचे आकलन होण्यासाठी भारतातील भाषावार प्रदेश, भाषावार प्रांत, जाती संस्था, कुटुंब संस्था, नातेदारी पद्धती यांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. भारत खंडात प्रामुख्याने तीन भाषा प्रदेश आहेत. हिमालयापासून गोदावरीपर्यंत आणि कराची पासून गोहाटीपर्यंत इंडोयुरोपियन समूहाचा भाषा प्रदेश आहे. गोदावरी ते कन्याकुमारी हा द्रविडीयन भाषांचा प्रदेश आहे. साधारणत: आसाम, बंगाल, बिहार आणि ओरिसा यातील वन प्रदेशात ऑस्ट्रो एशियाटीक भाषा समूहांचा विखुरलेला प्रदेश आहे. प्रत्येक भाषा प्रदेशात अनेक भाषावार प्रांत आहे. भाषावार प्रांत रचना करण्याचे नियोजन स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसच्या अधिवेशनात ठरलेले होते. परंतु भाषावार प्रांत रचना १९५६ साली अस्तित्त्वात आली. मुंबईच्या वादामुळे महाराष्ट्राची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. भाषा हे संस्कृतीचे वाहन असल्याने लोकशाही तत्त्वावर राज्यात जनतेचा सहभाग असण्यासाठी मातृभाषेतून राज्य कारभार करणे हे आवश्यक असते. तसेच ज्ञान सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी मातृभाषेतून शिक्षण देणे, साहित्य व ग्रंथांची निर्मिती होणे हेही आवश्यक असते. या भाषावार प्रांत रचनेमुळे आदिवासींवर मात्र अन्याय झाला आहे. संथाल, गोंड व भिल्ल यांसारखे संख्येने मोठे असणारे आदिवासी समूह तीन-चार भाषावार प्रांतात विभागले गेले. त्यामुळे एकाच आदिवासी समूहातल्या मुलांना आणि लोकांना त्या त्या प्रांतातील भाषांमध्ये शिक्षण व प्रशासन करावयास लागते.

भाषेचा संस्कृतीवर फार मोठा प्रभाव असतो. तुळसीदासाचे रामचरित्रतमानस हे हिंदी प्रदेशात सर्वश्रुत आहे. तसेच मराठी संत काव्य हे गावखेड्यातील सर्व लोकांना माहिती आहे. या सांस्कृतिक वारशामुळे एक ठराविक साच्याचे व्यक्तिमत्व एक भाषा म्हणजेच समान संस्कृती धारण करणाऱ्या समाजात घडत असते. भाषा-संस्कृतीचा नातेवाचक संज्ञावर परिणाम होतो. महाराष्ट्र संस्कृती ही उत्तर भारतातील हिंदी संस्कृतीपेक्षा दक्षिणात्य

संस्कृतीशी जास्त जवळची आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील नातेवाचक संज्ञा दक्षिणी संज्ञांशी जास्त मिळत्या जुळत्या आहेत.

जाती संस्था ही वर्णव्यवस्थेशी निगडीत आहे. वेगवेगळ्या भाषावार प्रांतात जातींची नावे वेगवेगळी असतात. परंतु या जाती त्या त्या वर्ण समूहात असल्याने भाषा वेगळी असूनही त्यांची तुलना करणे सहज शक्य होते. भाषा वेगळी असली तरी समाज-संस्कृतीच्या जडण-घडणीत फार फरक होत नाही. प्रत्येक भाषावार प्रांतात ग्रामीण क्षेत्रातील प्रमुख उद्योग व्यवसाय करणाऱ्या आणि शहरी भागातील व्यवसाय करणाऱ्या जाती असतात. या जातींचे अंतर्विवाही उपजातींमध्ये विभाजन झालेले असते.

वर्णाप्रमाणे जातीतही उच्च-नीच उतरंड असते. पूर्वाश्रमीचा अस्पृश्य समाज वर्णव्यवस्थेच्या बाहेर असून त्यास पंचम, अवर्ण किंवा अतिशुद्र असेही म्हटले जाते. परंतु या समाजातही वेगवेगळ्या अंतर्विवाही जाती आहेत आणि त्यांच्यातही उच्च-नीच अशी उतरंड आहे. या जाती केवळ हिंदू समाजात आहेत असे नसून भारत खंडातील मुसलमान, ख्रिश्चन, शीख अशा इतर समुदायातही आहेत. एका जातीतील लोक आपापसात विवाह करत असल्याने एका जातीचे सर्व लोक एकमेकांचे प्रत्यक्ष नातेवाईक किंवा नातेवाईक होण्याची क्षमता-शक्यता बाळगून असतात, असे इरावतीबाईंचे म्हणणे आहे. यात उत्तर भारत व दक्षिण भारतात फरक असू शकतो. महाराष्ट्रात आणि दक्षिण भारतात आते-मामे बहीण भावडांचे विवाह निषिद्ध नाहीत. दक्षिणेत, अशा विवाहांना प्राधान्य देण्यात येते. उत्तर भारतात मात्र आते-मामे बहीण भावडांचे विवाह निषिद्ध आहे. इतकेच काय पण काही हिंदी भाषिक ग्रामीण भागात एका खेडे गावातील लोक त्याच खेडे गावात विवाह करीत नाहीत. हिंदू समाजात सगोत्र विवाह निषिद्ध आहेत. परंतु त्यात पळवाटा आहेत. मामाकडे जर दत्तक विधान केले तर गोत्र बदलल्यामुळे विवाह शक्य होतो. यावरुन जात हा एक नातेसंबंधी गट आहे असे इरावतीबाईंनी विधान केले आहे.

भारतीय ग्रामीण भागातील राजकारण, समाजकारण, ग्रामीण भागातील अर्थकारण आणि उद्योगपतिंचे पारिवारिक संबंध समजण्यासाठी कुटुंबसंस्था व नातेदारी पद्धत समजणे आवश्यक आहे. भारतातील पारंपरिक सामाईक कुटुंब प्रणाली ही समाजव्यवस्थेतील एक वैशिष्ट्यपूर्ण संस्था आहे. एकाच घरात आई-वडील, त्यांची विवाहीत मुले, नातवंडे, कदाचित विधवा मुलगी व तिची मुले आणि इतर काही नातेवाईक असे पारंपरिक भारतीय सामाईक कुटुंबाचे चित्र असते. अलिकडे जरी शहरीकरणामुळे कुटुंबे विभक्त झाली तरी त्यांच्यातील एकी ही सणासमारंभात दिसून येते. अशा सामाईक कुटुंबात कायम सणवार, विधी, घटना घडत असतात. जन्म-मृत्यू, विवाह, बाळंतपण, धार्मिक विधी, सणसमारंभ यामुळे कुटुंबात कायम चहलपहल असते. याचे मुलांचे व्यक्तिमत्व घडविण्यावर परिणाम होतो. पितृप्रधान समाजात एका मूळ पुरुषाकडून झालेली संतती व त्यातून निर्माण होणारा वंशवृक्ष हे रक्ताचे नातेवाईक समजण्यात येतात. कुटुंबात येणाऱ्या सूना व त्यांच्या माहेरचे नातेवाईक यांना सोयरे म्हणतात. नाते समूह हा सगळ्या सगे सोयऱ्यांचा एक समूह असतो. या सगळ्या सग्या सोयऱ्यांच्या पलिकडे जाती समूह असतो. एका खेडे गावाची सामाजिक, आर्थिक, राजकीय व्यवस्था ही त्या गावात राहणाऱ्या

वेगवेगळ्या जातीच्या लोकांची बनलेली असते. त्यामुळे एक गाव हे स्वयंसिद्ध व पारंपरिकरित्या स्वयंशासित असते. एका जातीचा प्रसार सगळ्या सोयऱ्यांच्यामार्फत अनेक गावात झालेला असतो. अशारितीने कुटुंब, जात, गाव या संस्था नातेदारी पद्धतीने बांधलेल्या असतात.

या कुटुंबव्यवस्थेचे आणि नातेदारीचे महाभारत काळाचे विश्लेषण इरावतीबाईंनी युगान्त या पुस्तकात समर्थपणे केले आहे.

भारतातील नातेदारी पद्धतीचे संघटन या पुस्तकात इरावतीबाईंनी भारतातल्या सर्व भाषा समूहांतील आणि भाषावार प्रांतातील नातेवाचक संज्ञांचे विश्लेषण केले आहे. एक नातेवाचक संज्ञा कदाचित एक किंवा अनेक नातेदारांना संबोधत असते. जसे उत्तर भारतात आजोबा-आजी यांना वेगळे वेगळे शब्द आहेत. आईच्या आई-वडिलांना नानी-नाना आणि वडिलांच्या आई वडिलांना दादी-दादा असे स्पष्ट निर्देश आहेत. महाराष्ट्रात मात्र सगळ्यांना आजोबा-आजी असेच म्हणण्यात येते. याचा अर्थ आईच्या आणि वडिलांच्या त्या त्या वयोगटातील लोकांना किंवा सग्यासोयऱ्यांना नानी-नाना किंवा दादी-दादा म्हणण्यात येते. जसे आईचे काका, मामा यांना नानाच म्हणण्यात येईल तसेच वडिलांचे काका, मामा यांना दादाच म्हणण्यात येईल. इंग्रजी भाषेत सर्व चुलत, आते, मामे बहिण-भावंड एकमेकांना कझिन या सर्वसमावेशक संज्ञेनी संबोधतात. यात लिंगभेदही करण्यात येत नाही. उत्तर आणि दक्षिण भारतातील विवाहाच्या नियमात आणि नातेदारी पद्धतीत फरक असल्यामुळे दीर-भावजय, सासू-सून, पुरुष व त्याच्या बायकोच्या बहिणी यांच्यातील संबंध भिन्न आहेत. हिंदी भाषिक प्रदेशात स्त्री आणि तिच्या नवऱ्याच्या धाकट्या भावाशी थट्टा मस्करीचे संबंध असतात. कदाचित नवरा मेल्यावर देवर भाभीचा विवाह होऊ शकतो.

नातेदारी पद्धतीचे विवेचन करताना आपण एखाद्या नातेवाईकची ओळख करुन देतो ती खरी नातेवाचक संज्ञा असते. परंतु आपण एखाद्या नातेवाईकास संबोधतो किंवा हाक मारतो ही नातेवाचक संज्ञा नसते. बरेच लोक आपल्या आईस किंवा आजीस ताई, माई किंवा इतर कुठल्या संज्ञेनी हाक मारतात. उत्तर भारतात ओळख करुन देतानाही केवळ भाई, बहन असेच म्हटले जाते. परंतु आतेबहीण, मामेबहीण, मावसबहीण असे सहजासहजी म्हटले जात नाही. महाराष्ट्रात मात्र ओळख करुन देताना या तपशीलाचा नाम निर्देश करण्यात येतो.

भारतातील ग्रामीण व शेतकी समाजाची खरी ओळख नातेदारी पद्धतीचा अभ्यास केल्याशिवाय होत नाही. तसेच आदिवासी समाजातही एका आदिवासी जमातीचे लोक साधारणपणे वीस-पंचवीस किलोमीटरच्या परिघातील एकमेकांशी नातेसंबंधांने बांधलेले असतात. भारतीय उद्योग विश्वात सुद्धा उद्योगांवर घराण्यांची मक्तेदारी असल्याने विभाजनाच्या प्रसंगी बरेच तंटेबखेडे उत्पन्न होतात.

पूर्वज-पूजा किंवा श्राद्ध जिवंत आणि मयत याच नातेसंबंधांचे द्योतक आहे. पूर्वज-पूजेमुळे बरीच कुटुंबे एकमेकांना जोडलेली असतात. जसे आजोबा-आजीमार्फत सगे आणि सोयरे नातवंडांच्या प्रेमामुळी एकत्र बांधलेली असतात. उत्तर भारतात पितृप्रधान संबंध जास्त प्रामुख्याने आढळतात. मुलीचे माहेर

(पृष्ठ ५५ वर पहा)

ग्रंथ-परिचय

# डॉ. इरावती कर्वे : व्यक्ती आणि वाङ्.मय

## इरावतीबाईंच्या वाङ्:मयीन कर्तृत्वाचा वेध घेणारे पुस्तक

डॉ.स्वाती सुहास कर्वे



१५ डिसेंबर २००५ रोजी डॉ. इरावती कर्वे यांचे जन्मशताब्दी वर्ष पूर्ण झाले आणि हे जन्मशताब्दी वर्ष पूर्ण होताना 'डॉ. इरावती कर्वे : व्यक्ती आणि वाङ्.मय' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. जन्म शताब्दी वर्षात इरावतीबाईंच्या कर्तृत्वाचा आढावा घेणारे पुस्तक प्रसिद्ध केल्याबद्दल लेखिका डॉ. उषा कोटबागी आणि पद्मगंधा प्रकाशन दोघांचे अभिनंदन केले पाहिजे.

डॉ. उषा कोटबागी यांनी इरावती कर्वे यांच्या समग्र साहित्याचे पीएच.डी. साठी संशोधन केले होते. पीएच.डी. साठी केलेले संशोधन आता ग्रंथरुपाने प्रसिद्ध झाले आहे.

डॉ. इरावती कर्वे मराठीतील अपवादात्मक लेखिका होत्या. ललित लेखक आणि संशोधक यांचा मनोज्ञ मिलाफ त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता. संशोधकाची चिकाटी, वस्तुनिष्ठता, काटेकोरपणा, शिस्त तसेच मानवशास्त्रासारख्या चाकोटीबाह्य विषयात असणारी त्यांना रुची इ. पैलू त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होते.

त्याचबरोबर स्त्रीची सहृदयता, तरल संवदेनशीलता, चिंतन, निरीक्षणशक्ती, अनुभवांना थेट भिडण्याची वृत्ती, अनुभव उत्कटतेने मांडण्याची ओढ इ. ललित लेखकाचे पैलूही त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होते. त्यामुळेच ललित आणि वैचारिक दोन्ही प्रकारचे लेखन इरावतीबाईंनी विपुलतेने आणि सातत्याने केले.

या दोन्ही पैलूंचा वेध स्वतंत्रपणे आणि व्यवस्थित घेता येईल अशीच पुस्तकाची लेखिकेने मांडणी केली आहे.

इरावतीबाईंचे व्यक्तिमत्त्वही वेगळे होते. स्वतंत्र विचार, स्वतंत्रवृत्ती आणि आपल्याला पटणारी गोष्ट निकराने करणारा त्यांचा स्वभाव होता. त्यांचे सासरे महर्षी अण्णासाहेब कर्वे यांच्याविषयी आदर असूनही त्यांच्या संस्थेत काम करताना इरावतीबाईंना आतून जाणवत होते की आपला पिंड इथे रमणारा नाही.

स्वतंत्रपणे काम करणाऱ्या संशोधकाचा आहे. म्हणून एक दिवस त्यांनी आपल्या रजिस्ट्रार पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर त्यांचा व्यासंगी प्राध्यापक, संशोधक, लेखिका, व्याख्याती असा विकास वेगाने पुढील काळात झाला. इरावतीबाईंच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण त्यांच्या सर्वच लेखनाची

भूमी असल्याने लेखिकेने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध विस्ताराने सविस्तर घेतला आहे.

इरावतीबाईंचे बालपण, त्यांचे कुटुंब, पुण्यात हुजुरपागेत होणारे शिक्षण, रँग्लर परांजपे यांच्या घरी त्यांच्यावर होणारे संस्कार, लग्नानंतरचे कर्वे यांच्या घरातील सेवाप्रती ध्येयवादी वातावरण, त्यातून विकसित होणाऱ्या इरावतीच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध बारकाईने घेतला आहे. पुढील संशोधनाच्या दृष्टीने पायाभूत ठरणारे संशोधन म्हणजे व्यक्तिमत्त्वाचा वेध. अतिशय आत्मियतेने हे काम केले आहे. तरीही एकच मनात येते की तत्त्वज्ञान या विषयात एम्.ए. केल्यानंतर इरावतीबाई मानवशास्त्रासारख्या चाकोरीबाह्य विषयाकडे का वळल्या असाव्यात, याविषयीचे धागेदोरे अधिक उलगडायला हवे होते.

मराठी साहित्यिक म्हणून इरावतीबाईंचे ललित लेखन महत्त्वाचे ठरते. म्हणून ललित लेखनाचा विचार प्रारंभी केला आहे. परिपूर्ती, भोवरा व इरावतीबाईंच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झालेले गंगाजल हे इरावतीबाईंच्या तीन ललित लेख संग्रहाचा विचार एकत्रित केला आहे.

ललित गद्यातून व्यक्त होणाऱ्या इरावतीबाईंचाच शोध वाङ्.मयीन चिकित्सक विचारांच्या बरोबरीने केलेला आहे. विषयानुसार वर्गीकरण करुन अतिशय शिस्तीने लेखिकेने ललित लेखनाचा चिकित्सक विचार केला आहे.

१. आस्वादक निव्वळ ललित लेख
२. विचारप्रधान चिंतनपर लेख
३. स्त्री व संस्कृती विषयक लेख
४. व्यक्तिरेखा चित्रणपर लेख
५. प्रवासवर्णन लेख
६. कविता

अशी वर्गवारी करुन इरावतीबाईंच्या ललित लेखनाचा विचार सविस्तर केला आहे. उदाहरणासहीत लेखनाची वैशिष्टये शोधली आहेत. इरावतीबाईंच्या ललित लेखनाचा पट इथे साकल्याने नजरेत भरतो.

लेखिकेचे परिश्रम जाणवतात तरीही एक गोष्ट ललितगद्य या वाङ्.मय प्रकाराच्या दृष्टीने नमूद कराविशी वाटते.

ललितनिबंधाच्या साचेबंदपणाकडून ललितगद्याच्या अधिक कलात्मक आणि ललित्यपूर्ण लेखनाकडे ललितलेखन संक्रमित होण्याच्या टप्प्यावर इरावतीबाईंचे ललितलेखन प्रसिद्ध झाले. प्रा. नरहर कुरुंदकर इरावतीबाईंना ललितगद्याच्या अग्रदूत म्हणत. या दिशेने इरावतीबाईंच्या ललित लेखनाचा विचार करायला हवा होता. इरावतीबाईंचे अनुभवविश्व व्यापक होते. स्वतंत्र होते. अभिव्यक्तीत सहज उत्कटता होती.

संशोधिकेबरोबर त्यांच्यातील ललितलेखिकाही सतत जागृत असल्याने विविध अनुभव त्यांच्या लेखनाचे विषय एकाच वेळी होत. वेड लागलेलं घर हा घरगुती अनुभव एकीकडे, दुसरीकडे पंढरपूरच्या वाटेवर येणारा अनुभव , त्याच वेळेला उत्खननात सापडलेला स्त्रीचा सांगाडा बघून मनात उठणारा कल्लोळ इरावतीबाई सारख्याच ताकदीने व्यक्त करीत होत्या.

अतिशय लवचिक स्वाभाविक भाषाशैली होती, त्यातूनच त्यांनी ललितगद्याच्या सीमा अधिक खुल्या केल्या. ललित गद्याच्या दृष्टीने इरावतीबाईंच्या लेखनाला ऐतिहासिक महत्त्व आहे. त्यादृष्टीने त्यांच्या कामाचा घेतलेला वेध महत्त्वाचा ठरला असता.

ललित लेखनाचा दुसरा विभाग म्हणजे

युगान्त. इरावतीबाईंचे नाव घेतल्यावर वाचकांना पटकन आठवते ते महाभारतातील व्यक्तिरेखांचा वेध घेणारे लेखन युगान्त. साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळवणारा हा ग्रंथ वैचारिक की ललित? अशी चर्चा पूर्वी होत होती. अजूनही होते. प्रकृतीने युगान्त ललित लेखनात मोडत असल्याने लेखिकेने युगान्तचा समावेश ललित लेखनाच्या विभागात केला आहे. परंतु अन्य ललित लेखनापेक्षा युगान्त सर्वच दृष्टीने स्वतंत्र व वेगळे असल्याने तद्‌विषयी स्वतंत्र चिकित्सा हे औचित्यही लेखिकेने दाखवले आहे.

या पुस्तकातील सर्वोत्तम प्रकरण म्हणून या प्रकरणाचा निर्देश करता येईल. लेखिकेने घेतलेली मेहनत त्यांच्या लेखनातून स्पष्टपणे जाणवते.

युगान्त मधील व्यक्तिरेखा प्रथम अभिरूची व सत्यकथा या नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या. नंतर युगान्त नावाने पुस्तकरुपाने एकत्र प्रसिद्ध झाल्या.

इ. स. १९६० ते ७० या दशकाचा एक असा टप्पा होता की महाभारताविषयी नव्याने कुतुहल लेखक विचारवंतांच्या मनात निर्माण झाले होते. महाभारताचा स्वतंत्रपणे वेध घेणारे ग्रंथ, मृत्युंजय सारखी पौराणिक कादंबरी प्रसिद्ध झाली. वाचकांनी सर्वच पुस्तकांचे स्वागत केले.

युगान्तचा विचार करताना लेखिकेने महाभारतावर आधारित अन्य पुस्तकांचाही विचार तपशिलात केला आहे. दुर्गाबाई भागवतांचे व्यासपर्व -दाजी पणशीकरांचे महाभारत एक सूडाचा प्रवास - शं.दा.पेंडसे यांचे महाभारतातील व्यक्तिरेखा, -आनंद साधले यांचे जय नावाचा इतिहास आहे, रा. शं. वाळिंबे यांचे सीमावृक्ष या सर्व पुस्तकांचा स्वतंत्रपणे विचार करुन नंतर लेखिका युगान्त कडे वळली आहे.

युगान्त मध्ये इरावतीबाईंनी महाभारतातील व्यक्तिरेखांचा स्वतंत्रपणे वेध घेतला आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून इरावतीबाई महाभारतकालीन जीवन, समाजरचना, रीती, समजुती, राजनीती, वातावरण, त्या परिस्थितीत आकाराला येणारे जीवन, गुणापगुणांनी पंडित माणसं, त्यांचे परस्पर संबंध, नाटय, संघर्ष इ. विविध दिशांनी त्यांनी महाभारतातील व्यक्तिरेखांना जाणून घेतले. विशिष्ट परिस्थितीत व्यक्तींचे भावकल्लोळ समजून घेत विशद केले. आणि अशाच जागी संशोधनापेक्षा व्यक्तीचे मन जाणून घेणारी ललितलेखिका पुढे सरकलेली दिसते.

इरावती कर्वे यांच्या विवेचनाचा हा स्वतंत्र बाज विचारात घेऊन उषा कोटबागी यांनी युगान्त ला समजावून घेतले आहे. महाभारतील स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या व्यक्तिरेखांविषयी स्वतंत्रपणे विवेचन केले आहे. व्यक्तिरेखांना इरावतीबाई कसे समजावून घेतात, त्यांची मते कोणती आहेत, कोणते निष्कर्ष त्यांनी मांडले आहेत. याविषयी चर्चा केली आहे. काही निष्कर्ष मान्य होत नसतील तेथे स्पष्टपणे स्वत:ची मतेही मांडली आहेत, उदा. भीष्माचार्यांच्या व्यक्तिरेखेच्या संदर्भात इरावतींच्या विवेचनाविषयी डॉ. कोटबागी लिहितात, इरावतींच्या स्त्रीमनाने संशोधकी विवेकावर जणू मात केली आहे.

काहीशा नकारात्मक भूमिकेतून भीष्माकडे पाहिल्यामुळे भीष्म या व्यक्तिरेखेला इरावतीबाईंनी पूर्ण न्याय दिला नाही, असे खेदाने म्हणावे लागते. यासारखी विधाने लेखिकेच्या स्वतंत्र आकलनाची व वस्तुनिष्ठ संशोधनवृत्तीची साक्ष देणारी आहेत. एखाद्या लेखकाचा अभ्यास करताना त्या लेखकाच्या

दोषांचे, त्रुटींचे समर्थन करण्याचा धोका संभवत असतो. परंतु लेखिकेने संशोधकाची वस्तुनिष्ठता इरावतीबाईंविषयी आदर कायम ठेवून राखली आहे. हे मत मुद्दाम नोंदवावेसे वाटते.

'कृष्ण वासुदेव' हे युगान्तमधील सर्वात महत्त्वाचे प्रकरण. कृष्णाच्या व्यक्तिरेखेचा वेध इरावतीबाईंनी स्वतंत्र संकल्पनेतून घेतला आहे. श्रीकृष्ण एक पूर्णावतार किंवा भगवान श्रीकृष्ण ही कृष्णाची परिचित रुपे समोर ठेवून इरावतीबाई कृष्ण समजावून घेत नाहीत. महाभारत काळातील परिस्थिती, क्षत्रियांची सत्तांध मनोवृत्ती, त्यातून घडणारे अनाचार, एकंदर घसरणारा नीतीमूल्यांचा स्तर, क्षात्रवृत्तीचा अधर्माकडे होणारा प्रवास आणि या पार्श्वभूमीवर कृष्णाचे घडणारे, उदात्त होत जाणारे व्यक्तिमत्त्व कृष्ण वासुदेव बनण्याची त्याची महत्त्वकांक्षा, स्थिरप्रज्ञतेने वृद्धाची सूत्रे हलवणे.

गीता कथनाचे अत्युच्च्य कार्य आणि खऱ्या अर्थाने वासुदेव कृष्ण दिशेने होणारा कृष्णाचा प्रवास, इरावतींचे सर्वच विवेचन कृष्णाचा स्वतंत्रपणे वेगळाच शोध घेणारे आहे. लेखिकेने कृष्ण वासुदेव ही संकल्पना अधिक जाणून घेऊन विश्लेषण केले असते तर इरावतीबाईंच्या लेखनाचे वेगळेपण अधिक सुस्पष्ट झाले असते. व्यक्तिरेखांच्या विवेचनानंतर युगान्त मधील इतिहास कथन, इतिहासाचा दृष्टिकोन, राजकीय इतिहास, समाजशास्त्रीय आकलन, एक ललित कृती या विविध अंगांनी लेखिकेने युगान्तचा समग्र सखोल विचार केला आहे. हे सर्वच लेखन मुळातून वाचण्यासारखे आहे. केवळ युगान्तच नव्हे तर महाभारताचे विश्लेषण करणाऱ्या ग्रंथासह व्यापक जाणीव या प्रकरणातून मिळते. हे सांगणे मंला महत्त्वाचे वाटते.

मानवशास्त्राच्या अभ्यासक, संस्कृतीच्या जाणकार, संशोधक म्हणून डॉ. इरावती कर्वे अधिक प्रसिद्ध होत्या. तद्विषयक संशोधनाचा त्यांना जन्मभर ध्यास होता. अखंड आणि अथकवृत्तीने केलेल्या संशोधनातून तद्विषयक लेखन इरावतीबाईंनी सातत्याने मराठी व इंग्रजीतूनही केले. 'मराठी माणसाची संस्कृती', 'आमची संस्कृती', 'संस्कृती', 'हिंदू समाज रचना', 'Hindu Society An Interpretation', 'Kinship Organization', 'महाराष्ट्र एक अभ्यास', 'Maharashtra Its land and people' इ. मौलिक ग्रंथ त्यांनी लिहिले. प्रकरण ४ व ५ मध्ये लेखिकेने इरावतींच्या संशोधनपर लेखनाचा विचार केला आहे.

मानसशास्त्र, संस्कृती हे विषय समाजशास्त्राच्या कक्षेत येणारे. त्याची परिमाणेही स्वतंत्र; परंतु इथे समाजशास्त्रीय दृष्टीने विवेचन केलेले नाही. ही सदर पुस्तकाची मर्यादा नाही. अपुरेपणही नाही, तर वाङ्मयीन दृष्टीने इरावतींच्या संशोधनाचे विषय कोणते होते, त्याची व्याप्ती केवढी होती, विचारांची सूक्ष्मता कशी होती, किती विविध स्तरांवर विविध प्रकाराने त्यांनी संशोधन केले, त्यासाठी कष्ट कसे घेतले, प्रवास किती वेळा केला, त्यांच्या विचारांचा पल्ला किती मोठा व व्यापक होता इ. अंगांनी लेखिकेने इरावतींच्या संशोधनपर लेखनाचे स्वरूप जाणून घेतले आहे. त्याचा व्यापक पट अनेक बारकाव्यांसह चिकित्सक दृष्टीने व परिश्रमाने स्पष्ट केला आहे. विवेचन काहीसे परिचयात्मक झाले तरी ते वैगुण्य वाटत नाही, वैशिष्टय ठरते, हे महत्त्वाचे. इरावतीबाईंचे संशोधन नेमके काय होते? कशा

(पृष्ठ ५१ वर पहा)

मागोवा

# युगान्त

## महाभारतातील पात्रांचे एक मानवशास्त्रीय अवलोकन

प्रा. रा. के. मुटाटकर

मानवशास्त्राचे मुख्य प्रमेय म्हणजे ज्या लोकांचा अभ्यास करावयाचा त्यांच्या नजरेतून जगाकडे पाहण्याचा प्रयत्न करावयाचा, म्हणजे ते तसे का वागतात याचा उलगडा होतो. लोक ज्या परिस्थितीत राहतात, ज्या कुटुंबात, जातीत, समूहात, धर्मात जन्म घेतात त्याची संस्कृती आत्मसात करतात व त्याप्रमाणे विचार करतात, वागतात.

इरावतीबाईंनी महाभारतातील काही मोजक्या पात्रांचा अभ्यास करताना, त्या पात्रांच्या विचारसरणीतून, त्यांच्या सामाजिक-राजकीय पार्श्वभूमीचा विचार करुन, त्यांचे व्यक्तीमत्व उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. मूळ व्यक्तीमत्वास संस्कृती घडविते. समाजाची संस्कृती असते तशी समाजातल्या समूहांची, व्यावसायिकांची, राजघराण्याचीही संस्कृती असते. राजघराण्यांनी एकमेकांशी कसे वागावे, सोयरिकींचा राजकीय फायदा कसा करुन घ्यावयाचा, इतकेच काय, युद्धाचेही काही सर्वमान्य नियम असत, अजूनही काही अंशी आहेत.

महाभारतातील पात्रांना दैवी न मानता, भूतलावरील आपल्यासारखी ती माणसे होती या भूमिकेतून त्यांच्या वागणुकीचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न इरावतीबाईंनी युगान्तमधे केला आहे. त्यांच्या वागणुकीचा सामाजिक अन्वयार्थ, सामाजिक पार्श्वभूमी उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. समाजात स्थिरता हवी असेल तर प्रत्येकाने आपापले जन्मजात, अंगीकृत कार्य कोणत्याही फळाची आशा न करता करावे असा प्राणी धर्म आहे. तसे न केल्यास अराजक माजेल. मानवशास्त्रीय सिद्धांताप्रमाणे प्रत्येक व्यक्तीस जन्मत:च एक सामाजिक स्थान मिळते व त्याबाबतच्या भूमिका त्यास पार पाडाव्या लागतात. त्या भूमिका समर्थपणे पार पाडण्याचे प्रशिक्षण पारंपरिक समाजात, कुटुंबात, जाती-समाजात मिळत असते.

परंतु जन्मजात सामाजिक स्थानाच्या पलिकडे जाऊन जर मानाचे स्थान मिळवायचे असेल तर त्याकरिता त्या भूमिकेचे कौशल्य शिक्षणाद्वारे अगोदर प्राप्त करावे लागते, मगच समाजमान्यता मिळते. युधिष्टिर, भीम, अर्जुन यांना धर्मराज, गदाधारी, धनुर्धारी अशी विशेषणे प्राप्त झाली. भीष्म प्रतिज्ञा ही एक संज्ञा आहे. भगीरथी प्रयत्न हेही एक विशेषण आहे. याकरिता विशेष कौशल्य व विशेष प्रयत्न करावे लागले. महाभारतातील प्रमुख पात्रांच्या वागणुकीचा अर्थ इरावतीबाईंनी या मानवशास्त्रीय सिद्धांतातून केला आहे.

भीष्माने आयुष्यात काय मिळविले याचा शोध घेण्याचा प्रयत्न इरावतीबाईंनी केला आहे. भीष्माने कायम त्याग केला पण त्याची निष्पत्ती काय झाली? त्याच्या नशीबाने देवव्रतचा (भीष्म) जीव कुरुवंशातील राजघराण्यात अडकला. इरावतीबाई स्त्री-स्वातंत्र्यवादी (Feminist). त्यांनी भीष्माचे

विश्लेषण त्या अनुषंगाने केले आहे. भीष्माने घरच्या पुरुषांसाठी बायका आणण्याचा उद्योग केला व त्या प्रक्रियेत त्यांचा छळ झाला. द्रौपदीचा छळ त्याच्या डोळ्यादेखत भर दरबारात झाला. ज्या कुरु कुलात बायकांची विटंबना झाली, त्यांची शरीरे व मने दोन्ही चुरगळली गेली ते कुल नाशालाच योग्य झाले होते व ते पाप भीष्माच्या हातून झाले असे इरावतीबाईंनी म्हटले आहे. ज्याने सर्वस्व त्यागले आहे, त्याला वर्तनाची मर्यादा असत नाही व तो जुलमी वर्तन करु शकतो. भीष्माने जरी मर्यादांचे उल्लंघन केले नाही तरी तो प्रवाहपतितासारखा वाहात गेला.

आपल्या हातून काही वाईट व्हावयाचे नाही या भूमिकेतूनही विवेकाची पायमल्ली होते. युगान्तमध्ये न आलेला पण इतर ठिकाणी आलेल्या संदर्भानुसार भीष्माने आपली चूक कबूल केली. ती म्हणजे राज्याला इमानदार व राखणदार राहण्यापेक्षा, भीष्म राजाची राखण करीत राहिला. त्यामुळे धर्म-अधर्माचा विवेक त्याच्याकडून ढळला; परंतु, इरावतीबाईंच्या नजरेतून त्याला शरशय्येवरुन उघड्या डोळ्याने संहार बघावा लागला, कुरु स्त्रियांचे रडणे ऐकावे लागले ही त्याची विटंबनाच झाली.

गांधारीचे दुर्दैव की आंधळ्या नवऱ्याशी फसवून लग्न लावले; पण तिचा तिने डोळ्याला फडके बांधून पुरेपुर सूड घेतला, आपल्या आयुष्यावर राग धरला तो जन्मभर. त्याचबरोबर मरेपर्यंत तिने नवऱ्याला साथ दिली. धृतराष्ट्राने शेवटी तिची समजूत काढली की त्यांच्या कुळात या ना त्या कारणाने सगळेच वंचित राहिले-विदुर, कुंती- पण त्यांनी निराशेचा सूड कोणावर उगवला नाही. कुंतीलाही खूप भोगावे लागले. कौआर्यात झालेल्या कर्णापायी तिला जन्मभर दुःखच होते. जन्मरहस्य लपवून ठेवून शेवटी ते उघड केलं त्यामुळे केवळ क्षत्रियत्वाचे अग्निसंस्कार कर्णावर झाले. द्रौपदीस सून मान्य करुन कुंतीने आपल्या मुलांना एकत्र ठेवले. त्यांना लढण्यास व क्षत्रिय धर्माचे पालन करण्यास उद्युक्त केले. कर्णास क्षत्रियत्वाचे अग्निसंस्कार मिळवून पापक्षालन करण्याचा प्रयत्न केला. परंतु तिने राजमाता म्हणून आपल्या मुलांबरोबर राज्य न करता धृतराष्ट्र व गांधारीबरोबर मृत्यूस कवटाळले. हिंदू समाजव्यवस्थेतील, आश्रमव्यवस्थेतील वानप्रस्थ व देहत्याग यांची उदाहरणे या रुपाने पाहावयास मिळतात.

विदुराच्या व्यक्तिमत्वाच्या चर्चेद्वारा इरावतीबाईंनी जातीव्यवस्था व अनुलोम-प्रतिलोम संबंधांची चर्चा केली आहे. विदुराची आई सूत असल्याने जरी विदुर क्षत्रिय राजघराण्यातील भाऊ होता, तरी राजा होऊ शकत नव्हता. त्याचा विवाहही राजघराण्यातील एका दासीपुत्रीशी झाला, क्षत्राणीशी झाला नाही. विदुर व धर्मराज यांच्यातील जिव्हाळा पिता-पुत्रांचा होता की दोघेही यमधर्माचे पुत्र होते म्हणून होता, याबाबत इरावतीबाईंनी निर्णायक मतप्रदर्शन केले नाही, पण संदेह निर्माण केला. इतरांप्रमाणे विदुरालाही महाभारतात काही प्राप्त झाले नाही.

द्रौपदीच्या व्यक्तिमत्वाचा कानोसा घेताना इरावतीबाईंनी सीता आणि द्रौपदी यांची वारंवार तुलना केली. द्रौपदी आणि कुंती या दोन स्त्रियांनी पांडवांना नेहमी आसरा दिला, त्यांची एकी कायम ठेवली व त्यांना युद्धास तयार केले. पाचांची पत्नी होऊन, आपल्या मुलांना माहेरी पाठवून, ती

पांडवांबरोबर सतत, वनवासात व अज्ञातवासात राहिली. तिला अडचणीतून कायम भीमाने सोडविली व तिच्यावर झालेल्या अत्याचारांचा सूड घेतला. पितृप्रधान  कुटुंब प्रणालीप्रमाणे पांडव कायम कौरवांशी संधी करण्याची भाषा करीत राहिले व त्याला कृष्णाने साथ दिली. कर्णास द्रौपदीचे प्रलोभन दाखविणे ही अतिशय हीन बाब खरीच. यावरुन सर्व त्याग करणाऱ्या पितृप्रधान समाजातला स्त्रीचा निकृष्ट दर्जा  दिसून येतो.

द्रौपदीने भरसभेत ओढून आणल्यावर तिने जो प्रश्न उपस्थित केला त्यावर इरावतीबाईंनी तिच्या बावळटपणाबद्दल चेष्टा केली आहे. दास झाला तरी त्याचा पत्नीवरचा अधिकार जात नाही असा दावा करण्यात आला. दासाचा जर आपल्या पत्नीवरचा अधिकार मान्य होत नसला, तर दासाच्या पत्नीला आपला नवरा सोडायचा अधिकार प्राप्त होतो व तो पितृप्रधान क्षत्रिय राजघराण्यात कदापि मान्य होऊ शकत नव्हता. कोणत्या परिस्थितीत द्रौपदीने हा प्रश्न विचारला याबाबतची चर्चा युगान्तमधे नाही.

दासाला आपल्या पत्नीला विकण्याचा किंवा द्यूतात एक वस्तू म्हणून लावण्याचा अधिकार हा मानव्याच्या व सर्वमान्य नीतिनियमांच्या विरूद्ध आहे याबाबत फारशी चर्चा नाही. परंतु द्रौपदी पतीव्रता राहिली. तिच्यावर याबाबतीत एकही लांछन आले नाही. तिने मरतानाही पुढील जन्मी तेच नवरे मागितले, फक्त क्रम बदलून. भीमाला तू सर्व भावातील मोठा भाऊ हो म्हणजे सगळ्यांना सुखात राहता येईल येवढेच तिने मागितले. भारतात हिमालयाच्या कुशीत राहणाऱ्या समाजात आजही बहुपतीत्वाची प्रथा आहे. पण सपाटी भागात तशी प्रथा नाही. महाभारत काळातही बहुपत्नीत्वाची बरीच उदाहरणे आहेत. परंतु बहुपतीत्वाचे उदाहरण केवळ द्रौपदीचे,  तसे पाहिले तर कुंतीचेही. द्रौपदीचे नाव सीता, अहिल्या, मंदोदरी, सावित्री बरोबर पंचकन्या म्हणून भारतीय जनमानसात कायम आहे.

इरावतीबाईंच्या शब्दात, कर्ण हा मानवी शरीर धारण केलेले वैफल्य म्हणता येईल. कर्णाची व विदुराची तुलना युगान्तमधे केली आहे, कारण दोघांनाही सूतपुत्र मानले गेले. विदुराला क्षत्राणिशी लग्न करता आले नाही, राज्य मिळाले नाही; पण प्रेम व आदर मिळाला. कर्णाने क्षत्रियत्वाचे अस्त्र-शस्त्र ज्ञान चोरून-मारून मिळविले, पण प्रत्येक वेळी त्याचा पाणउतारा झाला. क्षत्रिय असून क्षत्रियत्व नाही, यामुळे व्यक्तिमत्वात गंड निर्माण होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे द्रौपदीच्या वस्त्रहरणाच्या वेळी अर्वाच्य बोलून त्याचा विवेक ढळला. कर्णाला जरी दुर्योधनाने राज्य दिले तरी राजाची मैत्री ही बरोबरीची होऊ शकत नाही.

जे मिळाले ते आश्रितासारखे, त्यासाठी कर्णाने कौरवांची साथ कधी सोडली नाही. कृष्णाच्या आमिषात व कुंतीच्या विनंतीस त्याने मान तुकविली नाही. पण बरोबरीचा अर्जुन सोडल्यास इतरांना मारणार नाही असे वचन त्याने कुंतीला दिले. अर्जुनामुळे त्याला आयुष्यात बऱ्याचदा अपमान व पराभव स्वीकारावा लागला होता. शेवटी कृष्णाने व शल्याने घालूनपाडून बोलून कर्णाची स्वत्वाची खच्ची करण्याचा प्रयत्न केला.

इरावतीबाईंनी कर्णाचे सारे आयुष्य तू कोण? मी कोण? या प्रश्नांत गुंतून राहिले, असे समर्पकपणे दाखविले आहे. कर्णाचे सगळे आयुष्य स्वत्व शोधण्यात व जपण्यात गेले. हाताशी काही लागले नाही.

इरावतीबाईंनी कृष्ण वासुदेववर सर्वात जास्त पाने खर्ची घातली आहेत. कृष्णाशिवाय महाभारत-भाष्य अशक्य. गीता तर हिंदुत्वाचे, भारतीयत्वाचे मूळ तत्वज्ञान. गीतेवर जेवढी भाष्ये झाली व मोठमोठ्या नेत्यांनी, संतांनी केली तेवढी बायबलवरही झाली नाहीत. ज्ञानेश्वराने गीता सर्वसामान्य मराठी माणसापर्यंत पोहोचविली म्हणून ज्ञानेश्वर माऊली झाले.

कृष्ण देवाच्या थाटाने वागला व लोक त्याला तो मोठेपणा द्यावयाचे, भीष्मासही तो देव आहे हे माहीत होते. त्याने काही लोकांना दिव्य-दर्शनही घडविले. परंतु इरावतीबाईंनी त्याच्या व्यक्तिमत्वाचे विश्लेषण हाडा-मासाचा असामान्य मानव म्हणून केले आहे व ते योग्यच आहे. त्यांच्या दृष्टीने कृष्णाने पांडवांना मदत केली, खलबते केली, युद्धात स्वत: शस्त्र हातात घेण्याची भाषा केली, यात त्याचा व्यक्तिगत हेतू कळत नाही. केवळ धर्माचे अधिष्ठान बसवायचे असा दैवी हेतू वाटत नाही.

इरावतीबाईंना कृष्णास वासुदेव हे काहीतरी पद-प्रतिष्ठा मिळवायची होती असे सुचवायचे आहे. तशी आकांक्षा शिशुपाल व पौंड्र देशाच्या राजासही होती व तो स्वत:स वासुदेव म्हणवून घेई. या दोघांचा वध कृष्णाने केला; परंतु वासुदेव म्हणजे नेमके काय याचा उलगडा इरावतीबाईंना महाभारतावरुन झाला नाही. पांडवांसारख्या बलाढ्य; पण सरळ भावांची त्याला वासुदेव होण्यास मदत हवी होती असा कयास आहे.

इरावतीबाईंनी नातेसंबंधांच्या वागणुकीचे आधार घेऊन कृष्ण व पांडव बंधू भेटले म्हणजे एकमेकांचे कसे स्वागत करावयाचे याचे हृद्य वर्णन केले आहे. कृष्ण कुंती, धर्म व भीमाला नमस्कार करीत असे. नकुल, सहदेव त्याच्या पाया पडत, पण अर्जुनाला तो अलिंगन देत असे. कृष्ण व अर्जुन हे बरोबरीचे जीवश्च कंठश्च मित्र होते, दोघे दारु-मित्रही होते व एकमेकांच्या बायकांना (सत्यभामा-द्रौपदी) खेटून बसत, असे संजयवर्णन आहे. कृष्णाने कर्णास द्रौपदीचे प्रलोभन दाखविले ही आजच्या मूल्यांप्रमाणे न रुचणारी, खटकणारी गोष्ट आहे.

परंतु "बायकांना मन असते, ही गोष्ट त्या वेळचे कोणतेच पुरुष-भीष्म, वसुदेव, पांडव, कृष्ण-कोणीच मानत नसत. जे इतर क्षत्रिय करत असत, तेच ह्या बाबतीत कृष्णानेही केले. द्रौपदीला चीड आली असती किंवा नसती, हा विचार त्याच्या मते गौण होता." या कृष्णाचे यादव कुलही त्याच्या जिवंतपणी नाश पावले. त्याची निरवानिरव कृष्ण मेल्यावर अर्जुनाने केली. इरावतीबाईंनी भीष्म व कृष्णाची तुलना केली आहे. भीष्म उपभोगशून्य राहिला. कृष्णाने स्त्री व संपत्ती यांचा उपभोग घेतला. भीष्माने अधिकार भोगला, तर कृष्णाला भोग अधिकारशून्य होता. भीष्म स्वत:साठी रडला नाही. कृष्णही कधी रडला नाही, निष्कामच राहिला, इतका की, कधी कधी तो कठोरच भासतो.

इरावतीबाईंनी दोन ब्राह्मण, द्रोण व त्याचा मुलगा अश्वत्थामा यांच्याबद्दल विस्तृत भाष्य केले आहे. दोघेही जन्माने ब्राह्मण असून शस्त्रविद्येत निपुण आहेत. द्रौणाचार्यांच्या दारिद्रयामुळे त्याने कौरवांचा आसरा घेतला व त्या निमित्ताने त्याने अधर्माला साथ दिली. कर्णाबाबत इरावती बाईंनी ज्याप्रमाणे कर्णाच्या मी कोण? या प्रश्नाचा मागोवा घेतला, त्याप्रमाणे द्रोणाचा स्वधर्माचा विसर, व अश्वत्थाम्याला झालेली

आत्म-विस्मृती याबाबत टीका केली आहे. द्रोण-एकलव्याची कथा युगान्त मध्ये नाही, परंतु एकलव्य भिल्ल आदिवासी असल्यामुळे द्रोणाने आपल्या राजपुत्र शिष्याहून कोणीही सरस धनुर्धारी असू नये म्हणून एकलव्यावर अन्याय केला. द्रोण आपल्या चाकरीला, मीठाला जागला. धृतराष्ट्राचे दुर्योधन पुत्रप्रेम व द्रौणाचे अश्वत्थाम्याबद्दल पुत्रप्रेम महाभारतात ठळकपणे आले आहे.

म्हणूनच अश्वत्थामा नावाचा हत्ती मारून द्रोणाचे मनोधैर्य खच्ची करण्याचा यशस्वी प्रयत्न पांडवांनी केला. तेव्हा, भीमाने द्रोणाच्या ब्राह्मणत्वावर तोंडसुख घेतले. ब्राह्मणत्वाचा स्वधर्म सोडून संहार केला व अहिंसाव्रताचे पालन केले नाही म्हणून भीमाने द्रोणास हिणविले. अश्वत्थाम्याने तर आपला मामा कृपाचार्य यास मी क्षात्रधर्मात वाढल्यामुळे ब्राह्मणधर्माप्रमाणे वागू शकत नाही, असे सांगून पांडवांच्या शिबिरात रात्री जाऊन धृष्टद्युम्न व पांचही द्रौपदी पुत्रांची कत्तल केली. त्यावेळी कृप व कृतवर्मा या दोघा ब्राह्मणांनी पांडवांच्या शिबिरांना आग लावली.

अश्वत्थाम्याने ब्राह्मण्य गमावले होते व कृष्णाच्या शापामुळे त्याला क्षत्रियांचे वीर मरण मिळाले नाही. आजही अश्वत्थामा सातपुड्यात जखमेसाठी तेल मागत फिरतो असे म्हणतात. नंदूरबार जिल्ह्यातील अक्राणी तालुक्यात अस्तंबाच्या डोंगरावर कधी कधी अश्वत्थाम्याची धोतरे वाळताना दिसतात असे तिथले भिल्ल सांगतात. इरावती बाईंनी अश्वत्थाम्याच्या आत्मस्मृतीस तोड नाही असे भाष्य केले आहे. जाती धर्माप्रमाणे वागणुकीचे पालन न करण्याची कर्ण व अश्वत्थामा अशी दोन उदाहरणे महाभारतात आहेत. विदुर सूतपुत्र असल्याने त्याने क्षत्रियत्व मिरविले नाही. परंतु बुद्धी व विवेकाच्या जोरावर पांडित्य मिळविले व एक सूज्ञ, धर्माचरण करणारा व्यक्ती म्हणून आदर मिळविला.

युगान्त हे महाभारतावर लिहिलेले पुस्तक आहे. या पुस्तकास साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले. या पुस्तकाचे वैशिष्टय म्हणजे महाभारतातील प्रमुख व्यक्ती , घटना, समाज आणि संस्कृती यांचे मानवशास्त्राच्या दृष्टिकोनातून विश्लेषण आहे. युगान्त हे संशोधनात्मक पुस्तक नाही. इरावतीबाईंनी जुने आणि नवे, जवळचे तसेच लांबचे, अप्रगत व प्रगत यांचा अभ्यास मानवशास्त्राच्या दृष्टिकोनातून व्हावा म्हणजे या समाजांची तुलना करता येईल असे म्हटले आहे. त्यास अनुसरुन त्यांनी युगान्त पुस्तक लिहिले आहे.

हे पुस्तक भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थेच्या महाभारताच्या संशोधित आवृत्तीवर आधारले आहे. महाभारतास त्यांनी युगान्त का म्हणावे हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. आजच्या समाजातही रोजच्या जीवनात गावपातळीपासून लोकसभेपर्यंत महाभारतातील व्यक्तींच्या वागणुकीचे, मूल्यांचे आणि घटनांचे दाखले देण्यात येतात. रामायणातला आदर्शवाद आणि महाभारतातला उघडा नागडा व्यवहार हे भारतीय मूल्यांना घडविण्यात बऱ्याच अंशी कारणीभूत आहेत. रामायण ही सरळ सरळ पौराणिक कथा वाटते; परंतु महाभारताला इतिहासाचे रुप आहे. हस्तिनापूर, इंद्रप्रस्थ, द्वारका आजही आहेत. इरावती बाईंनी महाभारताचे विश्लेषण प्रामुख्याने काही प्रमुख स्त्री-पुरुषांच्या व्यक्तिमत्त्वाचे विश्लेषण करुन मांडले आहे.

मानवशास्त्रातील संस्कृती आणि व्यक्तिमत्त्व या संकल्पनांचा यात उपयोग केला आहे असे दिसून येते. तसेच त्या अनुषंगाने त्यावेळचा समाज, संस्कृती, अर्थव्यवस्था, वर्ण, जाती, कुटुंब, नातेसंबंध, धार्मिक विधी, देवदैवते, धर्म, अधर्म, याबाबतीतही विश्लेषणात्मक भाष्य केले आहे. तसेच स्त्री-पुरुष संबंध, स्त्रियांचे समाजातील स्थान याचोही ऊहापोह केला आहे.

मानवशास्त्राच्या अभ्यासपद्धतीत समाजाच्या सद्य:परिस्थितीचे वर्णन केले जाते. लोक असे का वागतात याचा विचार त्याअनुषगांने केला जातो. त्या वागण्यात किंवा सामाजिक मूल्यात परिवर्तन झाल्यास त्याची कारणे शोधण्याचा प्रयत्न करण्यात येतो. इरावतीबाईंनी याच पद्धतीप्रमाणे महाभारताचे मानवशास्त्रीय विश्लेषण केले आहे. त्यांनी शेवटच्या दहाव्या प्रकरणात, मानवशास्त्रीय दृष्टिकोनातून महाभारतकालीन समाज आणि संस्कृती यांचे विश्लेषण केले आहे. कदाचित युग बदलले याचा अर्थ महाभारत काळानंतर आलेल्या बुद्धाने सांगितलेल्या मूल्यांचा प्रसार झाला आणि त्यानुसार समाज, संस्कृतीतील आचार विचार बदलले असा होऊ शकतो. बौद्ध आणि जैन धर्म हे कदाचित महाभारत काळातील संहारक हिंसेची प्रतिक्रिया असावी.

युगान्त या पुस्तकात बाईंनी गांधारी, कुंती आणि द्रौपदी या स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाचा कानोसा घेतला आहे. तसेच पुरुषांमध्ये भीष्म, विदुर आणि कृष्ण यांच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास केला आहे. युगान्त मधील सर्व व्यक्ती या आजच्या लोकांच्या प्रमाणे हाडामासांच्या असून त्यांचे राग, लोभ, मत्सर, इच्छा, आकांक्षा, महत्त्वाकांक्षा, मैत्री यात जिवंतपणा आहे. रामायणासारखा आदर्शवाद महाभारतात नाही. आदर्शवाद आहे तो केवळ धर्म आणि अधर्म यांच्याबाबत विस्तृत चर्चा झालेल्या आहेत, आणि गीता हा त्यांचा परिपाक आहे. श्रीकृष्ण हा देवाचा अवतार असूनही हाडामासाच्या माणसासारखा वागला आणि त्याला सुद्धा काही इच्छा आकांक्षा होत्या असे दाखविले आहे.

महाभारतात जाती होत्या की नाही याबद्दल सबळ पुरावा नाही; पण जातीवजा समूह होते आणि त्यांच्यात वर्णव्यवस्थेसारखी उतरंड होती. सूत या समूहाबद्दल इरावतीबाईंनी बरीच चर्चा केली आहे. विदुराची आई सूत तर कर्ण जन्माने क्षत्रिय असून सूताकडे पालनपोषण झाल्याने सूत होता. कर्ण मेल्यावर क्षत्रियाच्या विधीने त्याचे अग्निसंस्कार झाल्याने त्याला मरणोत्तर क्षत्रियत्व प्राप्त झाले, तसेच तो सूत असूनही दुर्योधनाच्या कृपेने त्याला राज्य मिळाले. महाभारतात पितृप्रधान सामाईक कुटुंबाचे भरपूर वर्णन आहे.

या कुटुंबात तीन-चार पिढ्याचे लोक एकत्र राहत असत. परंतु आजच्या सारख्या नातेवाचक संज्ञा फारशा आढळत नाहीत. याबाबतीत थोडी गफलत आढळते. ओळख करुन देताना जे म्हटले जाते ती नाते संज्ञा असते. प्रत्यक्ष हाक मारताना चुलत भाऊ, मामेभाऊ इ. असे म्हटले जात नाही. आजही उत्तर भारतात वडिलांच्या मोठ्या भावास वडीलकीचा मान असतो पण तो आपला काका आहे हे माहीत असते, असे इरावतीबाईंचे म्हणणे आहे.

पतिव्रता या शब्दाचा अर्थ आजच्या संदर्भातून अगदी वेगळा वाटतो. दत्तक घेण्यापेक्षा

नियोगाने नवऱ्याच्या संमतीने पुत्रप्राप्ती करुन घेणे ही अनीती मानली जात नव्हती. स्त्रीला फक्त क्षेत्र मानले आहे, म्हणजे जमीन. बीज कोठून घ्यायचे ते नवऱ्याने किंवा सासूने ठरवायचे होते. यावरुन महाभारत काळात, पशूपालनाबरोबरच शेतीचा उद्योग असावा असे वाटते. तरी एकंदर पशुपालनाबाबत जास्त दाखले महाभारतात आहेत. गाई पळविण्याच्या प्रकारासारखे शेतावरील पीक चोरण्याच्या घटना महाभारतात नाहीत.

मानवशास्त्रात कुटुंबपद्धती आणि नातेसंबंधांबद्दल बऱ्याच संकल्पना व सिद्धांत आहेत. आपला जन्म झाला ते सगे कुटुंब व ज्यांच्याशी सोयरीक झाली ती इतर कुटुंबे, या विश्वात सर्वसाधारण आयुष्य सामावलेले होते. मराठीत नातेसंबंधांना सगेसोयरे म्हटले जाते. महाभारतात कौरव आणि पांडवांचे सोयरे त्यांच्या त्यांच्या बाजूने लढले. यास अपवाद म्हणून माद्रीचा भाऊ शल्य हा कौरवांकडून आपल्या दिलेल्या शब्दाला जागण्यासाठी लढला, परंतु त्याने कर्णाच्या रथाचा सारथी म्हणून कर्णाचे मनोधैर्य खच्ची करण्याचा जोरदार प्रयत्न केला.

स्त्रियांची परिस्थिती आजच्या उत्तर भारतीय पितृप्रधान कुटुंबापेक्षा वेगळी वाटत नाही. विवाहित स्त्रियांनी नवऱ्याकरता सर्वस्वाचा त्याग करणे, त्याच्या कुळाला जपणे आणि आई, पत्नी आणि सून म्हणून सर्व कर्तव्ये पार पाडणे ही मूल्ये समजली जात. आजही उत्तर भारतात नवरा मेल्यावर विधवेने धाकट्या दिराबरोबर पाट लावण्याची प्रथा आहे. परंतु महाभारतात व्यास हा थोरला दीर होता, म्हणून त्याला नियोगाचा वास्तविक अधिकार नव्हता. तसेच कुंतीलाही कुवारपणी व वैवाहिक जीवनात मुलं झाली त्यास नियोगाची उपमा दिलेली आहे. धर्मराजाने दास झाल्यावरही द्रौपदीला पणाला लावले यावरुन स्त्रीच्या कमी दर्जाची कल्पना येते.

महाभारतात मूर्ती व देवळं यांचा फारसा उल्लेख नाही. परंतु सूर्य-पूजा, यज्ञ यांचा उल्लेख आहे. परंतु प्रत्येक प्रसंगी धर्म-अधर्म याबाबत संवादात्मक चर्चा महाभारतात जितक्या आहेत तेवढी इतर कुठल्याही पौराणिक किंवा धार्मिक ग्रंथात सापडत नाही. या चर्चेत कृष्ण, अर्जुन, युधिष्ठिर, विदुर, भीष्म, कर्ण इ. चा वारंवार उल्लेख आहे.

महाभारताच्या कथेत कोणालाही आयुष्यात येणाऱ्या सुख-दु:ख, ऐश्वर्य, सर्वनाश यापासून सुटका नाही. त्यातून भीष्म, श्रीकृष्ण आणि धर्मराज यांनाही सुटका मिळाली नाही. यावरुन मानवी जीवनाच्या मर्यादा महाभारतात स्वच्छ उभरल्या आहेत. महाभारतातले शाश्वत मूल्य धर्माने आणि मानाने जगणे हेच आहे. फळाची आशा न करता आपल्या जन्मजात सामाजिक स्थानाप्रमाणे जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये पार पाडणे एवढा एकच मानवी जीवनाचा उद्देश आहे असे दिसते. नातेसंबंधाप्रमाणे मैत्रीची चर्चा आणि त्यांची उदाहरणे महाभारतात आहेत.

द्रोण-द्रुपद, कर्ण-दुर्योधन, अर्जुन-कृष्ण आणि कृष्ण-सुदामा या मित्र जोडींबाबत बरीच चर्चा आहे. परंतु या संबंधात बरोबरीची नाती किती आणि वेगवेगळ्या पातळीवर असलेल्या मैत्रीची पातळी दाखविली आहे. महाभारतात रथ आहे पण अश्वारूढ योध्दे नाहीत. त्यातून रथी, महारथी, अतिरथी, सारथी हे शब्द निघालेले दिसतात. पशुपालनाबद्दल

जेवढे संदर्भ आहेत तेवढे शेतीबद्दल नाहीत. कृष्णाचा भाऊ बलराम याचे हत्यार नांगर होते, अग्निमध्ये तुपाची आहुती आहे, तसे धान्याच्या आहुतीबद्दल संदर्भ सापडत नाही. जशी घोड्यांना नावे होती तशी शस्त्रांनाही नावे होती आणि शस्त्रांवर त्यांच्या त्यांच्या काही खुणा होत्या. गाईंवर सुद्धा राजांची मुद्रा उमटलेली असे. युगान्त मध्ये इरावतीबाईंनी कुरु आणि यदू यांच्या वंशावळ्या दिलेल्या आहेत आणि त्यांच्या सोयरिकींबद्दलही माहिती दिलेली आहे.

इरावती कर्वे यांच्या मानवशास्त्र व्यक्तीमत्वाच्या किंवा पांडित्याच्या दोन बाजू आहेत. पुरातत्वविज्ञान, भाषाविज्ञान, प्रागैतिहास, संस्कृत यांच्या मिश्रणातून सामाजिक संस्था व त्यांनी घडविलेली व्यक्तीमत्वं याबाबत संशोधन ही एक मांडणी. यामुळे कदाचित, महाराष्ट्रात मानवशास्त्रास मानववंशशास्त्र असे संबोधण्यात येते, ते चुकीचे आहे. ती चूक मराठी विश्वकोषात सुधारली आहे. कोठल्याही वागणुकीस, चालीरीतीस ऐतिहासिक पार्श्वभूमी असते, तसेच त्याचे समाजव्यवस्था स्थिर राहण्यासाठी काही कार्य असते हा मानवशास्त्रातील एक सिद्धांत आहे. अर्थात समाज-संस्कृती परिवर्तनाचे विश्लेषण करताना या सिद्धांताचा फारसा उपयोग होत नाही असे आता वाटावयास लागले आहे. इरावतीबाईंनी या प्रमेयांतून महाभारताचे विश्लेषण केले आहे.

महाभारत काळातील वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, स्त्री-पुरुष संबंध, स्त्रियांचा दर्जा, राज्ये व त्यांचे आपापसातील संबंध, नातेसंबंधातून राजकारण या बाबींचा ऊहापोह इरावतीबाईंनी काही व्यक्तीचित्रे रेखाटून केला आहे. महाभारतानंतर येणाऱ्या बौद्धकाळाशी त्यांनी संगत लावण्याचा प्रयत्न केला आहे. आजही ही व्यक्तीमत्वे उत्तर भारतात सापडतात. महाभारतातील मूल्य, विचारसरणी, वागणूक हिंदी प्रदेशात दिसतात. महाभारत हा एक जिवंत इतिहास आहे या भूमिकेतून, महाभारत कथांतील सांस्कृतिक मूल्ये व महत्त्वाची वागणूक वेचून त्याला मानवशास्त्राचे सिद्धांत वापरुन ओघवत्या भाषेत इरावती कर्वे यांनी जी मांडणी केली आहे त्याला तोड नाही.

मानवशास्त्रात अशा प्रकारच्या विश्लेषणाची इतर उदाहरणे नाहीत. अजूनही महाभारताचे वेगवेगळ्या अंगातून विश्लेषण व भाष्य होऊ शकते हे युगान्तने दाखवून दिले आहे. भारतीय मानवशास्त्रात युगान्तपासून बरेच काही शिकण्यासारखे आहे. ■■

| | | |
|---|---|---|
| ग्रंथाचे नाव | : | युगान्त |
| लेखिका | : | डॉ. इरावती कर्वे |
| प्रकाशक | : | देशमुख आणि कं., पुणे. |
| वर्ष | : | १९६७ |

# आठवणी माझ्या आईच्या....

डॉ.आनंद कर्वे

माझ्या आईच्या ज्या आठवणी आहेत त्या माझ्या लहानपणीच्या आहेत. माझ्या तरुणपणात मी तिच्या सोबत नव्हतो. शिक्षणाच्या निमित्ताने मी बाहेर होतो, ते तिच्या मृत्यूनंतरच पुण्यात आलो, त्यामुळे ज्या काही आठवणी आहेत त्या लहानपणीच्याच.



ती मला बऱ्याचदा तिच्याबरोबर कामाच्या ठिकाणी घेऊन जात असे. कदाचित घरी मला बघणारे कोणी नसेल किंवा काय ते आठवत नाही. पण ती जुव्हेनाईल कोर्टात ऑनररी मॅजिस्ट्रेट म्हणून आठवड्यातून एक दिवस जात असे, त्यावेळेस मला ती बरोबर नेत असे. आम्ही त्यावेळेस गावाबाहेर म्हणजे एरंडवण्यात राहत होतो. त्यावेळेस गावाबाहेर तिथे गाडगीळ, कर्वे असे मोजकेच बंगले होते. तिथून गावात जायचे म्हणजे टांगा हे एकमेव वाहन. त्याचा दरही खूप असे.

जुव्हेनाईल कोर्ट ते आमचे घर एवढे अंतर येण्यासाठी टांग्याला तीन रुपये द्यावे लागत. त्यावेळेस हे तीन रुपये आजच्या शंभर रुपयांपेक्षा जास्त होते. मी टांग्यासाठी हट्ट करायला लागलो की आई मला पुढच्या चौकापर्यंत जाऊया मग टांगा करुया, असे म्हणत खूप अंतर चालवत नेत असे.

डेक्कन कॉलेजच्या 'टूर्स' ना पण आम्हाला घेऊन जात असे. त्यावेळेस सहकाऱ्यांसाठी बजेट कमी असायचे, त्यामुळे सहकारी म्हणून ती आम्हालाच घेऊन जात असे. रक्ताचे नमुने तपासणी अशी कामे आम्ही करत असू.

आई म्हणून प्रत्येक आईला तिची मुले जशी असाविशी वाटत तशीच तिलाही वाटत. आमच्या घरात बरेच खेळीमेळीचे वातावरण असायचे. मोकळेपणाने चर्चा होत असे. आम्ही गावाबाहेर राहत असल्याने आमच्या घरात एक कपाट होते, त्यात सर्व प्रकारची हत्यारे, हबक, सरस, फ्रेंच पॉलीश सर्व काही असायचे. कारण ऐनवेळेला काही मिळायचे नाही. त्यामुळे सर्व प्रकारच्या दुरुस्त्या घरीच करत असू. त्यातूनच मला सुतारकामाचा छंद लागला. आम्ही गावाबाहेर असल्याने मित्र-मैत्रिणी जास्त नव्हत्या. आपली करमणूक आपणच करावी

लागे. मग मी चहाची खोली घेऊन त्यांचे डिझाईन बनवणे, क्रोशे काम करणे, चिंध्यांचे चेंडू तयार करणे असे उद्योग करत असे. माझी आई आमच्यासाठी चिंध्यांच्या बाहुल्या बनवून देत असे. तिने मला वॉर सरप्लस मधून २००-२५० रु. ची एक मोटार सायकल घेऊन दिली होती. ती मी घरी दुरुस्त करुन वापरत होतो. लहानपणापासून तिने मला निरीक्षणाची सवय लावली. पक्षी, प्राणी बघ, त्यांची निरिक्षणे लिही. मी निरीक्षणे लिहिण्यासाठी वही तयार केली होती.

आई आम्हाला एकदा पानात वाढलेले खायलाच लावायची. मला आठवते, आमच्याकडे नेहमी स्वयंपाकी, धुणे-भांडेवाली व माळी असे तिघेजण कामाला असायचे. मी एकदा नोकरांशी वाईट वागलो म्हणून तिने मला कडक शिक्षा केली होती. नोकरांशी, पाळीव जनावरांशी कसे वागायचे, याबाबत ती ठाम असायची. एकंदर मुलांच्या वागणुकीबाबत तिचे काही नियम होते. 'असे वागायचे नाही म्हणजे नाही'. मला वाटते, त्या काळातल्या सगळ्या आया अशाच होत्या. अजूनसुद्धा नवीन पिढी आई-वडिलांना उलटून बोलते, ते ऐकायला आम्हाला बरोबर वाटत नाही.

आईने ॲलोपॅथी औषधे जास्त घेतली नाहीत. आम्हा मुलांच्या लहानसहान आजारांकरिता ती. डॉ. आपट्यांचे होमिओपॅथीचे औषध आणायची. तिच्याकडे एक पुस्तक होते, त्यातले बघून ती घरच्या घरी औषधे करायची. मला आठवते महिन्यातून एकदा ती आम्हाला एरंडेल पाजायची.

तिचा अभ्यासही होता, त्यामुळे वाचनही अफाट होते, ती आम्हाला भरपूर गोष्टी सांगायची. त्यातली एक आवडती गोष्ट म्हणजे बायबल मधली राजाची गोष्ट. ती गोष्ट सांगून ती म्हणायची, राजाकडे चाललाय तर चांगले चुंगले कपडे घालून जा. जशी परिस्थिती असेल तसे वागावे. जिथे चाललो आहे, त्यामाणसातले माणूस होऊन राहवे त्यामुळे ज्या ठिकाणी पाहिजे तिथे ती मंगळसूत्र घालून व कुंकू लावून जात असे.

तिचा कल्पना विलास खूप चालायचा. ती म्हणायची जीन (अल्लाउद्दीनचा जीन) हा शब्द 'जैन' पासून आला. जे अद्‌भूत, अद्वितीय आहे ते जीन. तिला मराठी संस्कृतीचा फार अभिमान होता, म्हणून तिने तिच्या मुलांची नावे जाई, आनंद, गौरी अशी अस्सल मराठमोळी ठेवली.

ती अतिशय चतुरस्त्र स्त्री होती. ती अफाट वाचन करी. कलाशास्त्राची पदवीधर; पण मेडिकल ॲन्थ्रॉपॉलॉजी मध्ये पीएच.डी करताना तिने बायोलॉजीचा भरपूर अभ्यास केला. वनस्पती व प्राणी यांचा ही तिचा फार दांडगा अभ्यास होता. तिला सायकल चालवता येत होती. ती शाळेत सायकलवरून जात असे. साधारण १९५२-५४ च्या दरम्यान तिने लॅम्ब्रेटा घेतली. मग ती डेक्कन कॉलेजला स्कूटरवरुन जात असे.

तिला वेगवेगळे पदार्थ करायला फार आवडे. त्यावेळेस रेशनिंगचा काळ होता. त्यात मका मिळायचा. मका भाजणे किंवा किसणे अशा गोष्टींपेक्षा मक्याचा रवा काढणे त्याचा शिरा करणे. उकड्या तांदूळ आणून त्याचे इडली, डोसे करणे, असे प्रयोग ती करायची. तिला वेस्टर्न कुकींगची पण आवड होती. त्या काळात आमच्याकडे ओव्हन होता. त्यात केक करायची. केकचे पीठ घोटायचे काम मी

करायचो. कारण मला भांडे चाटायला मिळायचे. सामोसे तळण्यापेक्षा बेक्ड् करणे. तिखटमिठाच्या करंज्या करणे. ती याबाबतीत पण खूप प्रयोगशील होती. 'मॅक्रुन' म्हणून एक स्कॉटीश पदार्थ आहे. तो बदाम वापरून करतात; पण आई तो शेंगदाणे वापरून करायची.

मुंबईला काळ्या घोडयाजवळ एक व्हाईटअवे अ‍ॅण्ड लेडलॉ म्हणून एक ब्रिटिश दुकान होते. भारतातल्या ब्रिटिशांना लागणाऱ्या सर्व गोष्टी ते इंग्लंडमधून मागवून घ्यायचे. त्या दुकानाचा दिवाळीच्या सुमारास कॅटलॉग येत असे. त्या कॅटलॉग मधली चित्रे (म्हणजे खाण्याच्या पदार्थांपासून ते बंदुकीच्या काडतुसीपर्यंत सर्व गोष्टी) बघायला मला खूप आवडे. तो कॅटलॉग आमच्या घरी नेहमी येत असे.

आमच्या घरी देव नव्हते. पण आमची आई अनेक जत्रा, यात्रांना जात असे. तिथे जमलेल्या लोकांची निरीक्षणे करणे हा त्यातला मुख्य हेतू होता. तिला हृदयविकार जडल्यानंतर अस्वस्थ वाटायला लागले की ती पंढरपूरला जायची. कदाचित तिला त्यातून मानसिक विश्रांती, बौद्धिक विश्रांती मिळत असेल.

ती अतिशय करारी होती. माझे बाबा फर्ग्युसनचे प्रिन्सिपॉल असताना, त्यावेळेस अशी पद्धत होती की ग्रुप फोटो मध्ये प्रिन्सिपॉल व त्यांच्या शेजारी त्यांची पत्नी असे. आई म्हणायची 'इरावती कर्वे म्हणून फोटो काढायचा तर येईन पण प्रिन्सिपॉलची पत्नी म्हणून मी फोटो काढणार नाही.'

*ही आंदयाची आई* ही माझी खरी ओळख. या घटनेबाबत लोकांचा जरा गैरसमज आहे. त्याचे काय आहे की ती कुठल्याही कार्यक्रमाला गेली की तिची ओळख करुन देताना ही अण्णांची सून, प्रा. दिनकर कर्वे यांची पत्नी, अ‍ॅडमिरल करमरकरांची बहीण असे सांगितले जात असे. त्यामुळे ती वैतागे व म्हणे माझी ओळख माझ्या आजूबाजूच्या पुरुषांवरुन होते. त्यात ही 'आंदयाची आई' म्हटल्यावर ती म्हणाली आता हे वर्तुळ पूर्ण झाले.

(शब्दांकन : विदुला पुरोहित) ■■

---

(पृष्ठ ४० वरून पुढे)

स्वरुपाचे होते, त्याचे महत्त्व कोणते? किती सूक्ष्मतेने त्यांनी इतक्या वर्षांपूर्वी मराठी संस्कृती, जाति - व्यवस्थेचा विचार केला होता. याचा परिचय प्रथमच मराठी वाचकांना या पुस्तकाद्वारे होत आहे.

आणखीनही एका दृष्टीने सदर पुस्तक महत्त्वाचे ठरते. पुढच्या पिढीला इरावतीबाईंच्या कार्याचा परिचय करुन देण्याच्या दृष्टीने हे पुस्तक महत्त्वाचे ठरते. वाङ्.मयेतिहासाच्या दृष्टीने विविध वाङ्.मयीन प्रवाहांचे विवेचन जसे महत्त्वाचे ठरते, तसेच त्या प्रवाहांत मौलिक भर घालणाऱ्या विविध विषयांवर लेखन करणाऱ्या लेखकांच्या कार्याचा चिकित्सक अभ्यासही महत्त्वाचा ठरतो. वाङ्.मयीन कर्तृत्वाचे डॉक्युमेंटेशन त्यातून होते. समीक्षेची ती गरजच असते. इरावती कर्वे यांच्या विषयीच्या ग्रंथाची गरज होती आणि ती या पुस्तकाने भरून काढली आहे.

इरावतीबाईंचे संकीर्ण लेखन, त्यांची एकूण ग्रंथसंपदा, त्यांचा चरित्रपट ही परिशिष्टे पुस्तकाची संग्राह्यता व संदर्भमूल्य वाढवणारी आहेत.

इरावती कर्वे हा विषय अभ्यासाच्या दृष्टीने आव्हानात्मक होताच. ते आव्हान डॉ. उषाताई कोटबागी ह्यांनी यशस्वीरीतीने पेलेले आहे, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. ■■

# डॉ. इरावतीबाईंची एक अविस्मरणीय भेट

## डॉ. म. आ. नारे

सन १९६६ सालची गोष्ट, आम्ही इंग्रजी विषयाचे प्राध्यापक यु.जी.सी. ब्रिटिश कौन्सिल व पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या समर इन्स्टीटयूट मध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून डेक्कन कॉलेजात दीड महिना वास्तव्यास होतो. आमचे वर्ग तेथील वेगवेगळ्या इमारतींमध्ये होत असत.

बरेचदा डॉ. इरावतीबाईंच्या विभागासमोरून जाताना आपण त्यांना एखादे दिवशी निवांतपणे भेटावे अशी सारखी इच्छा होत असे. पुढे आम्ही काही प्राध्यापकांनी मिळून त्यांची रीतसर परवानगी मागितली व त्यांना भेटण्याकरिता त्यांच्या केबिनमध्ये गेलो.

त्यांनी आमचे हसतमुखाने 'या बसा' अशा शब्दात स्वागत केले. आम्ही देखिल त्यांना नमस्कार करीत त्यांच्या टेबलाभोवती मांडलेल्या खुर्च्यांवर बसलो. त्यांनी लगेच आमचा परिचय करुन घेतला व आम्हाला आमच्या प्रदेशातील (उदा. विदर्भ, खानदेश, मराठवाडा इ.) दैवतांची माहिती विचारली. थोडयाच वेळात माझा नंबर आला. मी विदर्भातील आहे हे त्यांना समजताच त्यांनी माझ्याकडून अकोला, अमरावती, बुलढाणा या जिल्ह्यातील प्रमुख दैवते कोणती तसेच धार्मिक उत्सव कोणते आहेत हे जाणून घेतले. नंतर त्या म्हणाल्या, 'पूर्वी मी बऱ्याच ठिकाणी जात असे-आता फारसे जाणे होत नाही...' माझ्याशी त्यांचे बोलणे संपत येताच मी त्यांना म्हणालो.

'मॅडम, मला आपणास एक महत्त्वाचा प्रश्न विचारावासा वाटतो. प्रश्न इंग्रजी भाषेसंबंधीच आहे- विचारु का?' 'विचारा, संकोच का करता?' असे म्हणून त्यांनी मला परवानगी दिली.

मी म्हणालो, मॅडम, अलीकडे इंग्रजी भाषेविषयी बरीच सुशिक्षित मंडळी तिरस्कारयुक्त बोलत असतात. आपल्या शाळा कॉलेजामधून ही परकीय भाषा आवश्यक (सक्तीचा) विषय म्हणून का शिकवली जावी? असे करणे हे गुलामगिरीचे द्योतक होय. आपल्या मातृभूमीचा, मातृभाषेचा व संस्कृतीचा हा घोर अपमान आहे. काही राजकीय पुढारी तर चक्क जाहीर सभांमधून 'आपण इंग्रजी भाषेच्या कुबड्या आता झुगारून दिल्या पाहिजेत- इंग्रजांची भाषा शिकणे ही गुलामगिरीच होय' असे सांगून बहुजनसमाजातील पालकांची व विद्यार्थ्यांची सारखी दिशाभूल करण्याचा उघड उघड प्रयत्न करीत आहेत. आपण कृपया या विषयावर आपले काय मत आहे हे आम्हास सांगितले तर बरे होईल.

माझे बोलणे संपताच क्षणाचाही विलंब न लावता त्या म्हणाल्या:

''नारे, यावर माझे मत असे आहे की आपल्या शाळा-कॉलेजांमधून इंग्रजी भाषा आवश्यक (सक्तीचा) विषय म्हणूनच शिकवली गेली पाहिजे. जर ही भाषा ऐच्छिक विषय म्हणून शिकविण्यास सुरुवात झाली, तर बहुजनसमाजातील बहुतेक विद्यार्थी हा कठीण विषय आहे असे समजून तो ते शिकणारच नाहीत.

मानवी स्वभावच असा आहे की, जर एखाद्या व्यक्तीसमोर दोन पर्याय दिलेत तर ती व्यक्ती सोपा वाटणारा पर्यायच निवडण्याची शक्यता जास्त असते. म्हणून असे केल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिकदृष्ट्या फार नुकसान होईल व त्यांची दिवसेंदिवस सतत पिछेहाट होत राहील. मग आपण स्वातंत्र्य मिळवून काय साधले?

इंग्रजी हा आवश्यक विषय असल्याने सर्व समाजातील विद्यार्थी एका सामान्य रेषेवर येऊन उभे राहतात व मग तेथून त्यांची खरी शर्यत सुरु होते.

तसे झाले नाही तर थोड्याच दिवसांत तुम्हाला असे असे चित्र दिसेल की, गोखले, परांजपे, भावे ही मंडळी आपल्या मुलामुलींना इंग्रजी विषयाचे चांगले अध्ययन करायला लावतील व तुम्हाला या चढाओढीतून कायमचे मागे टाकून स्वत: लोणी चाखत राहतील. यामुळे सामाजिक विषमता अधिकाधिक वाढत जाईल.

मी तर असे म्हणेन, खेड्यापाड्यातील लहान मोठ्या शाळांमधून देखिल चांगले इंग्रजी शिक्षण घेऊनच विद्यार्थी बाहेर पडले पाहिजेत. म्हणजे शहरी व ग्रामीण विद्यार्थी असा फारसा फरक त्यांच्यात राहणार नाही. जसे तुम्ही लोक या भाषेच्या प्रशिक्षणासाठी येथे आलात असेच प्रशिक्षणाचे वर्ग खेड्यापाड्यातील शाळांमधील शिक्षकांकरिता देखिल आयोजित केले पाहिजेत. तुम्ही लोकांनी विद्यार्थ्यांच्या पालकांना योग्य मार्गदर्शन करुन ते लोक स्वार्थी राजकीय पुढाऱ्यांच्या अपप्रचारास बळी पडणार नाहीत याची खबरदारी घेतली पाहिजे. त्यांच्या भावी पिढ्यांचे नुकसान होणार नाही याची जाणीव त्यांना करुन दिली पाहिजे.''

डॉ. इरावतीबाईंचे हे तडफदार वक्तव्य ऐकून काही क्षण आम्ही सर्वजण थक्क झालो. त्यांच्या मनातील बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासाची कळकळ किती खोलवर रुजलेली आहे, याची जाणीव आम्हाला झाली व आम्ही भारावून गेलो आणि त्यांच्याविषयी आमच्या मनात असणारा आदर द्विगुणीत झाला. नंतर हळूहळू आमच्या चेहऱ्यांवर एक वेगळाच आनंद दिसू लागला.

त्यांची ही छोटीशी भेट - एक अविस्मरणीय मुलाखत म्हणून माझ्या मनात कायमची कोरली गेली.

मागील ४० वर्षांत ज्या ज्या वेळी मला इंग्रजी भाषेविषयी चर्चा करण्याची संधी मिळाली त्या त्या वेळी मोठ्या अभिमानाने मी डॉ. इरावतीबाईंच्या मौलिक विचारांची आठवण करुन देत असे व ऐकणाऱ्यांच्या मनावर त्याचा चांगलाच प्रभाव पडत आहे, हे पाहून माझे मन प्रसन्न होत असे.

आज मी ७० वर्षांचा असताना त्यांचे इंग्रजी शिक्षणाविषयीचे निर्भीड विचार त्यांच्या जन्मशताब्दीच्या माध्यमातून महाराष्ट्रातीलच नव्हे तर अखिल भारतातील शिक्षणतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ व विविध क्षेत्रातील विद्वानांपर्यंत पोहोचविण्याची संधी मला प्राप्त झाली व माझ्या जीवनातील फार मोठा योगायोग होय, असे मी समजतो.

अशा थोर, निर्भय वृत्तीच्या विचारवंतांमुळेच महाराष्ट्र हे पुरोगामी विचारांचे राज्य बनले आहे, आणि म्हणूनच इंग्रजी हटाव ही घातक मोहीम येथे डोके वर काढू शकली नाही. बहुजन समाजाच्या दृष्टीने एक भयंकर संकट टळले.

अलीकडे आपल्या शासनाने

(पृष्ठ ५५ वर पहा)

# कानोसा आठवणींचा...

डॉ. उषा कोटबागी

## इरावतीबाई आणि डेक्कन कॉलेज

इरावतीबाईंनी १७ ऑगस्ट १९३९ ते अखेरच्या दिवसापर्यंत म्हणजे ११ ऑगस्ट १९७० पर्यंत डेक्कन कॉलेजमध्ये संशोधन केले. डेक्कन कॉलेज रिसर्च इन्सिटटयूट मध्ये काम करणाऱ्यांचा असा लौकिक होता की, सरकारी वेतनापेक्षाही कमी वेतन घेऊन, बढतीची किंवा जास्त वाढत्या पगाराची अपेक्षा न करता केवळ ज्ञानासाठी, स्वत:च्या विषयाच्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी विरळसपणे काम करणे राष्ट्रासाठी, राष्ट्रातील संस्थेसाठी अव्याहत तीस एकतीस वर्षे काम करणे हेही देशभक्तीपर काम समजायला हवे. डेक्कन कॉलेजबद्दल इरावतीबाईंना जे प्रेम वाटत होते ते पुढील गोष्टीमुळे कळते शिवाय त्यांची प्रशासकीय कुशलताही समजते.

डेक्कन कॉलेज १९३९ साली सुरु झाले. त्यानंतर लगेचच दुसरे महायुद्ध सुरु झाले. त्यामुळे कॉलेज सुरु होऊन पंधरा दिवस झाले नाही. तोवर त्याचा ताबा मिलिटरीच्या लोकांनी घेतला. कॉलेज पुणे रेल्वे स्टेशनजवळ जीजीभाई कॅसळ येथे हळवले गेले व कॉलेजच्या जागेत सैनिकी व प्रशिक्षण केंद्र काढण्यात आले.

१९६२ साली - चिनी युद्धामुळे, संरक्षण विभाग डेक्कन कॉलेज पुन्हा ताब्यात घेणार होते. संरक्षण विभागातर्फे मोजमापे घेऊन झाली होती. संस्कृत शब्दकोषाचा युद्धाच्या वेळी काय उपयोग? अशी ती विचारसरणी होती. इरावतीबाईंनी त्यावेळचे राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् सर्वपल्ली यांनाच थेट पत्र लिहिले. डॉ. राधाकृष्णन् इरावतीबाईंना ओळखत होते. याशिवाय प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनी नवनिर्वाचित संरक्षणमंत्री श्री.यशवंतराव चव्हाण यांना विनंती केली व यशवंतरावांनी त्यावेळेच्या जनरल चौधरींना व प्रशिक्षण ची जागा बदलण्याबाबत विचारणा केली. त्याप्रमाणे नव्याने नेमणूक झालेल्या सैनिकी अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण केंद्र घोरपडीला उघडण्यात आले आणि डेक्कन कॉलेजचे काम चालू राहिले. कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटला जातो तो असा.

■■

## मूळ संदर्भाचा उल्लेख न केल्याबद्दल ग. दि. माडगुळकरांवर रोष

कै. ग.दि. माडगुळवर ह्यांचा चंदनी उदबत्ती हा कथासंग्रह इरावतीबाईंनी मुंबईमध्ये वाचला. त्यातील स्वामित्व ही कथा भारतीय जीवनाला न जुळणारी अशी गोष्ट वाटली व त्यामुळे लक्षात राहिली. आपले अनुभव कदाचित मर्यादित असतील म्हणून आपल्याला असे वाटते असे मानून इरावतीबाईंनी स्वत:चे मनाची समजूत काढली. त्यानंतर पुण्याला आल्यावर imprint चा अंक त्यांनी वाचला. त्यात द डेड हॅंड ही गोष्ट वाचनात आली व इरावतीबाईंची खात्री पटली की स्वामित्व म्हणून जी गोष्ट आपण वाचली ती हीच. तीच गोष्ट ग्रॅहम ग्रीनच्या May we borrow your husband या कथासंग्रहात आहे.

इरावतीबाई नैतिक मूल्यांचे सतत भान ठेवून असत. न्यायाचा तराजू समतोल तोळणे हेही वैशिष्टय होतेच. त्यांनी ग. दि. माडगुळकरांना विचारले की मुलांनी कॉपी केली तर त्यांना एक ते तीन वर्षे त्याच वर्गात राहण्याची शिक्षा आहे. ह्या अशा तऱ्हेच्या कॉपीला काय म्हणावे? ग्रॅहम ग्रीनच्या अमक्या अमक्या आवडलेल्या गोष्टींचे

भाषांतर म्हणून खुलासा केला असता तर माडगुळकरांचा रसिकपणा दिसला असता. शिवाय त्यांच्या मराठी भाषेच्या प्रभूत्वाची नवी प्रचीती आली असती. सध्याच्या प्रकारात रसिकपणा दिसतो. बाकी शून्य गोष्टीचे नाव बदलल्यामुळे गोष्टीचा गाथाच नाहीसा झाला आहे.

प्रथितयश लेखकांच्या कॉपीराइटचा हक्क एकवेळ मान्य नसेल, पण त्याची गोष्ट मूळ आहे, हे सुद्धा चोरून ठेवावे का?

माडगुळकरांसारख्या सिद्धहस्त लेखकाला, शीघ्रकवीला इतके पडखरपणे लिहिणारे व्यक्तिमत्व म्हणजे इरावतीबाई.

माडगुळकरांनीही स्वत:ची चूक कबूल करण्याचा मोठेपणा दाखविला व पुढील आवृत्तीत योग्य ती दुरुस्ती करण्याचे आश्वासन दिले. ■■

(पृष्ठ ५३ वरून पुढे)

खेडयापाड्यातील शाळांमधून देखिल पहिल्या इयत्ते पासूनच चांगल्या प्रकारे इंग्रजी शिकविण्यास प्रारंभ केला आहे. शासनाचा हा उपक्रम अतिशय स्तुत्य होय. याकरीता बहुजन समाजातील पालकांनी व शिक्षकांनी शासनाचे मन:पूर्वक आभार मानून त्यांच्या या उपक्रमास भरघोस पाठिंबा दिला पाहिजे. तसेच तो अधिकाधिक चांगल्या प्रकारे राबविला जावा याकरिता सहकार्य केले पाहिजे.

आज बहुजन समाजातील बरेच विद्यार्थी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवून व आपल्या बुद्धीमत्तेच्या जोरावर विविध क्षेत्रात चमकताना दिसतात. एवढेच नव्हे तर परदेशात जाऊन देखिल ते आपल्या कर्तृत्वाने व कौशल्याने आपली छाप विविध क्षेत्रात उमटवीत आहेत. ही एक अभिमानाची बाब आहे.

आज डॉ. इरावतीबाई असत्या तर त्यांचे स्वप्न साकार होत आहे हे पाहून त्यांना किती समाधान झाले असते? अशा थोर, द्रष्टया समाजसेविकेच्या पवित्र स्मृतीस माझे विनम्र अभिवादन ! ■■

(पृष्ठ ३६ वरून पुढे)


लग्नानंतर जेवढे उत्तर भारतात तुटते तेवढे महाराष्ट्रात तुटत नाही. विवाहसमयी मामाची गरज असते. यामुळे तेथे आजोबा-आजी साठी वेगळेवेगळे शब्द आहेत. अशाप्रकारे नातेवाचक संज्ञा संस्कृतीचे दर्शन घडवितात. समाजातील एकमेकांशी वागणूक ही नातेदारी संबंधावर आधारलेली असते. इतकेच काय, विवाहाच्या नियमांमुळे विवाहबाह्य किंवा विवाहपूर्व संबंधांवर सुद्धा नातेदारी व्यवस्थेत जे मान्य असेल त्याची छाप असते. इरावती कर्वे यांनी भारतातील नातेदारी व्यवस्थेचे तपशीलात विश्लेषण केले आहे. विशेष म्हणजे या अभ्यासात पन्नास वर्षे लोटल्यानंतरही संशोधकांनी याविषयात काही नवीन भर घातली नाही. ■■

| | |
|---|---|
| ग्रंथाचे नाव | : भारतातील नातेदारी पद्धतीने संघटन (किनशीप ऑर्गनायझेशन इन इंडिया) |
| लेखिका | : डॉ. इरावती कर्वे |
| प्रकाशक | : डेक्कन कॉलेज पदव्युत्तर संशोधन संस्था, पुणे. |
| वर्ष | : १९५३ |

# संस्कृति म्हणजे काय?

## डॉ. इरावती कर्वे

मनुष्यसमाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिति व डोळ्यांना न दिसणारी, पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टि म्हणजे संस्कृति. संस्कृति नेहमी परंपरागत व म्हणून दिक्कालनिर्बंधित अशी असते. संस्कृति समाजाची असते, व्यक्तीमध्यें संस्कृति साकारते, जिवंत होते, नव्यानें निर्माण होते किंवा लय पावते, पण कोणतीही व्यक्ती कोणत्याही संस्कृतीचें स्वरुप पूर्णाशानें दाखवूंच शकत नाहीं. संस्कृतीला व्यक्तीनिरपेक्ष असे एक निराळेंच स्वतंत्र जीवन असते. व्यक्ती जन्माला आल्यापासून एका परंपरागत वस्तुरुप संस्कृतीने वेढलेली व अव्यक्त पण दृढ अशा सामाजिक परंपरेत गुरफटलेली असते. व्यक्तींच्या जीवनविकासाच्या मर्यादा संस्कृतीच्या ह्या दोन अंगांनी निश्चित केलेल्या असतात.



परंपरा निरनिराळ्या प्रकारची असूं शकते. एक केवळ शरीर परंपरा, दुसरी शरीर व साहचर्याची संमिश्र परंपरा व तिसरी नुसती साहचर्याची परंपरा, ह्या तिहींतील फरक खालील उदाहरणाने स्पष्ट होईल.

कोणत्याही जीवजातींत पितृसदृश (पितृसदृश = आई आणि बापासारखी; पिता+माता = पितरौ) संतति निर्माण होते ती शरीर परंपरेने. एकपेशिक प्राण्यांपासून बहुपेशिक प्राण्यांपर्यंत अगदी एकाच मार्गानें नव्या पिढीचे उत्पादन व तिचें पितृसाधर्म्य प्राणिसृष्टीत साधलेले आहे. पितरांच्या शरिरांतील पेशीपासूनच नव्या जीवाची उत्पत्ति होते. अतिसूक्ष्म जीव व काही कीटक ह्यांच्या बाबतीत माता व पिता अशा दोन व्यक्ती जननासाठीं लागत नाहीत. एकाच व्यक्तीच्या शरीरांतून एक पेशी निघते व तिची वाढ होऊन नवा प्राणी जन्मतो. ह्या उलट बहुतेक वरच्या श्रेणीच्या बहुपेशीय प्राण्यांच्या बाबतीत जननी व जनक अशा दोन व्यक्ती नव्या पिढीला जन्म देण्यास आवश्यक असतात. प्रत्येकाच्या शरीरांतून एक एक जननपेशी निघून त्यांचा संयोग होऊन त्या एक होतात व अशा संयोगित जननपेशींमुळे नव्या प्राण्याचा जन्म होतो. ह्यालाच आपण गर्भ म्हणतो. माशांपासून मासे, किंवा कीटकांपासून कीटक उत्पन्न होतात, ह्याचें कारण दोन्ही पितरांमधून त्या त्या जातीला आवश्यक असणारे सर्व गुणधर्म-शरीररचना व क्रियासामर्थ्य - ह्या संयोजित पेशीमध्ये किंवा गर्भामध्ये एकवटलेले असतात. गर्भाची पूर्ण वाढ झाली की तो नवा जीव सर्व आवश्यक क्रिया कोणींही न शिकवता करुं शकतो.

मासे आपली अंडी विस्तीर्ण समुद्रावर कोठेतरी फेसाळ बुडबुड्यांच्या आवरणांत घालतात. ते त्या अंड्यांचे संरक्षण करीत नाहीत. त्यातील बरीच इतर जलचर खातात. जी काही थोडी वांचतात, त्यातून लहान लहान मासे बाहेर पडून मागच्या पिढीतील कोणाही माशाच्या मदतीशिवाय आपले जीवन स्वतंत्रपणे सुरु करतात. कीटकांचे जीवन तर ह्याहीपेक्षां आश्चर्यकारक आहे. बहुतेक कीटकांच्या बाबतीत असे आढळून येते की नरमादीचा संयोग होऊन मादीची गर्भधारणा झाली की नर मरून जातो. बहुधा पक्ष्यांच्या भक्ष्यस्थानी पडतो व मादी अंडी घातल्याबरोबर मरते. कुठल्या तरी झाडाच्या पानावर, किंवा जमिनीत, किंवा झाडाला भोक पाडून त्यांत अंडी घातलेली असतात. त्यातली कितीतरी नष्ट होतात. काही फुटली की त्यातून सुरवंट बाहेर येतात व ते खाऊन खाऊन पुष्ट होऊन झोपी जातात. झोपेतून उठले की त्या सुरवंटांची फुलपाखरे होतात व प्रजोत्पत्ति करुन ती मरून जातात. मधमाशा एक ऋतुभर जगतात. राणी माशीच्या अंड्यांतून आलेल्या आळयांना त्या पोसतात व आळयांच्या माशा होण्याच्या वेळी सबंध जुनी पिढी मरुन जाते.

जुन्या पिढीचे मार्गदर्शन तर राहोच, पण साहचर्यसुद्धा नव्या पिढीला लाभत नाही; आणि तरीहि अंड्यामध्ये दोन्ही पितरांच्या शरीरपेशींतून जी द्रव्यें येतात त्यांच्यायोगाने रुप, शरीररचना वगैरे सर्व संततीला मिळते व ती आपल्या आयुष्याचा मार्ग रघुवंशांतील राजाप्रमाणे एक रेषामात्रही न चुकता आक्रमण करते. पिढ्यान्‌पिढ्या त्याच त्याच नमुन्याचे जीवन जगण्याची ही जी परंपरा, ती संपूर्णतया शरीरपरंपरा असते. पितरांच्या शरीरांतून आलेल्या पेशीमुळे ही परंपरा उद्भवते. ह्यामध्ये जुन्या पिढीचें मार्गदर्शनही नाही व नव्या पिढीचे उपदेशग्रहणही नाही. अशा प्राण्यांमध्ये संस्कृतीचा उगम होणे शक्य नाही.

शरीर व साहचर्य ह्यांची संमिश्र परंपरा

मांजराचे पिल्लू किंवा गाईंचे वासरुं आईच्या साहचर्याने वाढते, मांजराच्या पिल्लाची जीवधारणा मातृक व पैतृक जीवपेशींच्या संयोगाने झालेली असते. पण पिलाचे साहचर्य आईशींच असते. आई पिल्लाला कितीतरी गोष्टी शिकवते. शिकार करण्याची कला ते आईकडूनच शिकते. नैसर्गिक परिस्थितीत नसलेल्या कित्येक क्रिया व बरेच ज्ञान आईकडून त्याला मिळते. पाळलेले मांजर थोड्याच दिवसांत खाण्याची वेळ ओळखते. अन्नदात्याला ओळखते. अन्न कुठे ठेवले आहे ते त्याला माहित होते. ह्या शिकवलेल्या गोष्टी आईच्या व माणसांच्या साहचर्याने त्याला प्राप्त झालेल्या असतात. पण दर पिढीला सर्वच गोष्टी नव्याने शिकाव्या लागतात. पिल्लू अगदी लहानपणी दुसऱ्याच्या घरी नेऊन दिले तर ते नव्या घरचे वळण शिकते. हे जे शिक्षण ती संस्कृतीची सुरुवात म्हणता येईल. पण ती अत्यल्प आहे.

आई शिकवील अशा गोष्टी पिल्लाच्या आयुष्यांत मोठ्या महत्त्वाच्या नसतात. पिल्लाची आई मेली तर ते माणसांनी दूध घालून जगेल व मांजराला युक्त अशा क्रियाही आईने शिकविल्याशिवाय करु लागेल. जनावरांच्या बाबतीत एक पिढी दुसऱ्याला पुष्कळ शिकवते; पण हे शिक्षण जीवनाला अत्यावश्यक नसते. त्याविना जनावर जगू शकते. पण एवढे मात्र खरे की पक्षी व स्तनंधय * प्राणी ह्यांच्यांत दोन पिढ्यांचे साहचर्य वाढते. खालची पिढी जन्मल्याबरोबर किंवा कार्यक्षम झाल्याबरोबर वरची पिढी मरुन जात नाही. जीवनाच्या परंपरेचा

* स्तनं धयति (आईच्या स्तनांतून दूध पिणारे) ह्यालाच सस्तन प्राणी असेही नाव आहे.

पाया जरी मुख्यत्वे शरीरपरंपरेचा असला तरी दोन पिढ्यांचे, थोडा काळ का होईना, पण साहचर्य दिसून येते. वरची पिढी मरून जात नाही.

जीवनाच्या परंपरेचा पाया जरी मुख्यत्वे शारीरपरंपरेचा असला तरी दोन पिढ्यांचे, थोडा काळ का होईना, पण साहचर्य येते.

साहचर्याने येणारी मानवसंस्कृतीची परंपरा

माणसाच्या बाबतीत दोन पिढ्यांचे साहचर्य कोणत्याही इतर प्राण्यांपेक्षा जास्त असते. माणसाची शरीररचना, रुप व बरेच गुण त्याला शारीरपरंपरेने आलेले असतात, पण जीवनाचे सर्व व्यवहार वरील पिढीपासून शिकावे लागतात. माणसाचें पोर फक्त आपल्या आईच्याच संगतीत न वाढता इतर कित्येक सजातीयांबरोबर वाढते. बाकीच्या प्राण्यांना शारीरिक विकासाच्या दृष्टीने बाल्य व प्रौढत्व अशा जीवनाच्या दशा असतात असे म्हणवत नाही.

क्षुद्र जीवांच्या जीवनाच्या दशा इतक्या भिन्न असतात की त्या एकाच जीवनाच्या दशा हे सुद्धा सूक्ष्म निरिक्षणाशिवाय पहाणाराला कळणार नाही, मग त्या जीवाला त्याची जाणीव असणे कसे संभवनीय आहे? मी आधी अंड्यात होतो हे सुरवंटाला थोडेच माहीत असणार? किंवा उन्हात व वाऱ्यांत उडणाऱ्या रंगी बेरंगी फुलपांखराला आपला सुरवंटाचा पूर्वजन्म आठवत असेल का? मनुष्यालाही ह्याचप्रमाणे आपल्या गर्भवासाची अनुभूति नसते. ह्या सर्व दशांतून शरीरविकास होत असतो पण त्या क्रियेला कोणाच्या मार्गदर्शनाची जरुरी नसते.

पक्षी व मानवेतर स्तनंधय प्राणी ह्यांना बाल्य स्वल्पकाळ असते व त्या वेळी ते वरील पिढीकडून बऱ्याच शरीरक्रिया शिकतात. पण ह्या बाल्यांतही वरच्या पिढीचे मुख्य कार्य सरंक्षणाचे असते. ज्ञानसंक्रमण फारच थोडे असते. लहान पिल्लाला पंख फुटून ते सुदृढ होईपर्यंत त्याचे पोषण व संरक्षण पक्ष्यांना करावे लागते. हे पोषण व संरक्षण विजातीयांनी केले तरी सुद्धा पूर्ण वाढ झालेला पक्षी आपला जीवनक्रम यथास्थित पार पाडतो. परभृतिका कोकिळेचे उदाहरण सर्वांना माहीत आहेच. कोकीळा स्वत: घरटे बांधीत नाही. ती कावळ्यांना फसवून त्यांच्या घरट्यांतून आपली अंडी घालते. अंडी फुटली म्हणजे कावळा कावळी सगळ्या पिलांना भरवतात, पण मोठी झाल्यावर म्हणजे कावळ्याची पिल्ले कावकाव करतात म्हणून कोकीळेचे पिल्लू काही तसे ओरडत नाही ते मधुरालाप निसर्गपंडित च बनते. ते कोकीळेचाच जीवनक्रम जगते व जोडीदार शोधायचा तो कोकीळपक्षांपैकीच शोधते. कावळ्याच्या घराण्यांत दत्तक दिल्यामुळे त्याचा जीवनक्रम कावळ्यासारखा होत नाही. आपल्या मराठी कुटुंबातील एखादे पिल्लू जर जन्मतांच एखाद्या इंग्रज घरट्यांत दत्तक दिले तर त्यांचे रंगरुप पूर्वीचे राहूनही भाषा, पोषाख, खाणेपिणे इत्यादि सर्व इंग्रजांचे होतील.

मनुष्याचे बाल्य फक्त शरीरविकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते असे नव्हे, तर वरच्या पिढीच्या ज्ञानाचा लाभ त्याला ह्या दशेत होत असतो. वरील पिढीच्या अविरत सान्निध्याने पुढच्या आयुष्यातील सर्व क्रियांना वळण लागते. दोन पिढ्यांचे साहचर्य व त्यांत एकीकडून दुसरीला ज्ञानसंक्रमण ही क्रिया सर्व मानवी संस्कृतीचा पाया आहे. (मनुष्याला हात, पाय, डोळे, मेंदू, वगैरेची प्राप्ति सर्व जीवजातीला साधारण अशा शरीरपरंपरेने होते; पण भाषा, अन्न, वस्त्र व ती मिळवण्याच्या पद्धती सामाजिक परंपरने मिळतात.

मानवेतर स्तनंधय प्राणी व पक्षी ह्यांच्यांतही थोड्याबहुत प्रमाणांत दोन पिढ्यांचे साहचर्य असते, पण त्यांना संस्कृति नसते, असे कां? मानवाइतकी नाही तरी काही कमी दर्जाची संस्कृति तरी त्यांना असावयास हवी होती; पण शरीरदृष्टया माणसांचे अगदी जवळचे नातेवाईक जी माकडे त्यांनाही संस्कृति कां नसावी? मानवांचा बाह्यसृष्टीशी जो व्यवहार चालतो त्यामुळे हा फरक पडतो.

आपल्या जीवनाच्या आरंभापासून मनुष्य भोवतालच्या सृष्टीत घडामोड करीत असतो. तो निसर्गात असणाऱ्या वस्तूंचा कायापालट करीत असतो व जसजसे वस्तु विकार ह्याबद्दलचे त्यांचे ज्ञान वाढत जाते तसतसे आपल्या भोवतालच्या सर्वच सृष्टीचे रुप तो पार पालटून टाकतो. ही भूतधारिणी पृथ्वी सर्वच जीवांचा आधार आहे पण मानवांचा पृथ्वीशी संबंध इतर प्राण्यांपेक्षा अगदी निराळा आहे. इतर प्राणी आपल्या जन्मजात शरीररचनेच्या सामर्थ्यवर अन्न मिळवितात. आपल्या अवयवांच्या सामर्थ्यांत वाढ करु शकत नाहीत. पण मनुष्य आपल्या अवयवांची लांबी, रुंदी, उंची, तीक्ष्णपणा, सहनशक्ति सर्वच निरनिराळ्या उपकरणांनी वाढवीत असतो.

खंड्या पक्षी किंवा करकोचा चोंच बुडेल इतक्या खोलीवरून व चोंचीत राहातील इतकेच मासे पकडतो. माणूस नुसत्या दोन हातांनी किंवा दोन पायांनी जेवढे मिळविता येतील त्यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक (भाला मारुन, गळ टाकून किंवा जाळें फेकून) मिळवूं शकतो. नुसत्या केसांनी किंवा पिसांनी जी ऊब आणतां येणार नाही ती नाना कपडे पांघरून, घरें बांधून व अग्निसाधन करुन मनुष्याला मिळविता येते. नुसती फळे खाऊन, कंद उकरुन वा श्वापदे मारून जेवढे मिळविता येईल त्यापेक्षा कितीतरी जास्त अन्न झाडे लावून, धान्य पेरून व पशुपालन करुन मनुष्य मिळवतो. इतर प्राणी पृथ्वी देईल तेवढेच घेऊन रहातात-आपले जीवन आपल्या भोवतालच्या सृष्टीशी जुळते घेऊन तिला अनुरुप असे बनवतात. ते पुष्कळ अशी सृष्टीशी एकरुप होतात. पण माणूस सृष्टीला आपल्यासाठी राबवतो व जरी शेवटी सृष्टीच्या शक्तीबाहेर ही राबवणूक चालणार नाही हे त्याला माहीत असले, तरी सृष्टीला नमून न राहतां तिच्यापासून आपणांस हव्या त्या वस्तू हिसकावण्याची, हिरावून घेण्याची त्याची प्रवृत्ति आहे व ही प्रवृत्तीच सर्व वस्तुरुप संस्कृतीची निर्माती आहे.

वस्तुरुप संस्कृतीचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे ती व्यक्तीच्या मरणाबरोबर नाहींशी होत नाही. वैराग्यपर वाङ्:मयांत ही गोष्ट पुन्हां पुन्हां सांगितलेली असते. मनुष्य जन्मतो तो एकटा दिगंबर अवस्थेंत जन्मतो, मरतो तेव्हांही एकटाच जातो. त्याचे नातेवाईक, वस्त्रप्रावरण, घरदार, पैसाअडका ह्यांपैकी त्याला काहीही बरोबर नेता येत नाही. त्याच्या मरणाबरोबर ते नाहीसेही होत नाही. ते मागे ठेवूनच त्याला जावे लागते. अगदी ह्याच गोष्टीमुळे संस्कृतींचे जतन, संक्रमण व वर्धन शक्य होते. मुलगा बापाकडून दगडी हत्यारे कशी करावी एवढे नुसते शिकतो असे नव्हे तर बापाने बनवलेल्या, उपयोगिलेल्या कित्येक वस्तू त्याला मिळतात.

जसजसे द्रव्यरुप संस्कृतीचे गांठोडें मोठमोठे होत जाते तसतशा कित्येक गोष्टी स्वत: न निर्मितां, एवढेच काय पण त्यांच्या निर्मितीची काडीमात्र माहिति नसतांही, पुढच्या पिढीला मिळत जातात व त्यामुळे मागल्यांच्या पुढे एक पाऊल जाण्याची शक्यता निर्माण होते. संस्कृतीच्या संक्रमणाला आवश्यक अशी दुसरी

गोष्ट म्हणजे भाषा, इतर प्राण्यांनाही एकमेकांचे इंगित काही ध्वनीच्या द्वारे एकमेकांना सांगता येते. विशेषत: कळप करुन रहाणाऱ्या प्राण्यांत आनंद, राग, भीती, आव्हान वगैरे निरनिराळे मनोविकार दाखविणारे ध्वनि निरनिराळे असूं शकतात; त्या ध्वनींचे सामाजिक सांकेतिक रुपही सिद्ध होते. गुरांचा कळप चरत असल्यास म्होरक्या भीतीची सूचना देऊ शकतो. पण ती भीति वाघापासून आहे की सिंहापासून आहे हे व्यक्त करणे त्याला अशक्य असते. ध्वनीने पशू भावना सूचित करतो, वस्तु नाही. ध्वनिसमूह म्हणजे अमकी वस्तु असा संकेत उत्पन्न झाला म्हणजे भाषा निर्माण होते. भाषेमुळे नुसत्या विशिष्ट वस्तूबद्दलच नव्हे, तर त्या एकंदर वस्तुवर्गाबद्दलही बोलतां येते. विशिष्टापासून सामान्याकडे, दृश्यापासून अदृश्याकडे व वर्तमानांतून भविष्यांत जाता येते.

मनुष्यांच्या इंद्रियानें त्याला जे मिळविता येईल त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक तो वस्तुरूप निर्मितीने म्हणजे उपकरणांनी मिळवतो. त्याचे जीवन व्यक्तीच्या शरीर शक्तीने मर्यादित रहात नाही. ज्या वस्तुरूप निर्मितीने तो वेढलेला असतो ती मनुष्यजातीच्या अनंत पिढ्यांनी आपल्या अनंत हातांनी बनविलेली असते. तो पाहतो ते फक्त स्वत:च्या दोन डोळ्यांनीच नव्हे तर सर्व मनुष्य जातीच्या डोळ्यांनी पाहिलेले व भाषेने सांगितलेले पहात असतो. सर्व जातीची वस्तुरूप व मनोमय निर्मिती आपलीशी करण्याची मनुष्याची ही शक्ती इतर प्राण्यांना नसते, म्हणून संस्कृतीची उत्पत्ति इतर प्राणिवर्गात होऊं शकत नाही.

माणसामाणसांच्या जीवनक्रमांत जो फरक दिसतो तो शरीररचनेवर अवलंबून नसून बहुतांशी संस्कृतीवर अवलंबून असतो. प्राण्यांतही अतिशय गुंतागुंतीचे समाजजीवन आढळून येते. त्या समाजजीवनांत गुणकर्मविभागामुळे उत्पन्न झालेले वर्गही दिसून येतात. पण खरोखरच सर्व वर्गीकरण गुणकर्म-विभिन्नतेवर व भिन्न भिन्न शरीररचनेवर आधारलेले असते. मधमाशा, मुंग्या व वाळवी अथवा उधई ह्या प्राण्यांमध्ये राणी, नर व कामकरी अशा तीन वर्गाचे जीव दिसून येतात. त्यांचे काम भिन्न असते व शरीररचनाही इतकी भिन्न असते की साधारणपणे एका जातीच्या प्राण्यांना दुसऱ्या जातीचे करता येणें शक्य नसते. वाळवीची राणी म्हणजे फार हालचाल न करता येणारा एक लठ्ठच्या लठ्ठ किडा असतो. आयुष्यांतील ह्या राणीचे एकमेव काम म्हणजे नरांशी संयोग करुन हजारो अंडी घालणे. नर असतात त्यांना पंख असून उडता येते. ते कोशांतून बाहेर आले की मादीला शोधीत हिंडतात व मादीशी संयोग झाला की तिला गर्भवती करुन मरुन जातात. ज्या कित्येक हजारों नरांना मादीं सापडत नाही ते तसेच मरून जातात व त्यांना खाण्यास टपलेल्या पांखरांच्या भक्ष्यस्थानी ते पडतात.

आयुष्यांत नरांचे एकमेव काम असते व ते म्हणजे मादीच्या ठिकाणी संतति निर्माण करणे. कामकरी वाळवीचे किडे हे नपुंसक असतात. ते राणीला भक्ष्य पुरवतात, अंड्यांची जोपासना करतात, वाळवीचें घर बांधतात, अशी कितीतरी कामे त्यांना करावी लागतात. ह्या समाजांत वर्गकलह शक्यच नसतो; कारण निरनिराळे वर्ग व त्यांचे काम शरीर परंपरेवर अवलंबून असते. एका वर्गातील जीवांना एका विशिष्ट शरीररचनेमुळे दुसऱ्या वर्गातील जीवनक्रम जगणे अशक्य असते. ह्या क्षुद्र जीवांचे त्रैवर्ण्य खरोखरच गुणकर्म विभागश: झालेले असते. मनुष्याची स्थिति अगदी ह्या उलट असते. त्याला

उपभोगाला मिळत असलेली द्रव्यरूप संपत्ति, त्याचे समाजांतील स्थान व कार्य हे त्याच्या शरीररचनेवर अवलंबून असते- सामाजिक परंपरेच्या स्वाधीन असते.

मनुष्य किंवा मनुष्यसदृश प्राणी पृथ्वीवर पहिल्याने दहा ते बारा लाख वर्षांपूर्वी आला. तेव्हा त्याचे स्वरूप आतांच्या पेक्षा पुष्कळच निराळे होते. विशेष फरक म्हणजे आताच्या मनुष्यप्राण्यापेक्षा त्याचे डोके अतिशय लहान होते. हळुहळू त्यांचे रुप आताच्या मनुष्यप्राण्याप्रमाणे झाले व सुमारे सहा लाख वर्षांपूर्वी त्याचे डोके पूर्णतया वाढले. तेव्हापासून आतापर्यंत मनुष्याच्या शरीररचनेत काही म्हणण्यासारखा फरक पडलेला नाही. डोक्याच्या परिमाणात तर मुळीच नाही. पण निरनिराळ्या देशांतील तेव्हाच्या व आताच्या संस्कृतीस मात्र जमीनअस्मानाचे अंतर आहे.

शरीराची उत्क्रांती म्हणण्यासारखी होत नसता समाजजीवनात हा जो फरक पडला आहे तो परंपरागत साठत आलेल्या ज्ञानामुळे पडला. विजेचे बटण दाबून दिवा लावणारा, आगगाडीत बसणारा, मजल्यावर मजले चढवून प्रासादतुल्य घरांत रहाणारा, कापूस, रेशीम, रेयॉन व कांच ह्यांची वस्त्रे लेणारा मुंबईचा आजचा रहिवाशी सहा लाख वर्षांपूर्वी लाकडाला घासून महत्प्रयासाने विस्तव निर्माण करणाऱ्या किंवा पेटलेल्या रानांतून आयते निखारे आणून ते जतन करणाऱ्या, रानावनांत वणवण हिंडणाऱ्या मनुष्यांपेक्षा बुद्धीने-उपजत बुद्धीने-जास्त आहे असे मुळीच नाही.

पण आजच्या येथील रहिवाशांच्या मागे हजारो पिढ्यांचा अनुभव जमेला आहे. सहा लाख वर्षांपूर्वी जमेच्या बाजूला जवळ जवळ काही नव्हतेच. मनुष्य जे उपभोगितो त्यातील त्याच्या स्वत:च्या कमाईचे असे फार थोडे असते. बहुतेक पूर्वसंचितच असते व दैवयोगाने तो ज्या देशांत ज्या वेळी जन्माला येईल त्याप्रमाणे त्याला त्याचा कमी अधिक वाटा मिळतो. हे जे पूर्वसंचित- मानवाला उपभोगावयाला ठेवलेला ठेवा - तीच संस्कृति. समाजजीवनांत व व्यक्तीजीवनात जो फरक दिसतो त्याच्या बुडाशी सांस्कृतिक परंपरेतील फरक असतो, त्यात शारीरिक परंपरेचे कार्य अत्यल्प असते.

## संस्कृती सर्वस्वी परिस्थिति-सापेक्ष आहे काय?

ही सांस्कृतिक परंपरा निर्माण तरी कशी होते? तिच्या निर्मितीच्या व वर्धनाच्या बुडाशी काही तत्त्व आहे का? काही म्हणतात सभोवतालच्या परिस्थित्यनुरूप माणसाची निर्मिती होत असते.[१] परंतु संस्कृतीचा इतिहास पाहिल्यास हे म्हणणे रास्त दिसत नाही. युरोपचा किनारा दंतुर असल्यामुळे तेथे दर्यावर्दी लोकांची निपज झाली. नाईल, तैग्रीस.युफ्रेतिस, गंगा व व्हांगहो ह्या नद्यांच्या सुपीक खोऱ्यांत शेतीस योग्य जमीन होती म्हणून शेतीला सुरुवात झाली. उत्तरेकडच्या थंडीत लोक अंगाला बसतील असे कपडे कापून शिवण्याची कला शिकले. असल्या वरवर पाहता योग्य वाटणाऱ्या कारणपरंपरेपासून तो थंड प्रदेशच संस्कृतिनिर्मितीला योग्य. उष्ण कटिबंधांतील लोकांच्या अंगी बुद्धिमांद्य व शैथिल्य असल्यामुळे ते संस्कृतीची निर्मिती करु शकणार नाहीत.

[१] ह्या मताचे मण्डन पुष्कळ युरोपीयांनी केले आहे. त्यात विशेषत: हंटिंग्टन् ह्या लेखकाचे पुस्तक प्रमुख समजले जाते. गुस्टाव्ह क्लेमचे आल्गेमायन कुल्टूरगेशिष्ट डेअर मेन्षहाइट, लाइपझिग् १८४३ हे पुस्तक परिस्थितीवादाचे पहिले अर्वाचीन पुस्तक आहे.

उष्ण प्रदेशांतील लोकांचा कामविकार प्रबळ असल्यामुळे त्यांच्यांत बहुपत्नीकत्वाची चाल आहे वगैरे कितीतरी विधाने समाजशास्त्राच्या वाङ्:मयांत सापडतात. ज्या इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड देशांची दर्यावर्दीपणाबद्दल ख्याति आहे तेथे अति प्राचीनतम काळापासूनचे मनुष्यवस्तीचे अवशेष सापडले आहेत. त्या अवशेषांमध्ये दर्यावर्दीपणाची साक्ष देणारे अवशेष मुळीच नाहीत. नौका बांधणे व ती पाण्यात चालवणे ह्या दोन्ही कला हे लोक भूमध्यसमुद्रातील लोकांकडून किंवा युरोपमधून येणाऱ्या इतर वसाहतकारांकडून शिकले हे नि:संशय आहे. नौकानयन एकदा शिकल्यावर बेटावर रहाण्यामुळे उत्पन्न झालेल्या जीवनक्रमाला दंतुर किनाऱ्याचा फायदा मिळाला व तो त्यांनी पुरेपुर करुन घेतला हे म्हणणे इतिहासास धरुन आहे. कोणीतरी कुठेतरी पाण्यावर तरण्याची युक्ति शोधून काढली व इतरांनी ती उचलली, काहींनी त्याचा उपयोग करुन घेतला, काहींनी नाही.

परिस्थिति आपल्याला वाटते त्याप्रमाणे अविचल व ध्रुव नसते. वस्तुरुप सृष्टी तीच, पण तिचे कार्य मात्र संस्कृतीप्रमाणे बदलत असते. नाईल नदीच्या काठी शेती होण्याचे अगोदर कित्येक सहस्त्रकें शिकार करणारे रानटी लोक रहात असत. त्यावेळी काय नाईल नदीला वार्षिक पूर येत नव्हता? पूर ओसरल्यावर काठची जमीन काय मळीची नव्हती? आजही नाईलच्या उगमाजवळच्या दलदलीच्या प्रदेशात शेती करणे शक्य असूनही निवळ शिकारीवर जगणारे अर्धनग्न रानटी लोक राहतात.

नाईल किंवा गंगा किंवा व्हांगहो नद्यांमुळे शेतकरी उत्पन्न झाले नाहीत, तर शेतीची कला अवगत झाल्यामुळे हा प्रदेश कारणी लागून उच्च संस्कृति निर्माण झाली. उत्तरेकडच्या थंड प्रदेशांत लोक-वन्य लोकही-कपडे घालतात, त्यावरून वाटते की कपडे व थंड हवा ह्यांचा संबंध दिसतो. पण कपडे माहीत असावयाच्या आधी निआंडरटाल जातीचे मानव बर्फमय युरोपात रहात असत. आजही दक्षिण अमेरिकेचे दक्षिण टोक जे टियेरा डेल फ्यूगो येथे इतकी थंडी असते की आपल्यासारखी माणसे थंडीत बहुधा मरुन जातील. पण तेथे रहाणारे रानटी लोक जवळ जवळ नागडेच रहातात. अतीच थंडी वाटली तर जनावरांचे कातडे पांघरतात, पण कपडे शिवण्याची कला त्यांना माहीत नाही. ह्याचा अर्थ असा की, प्रागैतिहासिक कालात कधीतरी कातडे कापून त्याला भोके पाडून ते शिवण्याची कला माहित झाल्यावर सर्व उत्तरेकडच्या लोकांनी ती झपाट्याने आत्मसात केली व त्यामुळे उत्तर ध्रुवाजवळील बर्फमय प्रदेशांत रहाणे पण शक्य झाले.

संस्कृति परिस्थितिसापेक्ष आहे असे नसून परिस्थिति सुद्धा संस्कृतिसापेक्ष आहे हे जाणले पाहिजे. सारख्या परिस्थितीत निरनिराळ्या संस्कृतीची उत्पत्ति होते ती ह्यामुळेच. जसजशी संस्कृति परिणत होते तसतशी परिस्थिति नव्या रूपाने प्रकट होऊं लागते. आसामपासून तो चांद्यापर्यंतचा सर्व प्रदेश जंगलांनी भरलेला म्हणून शेतकऱ्यांनी उपेक्षिलेला असा होता. हिंदुस्थानांतील कित्येक वन्य जाती तेथे रहात असत. यंत्रयुगीन संस्कृतीबरोबर खनिज पदार्थांचे महत्त्व वाढले व ते पृथ्वीपासून काढण्याची युक्ति सापडल्यामुळे एकदा उपेक्षिलेले हे प्रदेश आता स्वतंत्र हिंदुस्थानच्या जीवनाचे महत्त्वाचे घटक बनले आहेत.

काही विशिष्ट बाबींत परिस्थिति संस्कृतीला मुरड घालते व तेवढे वगळले तर संस्कृतीची निर्मिति

व स्वरूप समजण्यास परिस्थितीचा उपयोग होत नाही. उदा. एस्किमो शाकाहारी नाहीत ह्याला कारण म्हणून असे सांगता येईल की ते ज्या प्रदेशात तेथे काहीही वनस्पति उगवत नाहीत. पण इतर मानवाचे खाणे पिणे परिस्थितीवर अवलंबून नसून परंपरेवर अवलंबून असते. ती परंपरा मानवनिर्मित असते व ती तशी का असते हा प्रश्न विचारणे सोपे पण सांगणे जवळ जवळ अशक्य आहे.

नौका बांधणे, कपडे शिवणे, शेती करणे ह्या गोष्टी बहुतांशी मानवाच्या वस्तुरुप संस्कृतीवर अवलंबून आहेत. वस्तू भोवतालच्या सृष्टीमधील पदार्थ घेऊन निर्माण करावयाची असते. पण पदार्थ आहे म्हणून वस्तू निर्माण झाली पाहिजे असे नाही. असे जर आहे तर मनोमय संस्कृतीबद्दल तर बोलावयासच नको. ज्यावेळी थंड युरोपातील लोक उघडेनागडे शिकार करीत हिंडत होते, गुहांतून रहात होते, त्यावेळी मिसर व बावेरू (बाबिलोन) * ह्या उष्ण प्रदेशांत लोक शेतीभाती करीत होते. मंदिरे बांधीत होते, विणलेली वस्त्रें लेत होते व अक्षरे खोदून शिलांवर लेख लिहित होते, (अमक्या प्रदेशांत संस्कृतिपोषक स्वभाव होतो व अमक्यांत होत नाही असे म्हणण्यास काहीच आधार नाही. तसे असते तर अमक्या कटिबंधांतील माणसे अमक्या स्वभावधर्माची असे निश्चित होऊन तेथले जीवन मुंग्या व वाळव्यांच्या जीवनाप्रमाणे नियमबद्ध झाले असते. मानवी संस्कृतीचा संकोच झाला असता.)

थंड प्रदेश व उष्ण प्रदेश ह्या शब्दांना काही विशिष्ट परिस्थितीत अर्थच रहात नाही. उष्ण प्रदेशांतील घरे समशीतोष्ण व सुखावह करता येतात. थंड प्रदेशांत उष्ण वाफेच्या द्वारे काकड्या व खरबुजे वाढवता येतात. लेना नदीकाठच्या चिरकाल गोठलेल्या प्रदेशांत सोन्याच्या खाणी रात्रदिवस चालवता येतात. मनुष्याचा सांस्कृतिक दर्जा व सांस्कृतिक गरज ह्यांवरून परिस्थितीचे मोल करता येते. तसेच मनुष्य लग्न कधी करणार, किती जणांशी करणार, कितीवेळ विवाहबंधनात रहाणार, ह्या गोष्टीही खाणेपिणे व पोषाक ह्याप्रमाणे परंपरेवर अवलंबून आहेत) मनुष्याच्या कामवासनेशी त्यांचा फारसा संबंध नाही.

सर्व जगात लग्नबंधनाखेरीज कामवासना पुरवण्याचे पुष्कळ प्रकार उपलब्ध आहेत. एखाददुसरी रक्षा असणे हे एकेकाळी प्रतिष्ठित गणले जात होते. असे असूनही जेव्हा पुरुष एकापेक्षा जास्त लग्ने करतो ते काम अनावर होतो म्हणून नव्हे, तर पुष्कळच निरनिराळ्या सामाजिक कारण परंपरेमुळे करतो. सूत रंगवणे, ताणा ताणणे वगैरे कामे मोलाच्या मनुष्यापेक्षा लग्नाच्या बायकांकडून करुन घेणे स्वस्त पडत असेल. जितक्या बायका अधिक तितकी जमीन कसायला माणसे अधिक असा आफ्रिकेतील माणसाचा हिशेब असेल; प्रत्येक बाईकडून बराचसा हुंडा मिळत असेल; एखाद्याला बऱ्याचशा बायका बापाकडून वारसाहक्काने आल्या असतील; बऱ्याच बायका असणे हे श्रीमंतीचे लक्षण असेल-एक ना दोन एकाच चालीच्या बुडाशी त्या त्या संस्कृतीच्या परंपरेप्रमाणे कितीतरी कारणे असू शकतील. भौगोलिक परिस्थितीचा संबंध अशा गुंतागुंतीच्या सामाजिक व्यवहाराशी सरळ त्रैराशिकाने जोडणे म्हणजे मानवी संस्कृती कीटकांच्या समाजजीवनाच्या

* बाबिलौनला बावेरू हा जुना भारतीय शब्द आहे. अनेक जातकांत बावेरु जातक म्हणून एक आहे व हे नावं मूळ नावांशी जास्त जुळते आहे.

पायरीवर बसवणे आहे.

परिस्थिती आणि संस्कृति ह्यांचा असा सरळ संबंध नाही हे एकदा नीट ध्यानात धरले म्हणजे परिस्थितीचे खरे कार्य काय ते अभ्यासता येईल. परिस्थिती ही संस्कृतीची निर्माती नाही, पण संस्कृतीला मुरड घालणे, वळण लावणे वगैरे कित्येक कार्ये परिस्थितीच्या द्वारे होत असतात. दळणवळणाच्या राजमार्गावर एकादा देश असेल तर इतर संस्कृतीशी त्याचा संबंध येतो व संस्कृतिसंघर्ष होतो. आडवळणावर असेल तर मागासलेला रहाण्याचा संभव असतो. कोळसा व लोखंड भरपूर असेल अशा भूमीत यंत्रयुगीन संस्कृतीला वाव आहे व ती झपाट्याने वाढते. पण जेथे ती खनिजे नाहीत अशा जपानमध्येही ह्या संस्कृतीची वाढ झाली, मात्र ती खनिजे दुसरीकडून आणावी लागल्यामुळे काही निराळेच सामाजिक व राजकीय प्रश्न उपस्थित झाले. भौगोलिक परिस्थिति संस्कृतीला वाकवीत असते, तर संस्कृति भौगोलिक परिस्थितीवर मात करीत असते. त्यांचा संबंध आहे पण कार्यकारण रुपाचा नाही.

## विकासवाद

विकासवाद ही मानवी संस्कृति समजण्याची किल्ली आहे असेही कित्येकांचे मत आहे.* मर्कटसदृश प्राण्यापासून मानवापर्यंत शरीरदृष्टया जसा विकास झाला तशाच तऱ्हेने प्राथमिक वन्य समाजजीवनापासून सुरुवात होऊन हळू हळू मनुष्याचे समाजजीवन श्रेणीश्रेणीने चढत उच्चतर संस्कृतीकडे जात आहे असे कित्येकाचे म्हणणे आहे. ह्या वादाचे मुख्य मुद्दे म्हणजे (१) जे जुने ते कमी उच्च, जे कालौघांत उशीरा येते ते जास्त प्रगल्भ व (२) विकासाची एक ठराविक दिशा आहे, असे आहेत. प्राथमिक अवस्थेत मनुष्य फलमूलावचयावर व क्षुद्र जीवांची पारध करुन रहात असे. पुढे त्याने शेतीला सुरुवात केली, त्यानंतर पशुपालन शिकून पशु शेतकीच्या कामासाठी लावले, नंतर नागरजीवनाला आरंभ झाला, मग यंत्रयुगाची सुरुवात झाली. असे टप्पे वस्तुरूप संस्कृतीबद्दल दाखवून त्याच्याच अनुषंगाने मनोमय संस्कृतीचे टप्पे दाखवण्याचा प्रयत्न केला जातो. उदा. प्राथमिक अवस्थेत माणूस सर्व सृष्ट पदार्थाचे ठायी जीव आहे अशी कल्पना करतो. त्या कल्पनेची परिणति अनेक दैवतवादांत होते व उच्चतम अवस्थेत माणूस एकेश्वरी पंथाचा होतो.

पहिल्याने मानवसमाजात मातृप्रधान कुटुंबपद्धति होती. मागून पितृप्रधान कुटुंबपद्धति आली. प्राथमिक अवस्थेत स्वैराचार होता, मग लग्नसंस्था आली; पहिल्याने बहुपत्नित्व, बहुपतित्व होते पण उच्चतम अवस्थेत मानवसमाज एकपत्नीव्रताने राहतात. प्रथमावस्थेत मानवसमाज सहकारी तत्त्वावर जीवन जगत होता, मग भांडवलशाही व मालकीहक्क निर्माण झाले. पण पूर्णावस्थेत परत सहकारी तत्त्वावर आधारलेले समतायुग सुरु होईल. अशा अनेक तऱ्हेने संस्कृतिविकासाचे चित्र रंगविले जाते. विकासवादाचे वाङ्‌मय वाचू लागले की असे वाटते की निरनिराळ्या टप्प्याने विकसित होणे हा मानवसमाजाचा एक गुणधर्मच आहे.

* कोंत, स्पेन्सर, मॉर्गन, एंगेल्स, मार्क्स वगैरे ह्या विचारसरणीचे लेखक युरोपात पुष्कळ होऊन गेले. ही विचार सरणी मार्क्सवादाचे द्वारे एक प्रभावी शक्ति होऊन बसली आहे. बहुतेक सर्व समाजशास्त्री व इतिहासकार ही पद्धत थोड्याबहुल प्रमाणात स्वीकारतात.

पण थोडा विचार केला तर ह्या तत्त्वाने मानवसंस्कृतिच्या कोड्याचा उकल होण्यास मदत होत नाही हे दिसून येते. जो इतर प्राण्यांत नाही व मानवांत आहे असा एक गुण म्हणजे इतरांनी निर्मिलेले आत्मसात करणे व आपले दुसऱ्याला देणे. संस्कृतीच्या इतिहासात जो काही विकास दिसून येतो तो ह्या गुणांमुळे. काही कारणांमुळे इतरांपासून लांब पडलेले मनुष्यसमाज आजही संस्कृतीच्या प्राथमिक अवस्थेतच दिसतात. हळू हळू आपल्या आपणच निरनिराळे टप्पे चढत गेलेला एकही मानवसमाज नाही. काल नागडे हिंडणारे समाज आज वस्त्रे वापरतात, ह्याचे कारण वस्त्रें वापरणाऱ्या लोकांनी त्यांच्यावर आक्रमण केले व त्यांना वस्त्रें वापरावयास लावले असेच द्यावे लागेल. हजारो वर्षें शेतकऱ्यांच्या शेजारी राहूनही रुक्ष वाळवंटात रहाणाऱ्या अरबांनी शेतीप्रधान संस्कृति न निर्मिता भटकण्याचा व वाटमारीचा आपला प्राचीन धंदा आजही कायम ठेवला आहे, असें का?

शेतकीप्रधान संस्कृति उच्च असूनही ऐतिहासिक कालात असंस्कृत भटक्या टोळ्यांनी तिच्यावर आक्रमण करुन तिला जिंकल्याची किती तरी उदाहरणे आहेत. सर्व जगभर पूर्वी मातृसत्ताक कुटुंबे होती ह्याला पुरावा उपलब्ध नाही व पितृसत्ताक कुटुबंव्यवस्था मातृसत्ताकाच्या मानाने जास्त विकसित कशी हेही समजत नाही. विकासवादाचे निरनिराळे संप्रदाय आहेत. कोठच्या तऱ्हेच्या पूर्णत्वाकडे मानवसमाज चालला आहे. ह्याची प्रत्येकाची कल्पना निरनिराळी आहे व त्याबरहुकुम मानवेतिहासांतील विकासदर्शनसूत्रही प्रत्येकाचे निरनिराळे आहे. सामाजिक विकासवाद हे जीवशास्त्रातील विकासवादाचे पिल्लू आहे. तो पाश्चात्य राष्ट्रात उदयास आला व पाश्चात्य इतिहासकार व तत्त्वज्ञ ह्यांची पूर्णत्त्वाची जी तत्त्वे आहेत ती निरनिराळे संप्रदाय निरनिराळ्या विकासवादाला लावतात. प्रत्येक मानवसमाज जरी वरवरच्या श्रेणीला गेला नाही तरी वस्तुरुप निर्मितीच्या दृष्टीने आज मानवाने जेवढी प्रगति केली आहे. तितकी पूर्वी कधीही केली नव्हती हे सत्य आहे; पण लढाईमुळे किंवा आत्मनाशाने त्यात खंड पडणारच नाही, असे छातीठोकपणे जोवर सांगता येत नाही तोवर विकासवाद वस्तुरूप संस्कृतीबाबतसुद्धा अपुराच रहाणार. आजचा विकासवाद म्हणजे पाहिले न सांगितले, अशा तऱ्हेचे ज्योतिष आहे. द्रव्यरुप संस्कृतीच्या इतिहासाला त्याची थोडीतरी मदत होईल; पण मनोमय संस्कृतीचे बाबतीत सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या समाजाचा इतिहास पाहिला तरी कोठच्याही दृष्टीने ठाम प्रगति झाली आहे असे म्हणता येत नाही.

वस्तुरूप संस्कृतीच्या वाढीमुळे निरनिराळ्या मनुष्यसमाजाचे जीवन जास्त जास्त परस्परावलंबी झाले आहे पण सद्भाव व सहकार्य ह्यांची वाढ झाली आहे असे कोणालाही म्हणता येणार नाही. कौटुंबिक आयुष्यांतील जुनी मूल्ये टाकाऊ होती व हल्ली काही नवीनच जास्त कल्याणप्रद अशी मूल्ये व जीवनमार्ग निर्माण झाले आहेत असे थोडेच आहे? ती निर्माण होणार नाहीत असे म्हणता येणार नाही. विकासवादाचे आधारे ती खात्रीने निर्माण होणारच असेही सांगता येणार नाही.

कोणताही कालखंड घेतला तरी त्यात भिन्न भिन्न भूप्रदेशांवर राहणारे मानवसमाज निरनिराळ्या तऱ्हेचे समाजजीवन जगत होते. कदाचित पुढे काही शेकडो किंवा हजारो वर्षांनी मानवांची अशी एक

संस्कृति होण्याची शक्यता आहे; पण आतापर्यंतच्या ज्ञात मानवेतिहासांत सर्व मानवांची मिळून एक संस्कृति कधीच नव्हती. काहींच्या मते मानवांचा इतिहास हा टप्प्याटप्प्याने विकास होणाऱ्या एका अविभाज्य संस्कृतीचा इतिहास आहे. कदाचित काही शतकांनी मानवेतिहासाला एकत्र गुंफणारे एखादे सूत्र सापडेल, पण अजून तरी ही सर्वथैव सापडले नाही. संस्कृतीचा अभ्यास करुन पाश्चात्यांनी संस्कृतीचा इतिहास लिहिण्यास घेतला. त्यावेळी पाश्चात्य संस्कृति हे जणू काय सर्व इतिहासाचे शिखर असून त्याच्या पूर्वी झालेल्या सर्व मानवसंस्कृति हे त्या शिखरापर्यंत मानवजातीला पोचविण्यासाठी तयार केलेले टप्पे अशा बुद्धीने इतिहास लिहिला गेला.

मानवसमाज परस्परावलंबी असतात. ते एकमेकांपासून निरनिराळ्या गोष्टी शिकतात व त्यामुळे कुठच्याही एका संस्कृतीचा इतिहास लिहावयाचा झाल्यास बाकीच्या बऱ्याच संस्कृतीचा इतिहास ध्यानांत घेतल्याखेरीज ते कार्य करणे अशक्य आहे. हे जरी खरे असले तरी कोणतीही एक विशिष्ट संस्कृति ही सर्वश्रेष्ठ व बाकीच्या तिच्या आधीच्या सर्व संस्कृति म्हणजे मानवांनी त्या ध्येयाला पोचविण्यासाठी केलेले अर्धवट प्रयत्न असे समजणे हे सामाजिक आत्मश्लोकाचे द्योतक आहे. मनुष्याच्या जीवनाचा प्रवाह नियमबद्ध असून तो भविष्यकाळात अमक्या दिशेने जाणार आहे असे छातीठोकपणे सांगण्याइतका पुरावा आतापर्यंतच्या अभ्यासात तरी हस्तगत झाला नाही. कालप्रवाहात मागील गोष्टीपेक्षा पुढील गोष्ट जास्त उत्क्रांत म्हणून जास्त मोलवान व जास्त परिपूर्ण अशी विचारसरणी डार्विनच्या उत्क्रांतिवादापासून सर्वत्र दिसून येते. स्वत:च्या पूर्णत्त्वाची मनोमय खात्री असलेले विलायती लेखक जगाच्या इतिहासाचे परिशीलन ह्या सिद्धांताच्या जोरावर करीत असत; पण गेल्या महायुद्धाच्या धक्क्याने ही त्यांची आत्मसंतुष्ट बुद्धी निवळून त्यांच्यामध्ये आत्मशोधनाची प्रवृत्ति सुदैवाने दिसू लागली आहे.

समाज-जीवनाला व्यक्ति-जीवनाचे सिद्धांत लावता येतील का?

प्राणिशास्त्र व जीवशास्त्र ह्यांचे बरेचसे सिद्धांत थोड्या-फार फरकाने मनुष्यसमाजाला लावता येतात. विकासवादाचा सिद्धांत वर सांगितला आहे. तशाच तऱ्हेने जीवशास्त्राच्या अनुषंगाने आणखी एक सिद्धांत अधून मधून मांडलेला दिसतो. मनुष्यसमाज ही एक कल्पना ह्या सिद्धांताच्या बुडाशी आहे. व्यक्ती-मग ती कुठल्याही उच्च वा नीच जीवकोटीतील असो-तिला जन्म, वर्धन व मरण ही आलीच. त्याचप्रमाणे मनुष्यसमाजात उत्पन्न होणाऱ्या संस्कृतीचे आहे. ह्या संसारात उदराच्या भिंतीत सुद्धा मृत्यू गर्भाला आलिंगून बसला आहे. (मृत्यू उदराचिया परिबरी गर्भु गिंवसी-ज्ञानेश्वरी ९.१०३) प्रत्येक संस्कृतीला मरण हे ठेवलेलेच आहे.

मानवी इतिहासाची वाट मेलेल्या संस्कृतीच्या मढ्यांनी खचलेली आहे. सध्याही काही संस्कृति मेलेल्या आहेत, काही मध्यमवयावर येऊन ठेपलेल्या आहेत. काही मरणाच्या द्वारी आहेत व काही बाल्यावस्थेत असल्यामुळे वर्धिष्णु आहेत.[१] ही कल्पना मोठी मनोहारी आहे. तिचे मंडण करणारे

[१] ओस्वाल्ड ष्पेंग्लर ह्या जर्मन ग्रंथकाराचे उंटरगांग डेस आबेंडलांडेस (पाश्चात्यांचा विनाशकाल) हे पुस्तक वरील मतप्रणालीचे प्रतिनिधि समजले जाते.

ग्रंथकारही उत्तम लेखक होते व त्यांचे लिखाणही मनाची पकड घेणारे झाले. पण मनुष्यसमाज व त्यांनी निर्मिलेल्या संस्कृति ह्यांना व्यक्तीची उपमा काही व्यापार व घटना समजायला सोप्या गेल्या म्हणून व्यक्तिमत्त्वाचे सर्व गुण त्यांचे ठायी कल्पिणे चूक आहे. प्रत्येक व्यक्ति एका विशिष्ट क्षणाला जन्मते व विशिष्ट क्षणाला मरते. मानवसमाजांना ह्या मर्यादा कधीही देता येत नाहीत. एका समाजाच्या आक्रमणापुढे दुसऱ्या समाजाचा नि:पात होतो, पण अशी उदाहरणे इतिहासात फारच कमी, त्याचप्रमाणे संस्कृति मरते म्हणजे काय?

आजच्या इतिहासकाराला इजिप्तच्या पुराण इतिहासांत भरभराटीची व ऱ्हासाची चार पाच पर्वे दिसतात. एकाच समाजाच्या संस्कृतिचे ते चढउतार आहेत असे तो मानतो; पण प्रत्येक ऱ्हास-काली त्यावेळच्या माणसाला ते संस्कृतींचे मरणच वाटले असते. इजिप्तचा प्राचीन इतिहास लिहितांना चार संस्कृति जन्मल्या व चार मेल्या असे लिहावे की एकच सूत्र कायम ठेवून निरनिराळ्या वेळी संस्कृतीत चढउतार होत होते असे लिहावे? पाश्चिमात्यांचा अस्त हे पुस्तक लिहिताना कर्त्याला युरोपीय संस्कृति अभिप्रेत होती. अर्वाचीन साम्यवादी रशियातील संस्कृति या संस्कृतीच्या पोटातच ना?

मग पाश्चात्य संस्कृति मेली, का रशियात नव्याने जन्माला आली? व्यक्तीचे (एका जीवाचे) स्वतंत्र व्यक्तिमत्त्व व्यक्तीच्या शरीररचनेवर अवलंबून असते. प्रत्येक जीवाचे शरीर इतर सर्व सृष्टि व बाकीची शरीरे ह्यांपासून पृथक् असते. बाहेरच्या सृष्टीशी जरी देवघेवीचे व्यवहार चालले असले तरी त्याची अंतर्गत रचना स्वयंपूर्ण असते. त्या शरीरांतील अवयवांना व पेशींना शरीराबाहेर निघाल्यावर स्वतंत्र जीवन नसते. ज्या जीवनातीत पेशींचे व अवयवांचे संपूर्ण एकीकरण झालेले नसते, तेथे व्यक्तिमत्त्व पूर्णत्वास पोचत नाही. काही एकपेशीयमय जीव किंवा बहुपेशीमय क्षुद्र जीव ह्यांचे विशिष्ट तऱ्हेने तुकडे केले तर प्रत्येक तुकड्यापासून नवा जीव उत्पन्न होतो. अशा तऱ्हेच्या जीवजातीत व्यक्तिमत्त्व नसते असे नाही; पण त्याच्या स्थलमर्यादा अस्पष्ट व कालमर्यादा क्षणिक असतात. जीवशास्त्रांत संघटित जीव म्हणजे व्यक्ति असा सिद्धांत आहे. तो कदापिही मानवसंघापासून उत्पन्न होणाऱ्या समाजजीवनाला लावता येणार नाही.

समाजाचे घटक परस्परावलंबी असतात पण अगदी कानाकोपऱ्यात पडलेल्या मानवसमाजाखेरीज कुठल्याही मानवसमाजाची दिक्कालांतील व्याप्ति सुस्पष्ट व इतरांपासून सर्वस्वी निराळी नसल्यामुळे तिच्या ठिकाणी व्यक्तिमत्त्वाचा आरोप करता येत नाही. मानवसमाजाचे व्यापार व अंतरंग कळण्यास व्यक्तीच्या जीवनव्यापाराच्या व मनोव्यापाराच्या अभ्यासाची खासच मदत होते; पण समाज व्यक्ती आहे व व्यक्तीजीवनाचे सर्व सिद्धांत त्यास लागू होतात असे मानणे वस्तुस्थितीला सोडून आहे.

## परंपरेचे ऐतिहासिक सूत्र

संस्कृतीची निर्मिति, संचय व संक्रांति कशी होते ह्याचा जरा विचार केला तर असे दिसून येईल की खरोखरच परंपरा ह्या एका ऐतिहासिक सूत्राखेरीज मानवेतिहासाला दुसरे सूत्रच सापडत नाही. मानवाच्या गरजा - निदान प्राथमिक मूलभूत गरजा- ह्या सर्व प्राणिमात्राला सामान्य, आहार-मैथुनादि अशाच होत्या व आहेत, प्राण्यांच्या बाबतीत त्या भागविण्याची प्रत्येक जीवजातीची एकच एक

आखलेली पद्धत असते. पण माणसात मात्र गरज एकच असून ती भागविण्याचे मार्ग भिन्न भिन्न होऊ शकतात. माणसे पाणी कसे पितात ह्याबद्दल शोध काढू लागलो तर किती निरनिराळ्या तऱ्हा दिसतात. काही प्रदेशात वन्य माणसे नदीच्या किंवा तळ्याच्या काठी गुढग्यावर बसून, ओणवून किंवा पालथे पडून पाण्यात तोंड बुडवून पाणी पितात, काही एका हाताची ओंजळ करुन पितात, काही दोन हातांच्या ओंजळीत पाणी घेऊन पितात, काही पानांचा द्रोण करुन घेतात, काही बोरुच्या नळीतून पाणी ओढतात. आपल्याकडे पाण्याने भरलेले भांडे उंच धरून त्यातून धार सोडून गटगट पाणी पिणे बहुतेकांना माहीत आहे.

युरोपीय लोकांना हाताची ओंजळ करणे किंवा भांडे न उष्टावता वरुन पाणी पिणे जमतच नाही. इतर क्रियांचे बाबतीतही हाच अनुभव येतो. युरोपीय माणसांना आपल्यासारखे उकिडवे किंवा मांडी घालून बसता येत नाही. आपण मोजण्यासाठी बोटे घालताना करंगळी पासून सुरुवात करतो व तशी सुरुवात प्राचीन काळीही करीत असत, हे पुरा कवींना गणना प्रसंगे कनिष्टिकाधिष्ठित कालिदास:।अद्यापि तत्तुल्यकवेरभावादनामिका सार्थवती बभूव ह्या ओळीने सिद्ध होते.

जर्मनीमध्ये पहिल्याने आंगठा मोडतात ! कोणचीही कृति मनुष्य निरनिराळ्या तऱ्हेने करणे शक्य असते व तो करतोही. असे जर आहे, तर दर पिढीला व दर माणसागणिक प्रत्येक कृति निरनिराळी का होत रहात नाही? ह्याचे उत्तर मागेच आले आहे. मनुष्य आपले इतरांना देत असतो व इतरांचे अनुकरण करीत असतो. मनुष्यप्राण्यात बाल्यावस्था इतर प्राण्यापेक्षा जास्त असते व मोठ्यांच्या शिकवणीने व अनुकरणाने मुलाच्या क्रियेला वळण लागते. युरोपीय समाजशास्त्रज्ञ कुटुंबसंस्था ही कामभावनेला बंधनांत ठेवण्यास मुख्यत्त्वे अमलात आली असे समजतात; पण कुटुंबसंस्थेचे कार्य ह्यापेक्षा कितीतरी महत्त्वाचे आहे. कुटुंबात मनुष्याच्या निरनिराळ्या पिढ्या दृढ साहचर्यात रहातात व संस्कृतीची निर्मिति, संचय व संक्राति तेथे होत असते. दर पिढीला क्रियेची व विचाराची निराळी पद्धति न पडता वडिलांची पद्धति दृढमूल होऊन संस्कृतीचे वैशिष्टय निर्माण होते ते कुटुंबसंस्थेमुळे.

जुन्या पिढीचे अनुकरण केल्यामुळे निरनिराळ्या संभवनीय क्रियांतील एखादी करावयाची व यदृच्छया ती फलदायी व्हावयाची हा खटाटोप दर पिढीला करावा लागत नाही. जुन्या पिढीचे संचित घ्यावयाचे, अत्यल्प काळात आत्मसात करावयाचे व नवे निर्माण करावयाचे असा क्रम सुरु होतो. पहिल्या पायरीवर संस्कृति कोणत्या दिशेने जाईल हे अनिश्चित असते. पण जसजसे संचित जमत जाते तसतशी संस्कृतीची दिशाही ठरत जाते. काही सांस्कृतिक संकेत तर इतके दृढमूल झालेले आहेत की त्यात कित्येक शतकात नवनिर्मिति झालीच नाही. भाषा ही अशी सांकेतिक स्वरूपाची आहे.

अमक्या वस्तूला दगड म्हणावयाचे व अमकीला कुत्रा म्हणावयाचे हे संकेताने ठरलेले असते.मूल लहानपणी आपली वागिन्द्रिये चाळवून पहाताना निरनिराळे आवाज करीत असते. त्यातले काही आवाज थोडा वेळ त्या कुटुंबापुरते नवे संकेत निर्माण करतात उदा. मूल आईला याय्या म्हणते, किंवा घरात तिला वहिनी म्हणत असतील तर नन्नी म्हणते व तो शब्द त्या पिढीपुरता रहातो हे आपण पहातो. पण ही नवनिर्मिती अणुमात्र असते. सर्व भाषा नव्याने बनवणे कोणाही एकाला अशक्य आहे

व नवशब्दनिर्मिती कित्येक शतकां-शतकांत होत नाही. भाषा, तिचा नाद, तिने व्यक्त केलेले विचार, तिची रचना हे सर्व जुन्या पिढीपासून नवी पिढी घेते, तेव्हा संस्कृतीच्या कित्येक अंगांचा स्वीकार अभावितपणेच भाषेच्या संकेताबरोबरच होतो. वस्तुरूप संस्कृती व मनोमय संस्कृती असा फरक आरंभी संस्कृतीच्या व्याख्येत केला पण खरोखर संस्कृतीची ही दोन अंगे परस्परविरूद्ध नसून परस्परपूरक आहेत. मनोमय संस्कृती वस्तुरुप निर्मितीमुळे दृढरुप व दृढमूल होते व मनोमय संस्कृतीचे ज्ञान अथवा कल्पना आल्याशिवाय द्रव्यरुप संस्कृतीचे कार्यच कळत नाही.

भाषा जोपर्यंत नुसती ध्वनिरुप असते तोपर्यंत तिचे जीवित धोक्यात असते, व ती सारखी बदलती असते. प्रादेशिक बोलभाषा आपल्याला हेच दर्शवतात. ज्या मानवसमाजात भाषा लिपीने अक्षर झाली नव्हती, त्यांची भाषा व तिच्याबरोबर संस्कृतीही पिढ्या दोन पिढ्यात नष्ट झाल्याची कितीतरी उदाहरणे आहेत. त्याचप्रमाणे उत्खननांत फक्त वस्तुरूप संस्कृतीचाच आविष्कार संशोधकाला होतो. पण तो स्वत:च्या संस्कृतीतील वस्तूंचा संकेत लक्षात घेऊन, तुलनेने जुन्या वस्तुरूप संस्कृतीत मन ओतून, तिला जिवंत करण्याचा प्रयत्न करीत असतो.

अमक्या एका परिस्थितीत अमकी एक निर्मिती होईल असे मनुष्याच्या बाबतीत निश्चितपणे सांगता येत नाही. काही ठोकळ गोष्टी, उदा. धातु माहिती व्हावयाच्या अगोदर सर्व उपकरणी व हत्यारे लाकूड, दगड व प्राण्यांची शिंगे ह्यांची करीत, अशासारख्या सांगता येतील; पण त्यामुळे मानवेतिहासाच्या ज्ञानात काही भर पडत नाही. लाकूड कोणचे समाज वापरीत, दगड कोण उपयोगात आणीत, प्राण्यांच्या हाडाचा उपयोग कुणास ठाऊक होता, आणि ही सर्व द्रव्ये कसकशी कोणत्या स्वरूपात उपयोगीत हे प्रश्न रहातातच. ह्या प्रश्नांची उत्तरे तर्काने देणे अशक्य आहे. प्रत्यक्ष वस्तुस्थितीचाच अभ्यास करवून ती देता येतील. विटेचा उपयोग इमारती बांधण्याकडे काही समाजांनी केला तर काहींनी अक्षरे लिहून ठेवण्यासाठीही केला. काही लोक चटया नुसत्या बसण्यासाठी वापरतात तर काही त्यावर खाण्याचे जिन्नस वाढण्यासाठी आणि काही त्या प्रेतांना गुंडाळण्यासाठी वापरतात. त्यामुळेच तर उत्खननांत केवळ वस्तु सांपडल्या तर त्या कशासाठी होत्या ह्याची कल्पना येणे बरेचदा जड जाते. महंजोदारोमध्ये दगडाची बनवलेली वलये सापडतात. कुणी म्हणतात दाराचे कुसू बसवण्यासाठी दाराखाली बसवलेली ही वलये असावीत. कोणी म्हणतात ह्या वलयावर घासून गुळगुळीत केलेले उभे दगड बसवून शंकराची पिंडी तयार करीत. त्या वलयाचे खरे कार्य काय हे उमजले नाही.

ह्यावरून लक्षात येईल की संस्कृती - मग ती द्रव्यरूप असो वा मनोमय असो- हे सकळां इंद्रिया लाविलेले एक विशिष्ट वळण आहे. ते वळण काय, तो संकेत काय हे कळल्याशिवाय संस्कृतीचे सूत्र कळणेच अशक्य आहे. संस्कृतीची रचना जितकी जास्त गुंतागुंतीची तितके संकेतही गुंतागुंतीचे असतात. संकेत व वळण ह्या शब्दांवरून संस्कृती ही मानवसमाजाने जाणून बुजून केलेली आहे असे समजू नये. वस्तूची निर्मिती होऊन तिचा एक विशिष्ट उपयोग झाला की ती उपयोगाची पद्धत दृढ होऊन ती तशी उपयोगावी असा संकेत उत्पन्न होतो. सहजीवन, परस्पर संभाषण, व अनुकरण ह्यामुळे सर्व संकेत सामाजिक होतात. व तसे असल्याशिवाय

त्यांचा संचय, नवी निर्मिति व जुन्याची नव्या पिढीला संक्रांती ह्या तीनही घटना अशक्य झाल्या असत्या. भाषा हे संस्कृतिसंचयाचे व निर्मितिचे एक प्रभावी साधन आहे. तिचे सांकेतिक स्वरुप सर्वांना परिचयाचे आहे. एका भाषेत एका ध्वनिसमूहाला एक अर्थ असतो तर दुसऱ्या स्वतंत्र भाषेत तसा ध्वनिसमूह सहसा असत नाही व असलाच तर अगदी निराळ्या अर्थाने असतो, जितकी भाषा सांकेतिक तितकी शास्त्रीय विचाराला तिची मदत जास्त होते. भाषा प्रत्येकजण लहानपणापासून उपयोगीत असल्यामुळे शब्दांच्या अर्थाला थोडेथोडे निराळे वळण लागण्याचा संभव असतो; अर्थाचे संकेत जरा निरनिराळे होऊन संभाषणास अडचणही उत्पन्न होते; पण भाषा लिहून ठेवली म्हणजे संकेत दृढ होऊ लागतो.

पाणिनीने भाषेचे सांकेतिक रुप ओळखून काही नवीनच संकेत निर्माण करुन व्याकरण व भाषाशास्त्र ह्याचा पाया रचिला. गणितातील संख्यादर्शक चिन्हे व बीजगणितातील अक्षरे ह्यामुळे शास्त्रातील प्रगति शक्य झाली. संस्कारिक आयुष्य संकेतमयच असते. हे संकेत समजण्यासाठी ऐतिहासिक अभ्यासाशिवाय दुसरा मार्ग नाही. त्या संकेतानीच वस्तुरुप निर्मितीचा विनियोग व कौटुंबिक जीवन, नैतिक मूल्ये, धार्मिक भावना वगैरे ठरवल्या जातात.

मनुष्य ज्या समाजात जन्मतो व वाढतो त्या समाजाची संस्कृति, म्हणजेच संकेत, तो आत्मसात करतो. पाव्हलोव्हने कुत्र्यावर केलेले प्रयोग सर्वस्वी मनुष्याला लागू करता आले नाहीत तरी संकेतनिर्मिती कशी होते हे त्यामुळे समजेल. कुत्र्याच्यापुढे अन्न ठेवले की, त्याच्या लालापिंडातून लाळ तोंडांत जाते व रसायनांचे कार्य सुरु होते. अर्थातच ही सर्व घटना शरीररचना व क्रिया ह्यांवर आधारलेली आहे पण तिलासुद्धा वळण लावता येते. कुत्र्यापुढे अन्न ठेवताना दरवेळी घंटा वाजवायची किंवा दिवा लावायचा असा प्रघात प्रयोगकर्त्यांनी सुरु केला. काही दिवसांनी नुसती घंटा वाजवली किंवा नुसता दिवा लावला तरी अन्न पुढे न येताही कुत्र्याच्या लालापिंडांतून लाळ गळू लागे. घंटा किंवा दिवा हे पुढे येणाऱ्या अन्नाचे संकेत बनले. ज्या क्रिया विशिष्ट वस्तूच्या दर्शनाने व्हावयाच्या त्या, त्या वस्तूच्या प्रतिनिधिभूत झालेल्या इतर वस्तूने होऊ लागतात. नागरी जीवन जगणाऱ्या लोकांचे जीवन घड्याळाच्या तबकडीत बसवलेले असते. शाळेत किंवा कचेरीत जाणाऱ्या माणसाला दहा वाजले की जेवणाची आठवण होते. जेवणाचा भुकेशी सरळ संबंध जाऊन तो दहा वाजण्याशी जुळतो.

मनुष्याचे खाणेपिणे, निजणे, मैथुन वगैरे नैसर्गिक गरजाही संकेताने बांधलेल्या असतात. किती, काय व कधी या तीनही मर्यादा बऱ्याच अंशी संकेताने म्हणजेच समाजपरंपरेने ठरवलेल्या असतात. अर्थात संकेत मनुष्याच्या शरीराला झेपणार नाहीत अशा मर्यादा घालू लागले म्हणजे शरीर बंड करुन उठते किंवा मरुन जाते. त्याचेही उदाहरण पाव्हलोव्हने दिले आहे. घंटा होऊन किती वेळाने अन्न दिले तर कुत्रे वाट पहातात हा प्रयोग करताना असे दिसले की काही थोडा वेळ कुत्रे आशेने अन्नाची वाट पहातात व त्याचे लालपिंड स्रवत रहातात; पण त्यापलीकडे वेळ वाढवली की काही कुत्रे निजतात, काही रागावतात व काही थोड्याच प्रयोगात इतके बेचैन होतात की नुसते घंटेबद्दलच नाही तर अन्नाबद्दलही त्याची नैसर्गिक प्रतिक्रिया नाहीशी होऊन

जाते. मनुष्याच्या भाषेत बोलावयाचे म्हणजे ते वेडे होतात - वास्तव सृष्टीशी त्यांचा संबंध तुटतो. मानवी शरीराच्या व मनाच्या लवचिकपणाची मर्यादा काय असू शकेल हेही संस्कृतीच्या अभ्यासाने कळते व आपल्याला कल्पना येणार नाही इतके चिवट मानवाचे शरीर व मन असते हेही आपल्या प्रत्ययास येते. बोलाचीच कढी बोलाचाच भात, खाऊनिया तृप्त कोण होई हे जरी खरे असले तरी निव्वळ कल्पनेने निर्माण केलेल्या स्वर्गसुखाच्या आशेने ह्या दु:खमय संसाराचे ओझे मानव वहातातच ना? व्यक्तीचे शरीर व व्यक्तीचे मन कोणते संकेत पाळण्यास तयार होईल हे कळण्यासाठी ती व्यक्ती कोणत्या संस्कृतीत जन्मली ते कळावे लागते. व्यक्तीचा व समाजाचा संबंध काय हे ह्यावरून उघड होते.

### संस्कृती समाजाची असते

संस्कृती समाजाची आहे, व्यक्तीची नव्हे, असे म्हटले ते ह्याच अर्थाने. व्यक्तीशिवाय, समाज अशी काही अव्यक्त चीज अस्तित्वात नाही. व्यक्तीचे सामुदायिक जीवन म्हणजेच समाज. पण व्यक्तीचे जीवन मर्यादित व अत्यल्प असते आणि समाजाचे जीवन दीर्घ, मोठ्या प्रदेशावर पसरलेले असते. जुनी माणसे मरतात व नवी जन्माला येतात पण समाजिक परंपरा त्या मानाने दीर्घायु असते.

सुरवंट व फुलपाखरे दर ऋतुत लाखांनी मरतात पण सुरवंटांची जात काही मरत नाही. तसेच व्यक्ती मरतात पण त्यांची संतति समाजाच्या आयुष्याची दोरी होतांहोईतो तुटू देत नाही. जुन्या पिढीची परंपरा प्रजेच्या ठायी संतत रहाते. व्यक्तीच्या जीवनाला सामाजिक मुल्यांच्या साच्यांत बसावे लागते. ब्राम्हणाचे पोर विद्येच्या पाठी लागते. मराठ्याचे शिपाईगिरीची स्वप्ने रंगवते. ह्या क्रिया ती काही स्वत:च्या अंत:प्रेरणेने करीत नसून त्या त्या सामाजिक परिस्थितीमुळे व कौटुंबिक परिस्थितीमुळे एक विशेष आदर्श डोळ्यांपुढे ठेवण्यात आल्यामुळे करीत असतात. शरीराच्या वाढीसाठी, अवयवांच्या हालचालीसाठी मनाच्या विकासासाठी निरनिराळी मूल्ये सामाजिक जीवनात निर्माण होतात व त्या त्या मूल्यांच्या मुशीत व्यक्तीचे शरीर व मन ओतले जाते.

संस्कृत उच्चार स्पष्ट करण्यास लहानपणापासून शिकवले व तसा स्पष्ट शब्दोच्चार ऐकत राहिले म्हणजे मूल स्पष्ट उच्चार करु लागते. लहानपणापासून शारीरिक कष्टांची सवय असली, कुस्ती खेळण्याचे प्रोत्साहन मिळत गेले, वांडपणाकडे वडील माणसांनी कानाडोळा केला म्हणजे बळकट शरीराचे, काटक व धाडसी, पण अभ्यासाचा कंटाळा करणारे मूल तयार होते. गवयाचे पोर सुरावर रडते म्हणतात त्याचा अर्थच हा की ज्या सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीत व्यक्ती जन्माला येते व वाढते त्या परिस्थितीनुरुप तिचा विकास होतो.

केरळामध्ये टोपल्या विणणारी एक जात आहे. तिच्याबद्दल बोलताना एक मजूर अधिकारी म्हणाला की, ह्या जातीची माणसे टोपल्या विणतांना पाहिली की असे वाटते, त्यांच्या बोटांना डोळे आहेत. इतकी झरझर व बिनचूक त्याची बोटे काम करतात. धारवाडच्या बोर्स्टल स्कूलमध्ये अल्पवयी गुन्हेगार ठेवतात. ह्यांत पूर्वी सिंध धरून सबंध मुंबई इलाख्याची मुलें ठेवीत असत. सिंधकडून पठाण मुलेही येत. ह्या मुलांत चाबकाचे फटके मिळविण्याची स्पर्धा चाले, व ज्या मुलाला वांडपणाबद्दल फटके मिळाले नाहीत त्याला जीव नकोसा होईल इतका

त्याचा इतरांकडून धिक्कार होई ! जो मुलगा जास्ती वेळा शिक्षा भोगील त्याला सर्व मान देत ! हे जे विशिष्ट वळण व्यक्तीला लागे ते तेथील सामाजिक परिस्थितीमुळे असे. समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास केल्याशिवाय कळणेच शक्य नाही. समाजाचे जीवन भूतकाळात लांबवर गेलेले असते, निरनिराळ्या भूप्रदेशावर पसरलेले असते व चांगले, वाईट, हिडीस, सुंदर, उदात्त, नीच, श्रीमंत, गरीब अशा कितीतरी बाजू त्या जीवनाला असतात. हे सर्व एका व्यक्तीत कसे प्रतिबिंबित होणार?

कोणाचेही व्यक्तीमत्व कितीही विशाल असले तरी त्यामध्ये संस्कृतीचे विश्वदर्शन होणे अशक्य असते. ह्या अर्थानेच संस्कृती समाजाची असते, व्यक्तीची नसते. संस्कृती व्यक्तीच्या आयुष्याची दिशा ठरवते, तर व्यक्ती संस्कृतीचा प्रवाह थोड्याबहुत प्रमाणात बदलीत असते. सांस्कृतिक जीवन जगणे ही मानवांची प्रकृति आहे. कपडे घालणे, वैवाहिक जीवन जगणे, चार लोक करतात ते करणे ही विकृति नव्हे, तर नैसर्गिक आचरण आहे असेच म्हटले पाहिजे.

हवा, पाणी, सूर्यप्रकाश ह्या गोष्टी जितक्या सहजतेने आपल्या आयुष्यात सोबत करीत असतात तितक्याच सहजतेने सामाजिक संकेत उर्फ संस्कृति आपले वैयक्तिक जीवन भरुन रहाते. सूर्य उगवण्याचे जसे आपणास आश्चर्य वाटत नाही तसेच आपल्या रीतीभातीचे व भाषेचे वाटत नाही. उलट सामाजिक जीवन जगण्याची आपली तऱ्हा हीच नैसर्गिक आहे, अनिवार्य आहे, योग्य आहे अशी आपली ठाम समजूत असते. परधर्म नेहमी भयावह असतो व स्वधर्म हा सर्वश्रेयस्कर वाटतो. आपले तेच सवयीने चांगले वाटते. मराठी भाषा किती सोपी, मराठी स्त्रियांचा पोषाक किती सुटसुटीत, मराठ्यांचे खाणेपिणे कसे योग्य ! दक्षिणात्यांप्रमाणे नुसता सारभातही खात नाहीत व उत्तरेकडील लोकांप्रमाणे दुधातुपांतही बुडलेले नसतात. थोडक्यात म्हणजे आपल्या चिरपरिचित सामाजिक रहाणीला आदर्श समजून तिच्यावरून आपण इतरांच्या रहाणीचे व पद्धतीचे उच्चनीचत्व ठरवतो. गोठ्यात बांधलेले गुरुं पुढे ठेवलेले आंबोण जसे भराभर खाते तशाच तऱ्हेने आपण आपल्या समाजाची मूल्ये आत्मसात करतो. त्याबद्दल कधी विचारच करीत नाही. असे सांस्कृतिक जीवन जगणारे लोक, मग ते श्रीमंत असोत वा गरीब असोत, मुंबईसारख्या पुढारलेल्या शहरांतले असोत वा सह्याद्रीच्या रानांतले असोत, एक प्रकारचे प्रवाहपतित आयुष्य जगत असतात, परंपरेने मिळालेले खात असतात, संस्कृतीत बुडलेले असतात. व्यक्तीचे जीवन समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचे एक अंग होते.

काही थोडे लोक असेही असतात की ते पहिल्याने वर्णन केलेल्या लोकांप्रमाणे उपभोग घेतात पण त्यांचा उपभोग विचारपूर्वक असतो. संस्कृतीत जे वाईट असेल ते टाळण्याची, निदान त्याचे परिणाम शक्यतो कमी करण्याची त्यांची प्रवृत्ति असते व जे चांगले असेल त्याची माधुरी ते चवीने चाखतात, ते मिळविण्याची धडपड करतात, ते जतन करण्याची त्यांची पराकाष्ठा चाललेली असते. हे डोळस, विवेकी लोक संस्कृतीचे संरक्षक व पोषक असतात; आणि अत्यल्प लोक समाजजीवनाचा विचार करतात, वाईटाशी झगडा देतात, चांगल्याचा उपभोगच घेऊन राहत नाहीत तर नवी सांस्कृतिक मूल्ये निर्माण करतात. असे लोक संस्कृतीचा प्राण आहेत. ते संस्कृतीला गतिमान ठेवतात, सडू कुजू देत नाहीत.

ब्रह्माची निर्माणशक्ती, विष्णूची धारणाशक्ती व शिवाची विध्वंसक शक्ती अशांच्यांत एकत्रित झालेली असते. ते संस्कृतीला उजळा देत रहातात. तरीसुद्धा संस्कृतीत मोठे बदल करण्याची शक्ती एका व्यक्तीची नसून सर्व समाजाची आहे. एका संस्कृतीचा संबंध दुसरीशी आला म्हणजे वस्तुरुप व मनोमय संस्कृतीची देवघेव होऊन संस्कृति बदलू लागते. कधी एक संस्कृत्ति नष्ट होऊन दुसरी तिच्या जागी येते. संस्कृतीच्या बदलाचा उगम व्यक्तीच्या आचारविचारांत जरी असला तरी व्यक्तीच्या आचारविचारांचे परिवर्तन संस्कृती-संगम वा संघर्ष ह्यांवर बहुतांशी अवलंबून असते. अंतर्गत स्वयंप्रेरित असे बदल फारच कमी प्रमाणात होतात.

## संस्कृति एक की अनेक?

संस्कृति एक का अनेक असा काहीसा निरर्थक वाद बरेच वेळा केलेला आढळतो. त्याबद्दल थोडक्यात येथे सांगितलेले बरे. इतर प्राण्याप्रमाणे मानवांच्या आचारांचे मार्ग आखून दिलेले नाहीत हे मागे सांगितलेच. परिस्थिती+तात्कालिक मानवी गरज = मानवी आचार, ह्या समीकरणातील कोणतेही पद निरपेक्षतया स्थिर नाही व म्हणून उत्तरही कदापि तेच ते येणे शक्य नाही. असे जर आहे तर मानवी आचार व विचार मिळून झालेल्या संस्कृती एक कशा असणार?

ह्याउलट मानव आपले विचार व आपली निर्मिती इतरांना देऊ शकतो व स्वत: इतरांची घेऊ शकतो म्हणून जेव्हा जेव्हा भिन्न संस्कृतीचे लोक एकत्र येतात तेव्हा त्यांच्यात देवघेव होऊन मुळांतल्या भिन्न संस्कृतींना सारखे रुप येऊ लागते. परस्पर दळणवळण अव्याहत चालू असेल अशा परिस्थितीत मोठमोठ्या प्रदेशांत संस्कृती एकरुप होऊ लागते, पण ती सर्वस्वी एक अजून तरी झाली नाही. युरोपियांचे सांस्कृतिक आक्रमण गेली दोन तीन शतके जगावर चालले आहे पण त्यांच्या संघर्षामुळे काही बाबतीत जरी मोठमोठ्या भूप्रदेशांतील समाज सारखे वाटले तरी जुनी संस्कृती प्रत्येकाची निराळी असल्यामुळे जुन्या-नव्याची क्रियाप्रतिक्रिया भिन्न भिन्नच झाली. जपानी व चिनी लोकांनी पाश्चात्यांशी जो झगडा दिला त्याचे स्वरूप सर्वस्वी भिन्न आहे व ते का हे त्यांच्या त्यांच्या मूळ संस्कृतीचा ऐतिहासिक अभ्यास केल्याशिवाय कळणार नाही.

बाराव्या शतकापासून हिंदुस्थानात जेव्हा मुसलमानांचे आक्रमण झाले तेव्हा पंजाबी, हिंदी, बंगाली, गुजराती व मराठी समाजांची प्रतिक्रिया निरनिराळी झाली ती संस्कृतिवैचित्र्यामुळेच. एक भाषा व एक धर्म असलेले मूळचे एका संस्कृतीचे लोक वेगळे पडले म्हणजे त्यांच्या समाजजीवनात किती फरक होतो हे अमेरिका, इंग्लंड व आस्ट्रेलिया ह्या तीन देशातील लोकांच्या रहाणीवरून दिसून येईल. भारतीयांचे दृष्टया युरोपातील लोक एका संस्कृतीचे आहेत पण त्या त्या देशातील लोक तसे मानीत नाहीत.

पौर्वात्यांशी वागतांना सर्व पाश्चात्य आम्ही एक असे वागतील; पण त्यांच्या वाङ्:मयांत व रोजच्या व्यवहारात मात्र एकीची भावना असत नाही. मानवेतर प्राण्यांचा विचार करता सर्व मानव संस्कृती एक असे म्हणता येईल, पण एरवी नाही. तसेच संस्कृती ऐतिहासिक परंपरेने कितीही भिन्न असल्या तरी त्यांच्यात देवीघेवीचे व्यवहार अशक्य असेही नाही. आम्ही म्हणजे कोणीतरी मोठे, प्रकृतिधर्माने इतरांकडून वरचढ म्हणून आमची संस्कृती इतरांहून

भिन्न व थोर असा आग्रह काही देशभक्तांचा व धर्मभक्तांचा असतो. उलट संस्कृतिभिन्नता असे काही नाहीच, जी थोडी भिन्नता आहे तीही एक भाषा सर्वत्र करुन नष्ट करावी, भिन्नता आहे ती वरवरची आहे, त्यामागे सर्व मानवांची साधारण अशी एकताच आहे, अशा विचारसरणीचे लोकही सापडतात. स्वभाषेचा अभिमान, स्वसंस्कृतीचा अभिमान म्हणजे अशा लोकांच्या दृष्टीने केवळ हट्ट व दुराभिमान होय.

इंग्रजी राज्य, सार्वत्रिक इंग्रजीचा उपयोग, ह्यामुळे काही लोकांना शिक्षण घेऊन परप्रांतांत नोकरी करण्यास सोईचे झाले. बदली झाली तरी सर्वत्र इंग्रजी शाळा असल्यामुळे मुलांच्या शिक्षणाची गैरसोय नसे. कुठच्याही प्रांतांत नोकरी केली तरी त्या प्रांताची भाषा शिकण्याची व तेथील समाजात मिसळण्याची गरज नसे. असे लोक आज प्रांतीय भाषा व प्रांतीय राष्ट्रवाद ह्यांच्या विरुद्ध आहेत. त्याचप्रमाणे सर्व देशभर व्यापार करणारे व घिरट्या घालणारे भांडवलदार ह्यांनाही एकछत्री राज्याखाली मिळणारे संरक्षण हवे आहे. वाटेल त्या ठिकाणी कारखाने व दुकाने घालण्याची त्यांना परवानगी हवी आहे. हेही लोक प्रांतीय भाषांविरूद्ध आहेत.

ह्या दोन्ही वर्गातील बुद्धिमान लोक संस्कृती भिन्न नाही, ती एकच आहे; फक्त भारताचीत नाही, तर जगाचीही एक आहे, असे अट्टाहासाने सांगतात. संस्कृतीचे एकत्व वा अनेकत्व ही सापेक्ष आहेत व ज्या दृष्टीने अभ्यास करावयाचा त्याप्रमाणे काही संस्कृती एकांत घालता येतात किंवा निरनिराळ्या करता येतात. अगदी काटेतोलपणे पाहिले तर कोणतेही दोन मानवसमाज सांस्कृतिक दृष्ट्या सर्वस्वी सारखे नसतात. संस्कृति एक असली किंवा झाली तर मानवसमाजातील भांडणे व द्वेष कमी होऊन सर्व मानवसमाज एका जगात गुण्यागोविंदाने नांदतील असा काही लोकांचा दावा आहे. मानवसमाजाच्या इतिहासाकडे नजर टाकल्यास संस्कृतीचे एकत्व, रक्ताचे एकत्व, भाषेचे एकत्व किंवा धर्माचे एकत्व ही परस्परसख्याचीच पोषक आहेत, वैराची नाहीत असे मुळीच दिसून येत नाही. अभ्यासकाने जे आहे त्याचा अभ्यास करावा, काही हेतू मनात योजून त्याप्रमाणे इतिहास बनवू नये. अशी वृत्ति ठेवल्यास मानवी मनाचे कोडे कदाचित उकलून सहजीवनाची किल्ली सापडेल, वैचित्र्यांतूनच एकत्व निर्माण होईल. पण तोपर्यंत संस्कृतीचा अभ्यास करताना आपली सोय वा समाजविषयक ध्येये यांनी वास्तवाला विकृत करण्याने आपण ध्येयाला व वास्तवाला दोघांनाही मुकूं.

## संस्कृतीची स्थिरता

व्यक्ती व संस्कृति ह्यांचा संबंध काय हे आपण पाहिले. संस्कृति हा समाजाचा स्थायीभाव आहे तर व्यक्ती हा विकारीभाव आहे. मात्र अशा परिस्थितीत स्थायी, ध्रुव वगैरे शब्दांनी व्यक्त होणारे, चिरंतन, न बदलणारे स्वरुप संस्कृतीचे कधीच नसते व व्यक्तीही सर्वस्वी विकारी नसते.

संस्कृति एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाते ती शिक्षणाच्या मार्गाने. काही शिक्षण प्रत्यक्ष असते, काही अप्रत्यक्ष असते. वडील माणसें लहाम मुलांना चालायला, बोलायला व वागायला शिकवतात. कित्येक गोष्टी न सांगताही मुले अनुकरणाने आत्मसात करतात. एखाद्या घराचे वळण अमक्या तऱ्हेने आहे असे आपण म्हणतो, त्यावेळी त्या घरातील मंडळीच्या वागण्याबोलण्याची पद्धति आपण मनात आणतो. ही पद्धत मुलांना काही धडे

देऊन शिकवलेली नसते. मुले ती बरीवाईट पद्धत अनुकरणाने न कळत शिकत असतात. ह्या प्रमाणे वंशपरंपरा संस्कृतीचे संक्रमण एका पिढीकडून दुसरीकडे होत असते तेव्हा संस्कृतीत हळू हळू फरक पडतो. पिढीपिढीला तो जाणवत नाही, पण शतकांचा इतिहास पहाणाऱ्याला तो कळतो. अशा स्थितीत संस्कृति स्थिर राहिलेली वाटते. अशा तऱ्हेची संस्कृती एकाकी राहिलेल्या काही वन्य जातीची दिसते, पण बहुतेक मनुष्यसमाज असे एकाकी रहात नाहीत. ते स्वत:चे स्थान तरी बदलतात किंवा दुसरीकडचे समाज येऊन त्यांशी संगम वा संघर्ष करतात.

असे झाले म्हणजे आनुवांशिक परंपरा खुंटते. वडील पिढी व तिचे अनुकरण करणारी खालची पिढी ह्यांत एक नवीनच तिसरा भागीदार येतो व तिसऱ्याचे आचारविचार नवी पिढी उचलू पहाते. संस्कृतीचे संक्रमण विनासायास न होता पिढ्यांपिढ्यांत वैमनस्य वाढून अंतर पडते. बदल हळू हळू न होता एकदम होतो. हीच सामाजिक क्रांति. गेल्या शंभर वर्षात भारतात विचारांचे, आचारांचे व वस्तुरुप संस्कृतीचे रुप जे बदललेले दिसते ते बऱ्याच अंशी ह्या क्रांतिमार्गाने बदललेले आहे. जुनी मूल्ये नाहीशी झाली नाहीत, पण समाजाच्या काही थरांना ही क्रांति चांगलीच जाणवली. संस्कृतीत किती बदल झाला म्हणजे एक संस्कृती जाऊन दुसरी आली असे म्हणावे? संस्कृतीत बदल होत असताही परंपरा अखंडित आहे असे केव्हा म्हणावे ह्या प्रश्नांचा विचार करणे जरुर आहे.

### भारतीय संस्कृती खंडित की अखंडित ?

भारतात वेदकाली जी भाषा बोलत ती आज कोणाच्याही बोलण्यांत नाही. त्या वेळचे लोक ज्या दैवतांची पूजा करीत त्यापैकी वरूण, मरूत्, आदित्य, इंद्र वगैरे आज लुप्तप्राय होऊन त्यांना माहित नसलेल्या राम, कृष्ण, मारुति, शंकर वगैरे देवांची आपण अलीकडच्या काळांत मंदिरे बांधली आहेत. कोवळ्या गाई वासरांचे मांस हा त्यांचा अत्यंत आवडता खाद्य पदार्थ आज आपणा सर्वांना निषिद्ध आहे; अशा परिस्थितीत आपण त्यांच्या परंपरेतील आहो की नाही? अगदी नि:संशय आपण त्याच परंपरेतील आहो. का व कसे ते काही उदाहरणांनी समजेल.

### संस्कृतीच्या एकत्वाच सूत्र

संस्कृतीची अखंडितता ही तिच्या अंगांगांच्या स्थिर स्थितीत नसून परंपरेच्या अखंडिततेत आहे व परंपरेची अखंडितता म्हणजे अनुस्मरण व थोड्या अंशाने का होईना अनुसरण. हे तत्त्व काही समाजाचा इतिहास ध्यानात घेतला की समजेल. प्रशांत महासागरात परसलेल्या अनेक बेटांपैकी ऑस्ट्रेलियाच्या दक्षिणेस टॅस्मेनिया म्हणून एक मोठे बेट आहे व त्याच महासागरात ईस्टर म्हणून काही बेटे आहेत. त्यांचा गेल्या शंभर वर्षांचा इतिहास पाहू.

युरोपीय लोकांना ज्यावेळी टॅस्मेनियाचा प्रथम शोध लागला त्या वेळी तेथे एक वन्य जात रहात असे. वस्त्रप्रावरणे, अग्निसाधन व घरे बांधणे ह्या लोकांना माहीत नव्हते. वन्य पशूंची करावी तशी ह्या लोकांची शिकार करून त्यांना युरोपियांनी नष्टप्राय केले. काही ५-१० लोक उरले त्यांना मिशनऱ्यांनी आसरा देऊन ख्रिस्ती बनवले पण तेही सर्व लवकरच मेले. संस्कृतीची शारीरिक व सामाजिक परंपरा पूर्णतया खंडली. त्या लोकांचे मिशनऱ्यांनी घेतलेले एक दोन फोटो व काही सांगाडे मात्र आज शिल्लक आहेत. वस्तुमय संस्कृति इतकी निकृष्ट असलेल्या

लोकांचे समाजजीवन तरी कसे होते ह्याची उत्कंठा कितीतरी संशोधकांना आज आहे. पण ती संस्कृति इतकी पूर्णतया मेली आहे की तिच्याबद्दल आज जवळ जवळ काहीच समजण्यास मार्ग नाही. ह्याउलट ईस्टर बेटावरच्या लोकांची संस्कृती बरीच समृद्ध होती. ते घरेदारे बांधून रहात होते. बागाईत करीत असत. त्यांच्या बेटावर पूर्वीच्या काळी कोणीतरी दगडांतून घडवलेले प्रचंड पुतळे होते व त्यांची भाषाही लिहिलेली होती.

ह्या लोकांची शिकार झाली नाही पण त्या सर्वांना ख्रिस्ती करून त्यांच्या धर्मगुरुंना मारुन टाकले. बोलभाषा थोडीबहुत शिल्लक आहे. शेती व घरे तीच आहेत पण ज्यांना परंपरा माहीत होती व ज्यांनी जुन्या पोथ्यांचे जतन केले होते ते मेल्यामुळे जुनी परंपरा, जुने देव, जुन्या गोष्टी, सर्व नाहीशा झाल्या. बर्लिनच्या पुराणवस्तु संग्रहालयात ईस्टर बेटावरील भाषेत लिहिलेली काही पृष्ठे आहेत म्हणतात, पण ती कोणासही वाचता येत नाहीत. संस्कृतीच्या काही अंगांचा पूर्णतया नाश होऊन परंपरा बऱ्हंशी खुंटली, कारण पूर्वीचे स्मरणही नाही व अनुसरणही नाही.

आपला इतिहास ह्याउलट आहे. भाषा सारखी बदलत राहूनही जुन्यांतजुन्या वाङ्:मयाचा अर्थ पंधराव्या शतकांत सायणाचार्य लावू शकत होते. सध्यांच्या भाषांचे मर्म लक्षांत येण्यास ह्या जुन्या भाषांचा अभ्यास आजही करावा लागतो. नुसती भाषाच नव्हे तर संस्कृतीचा आत्मा इतका सारखा आहे की जुन्या वाङ्:मयाचे रसग्रहण आजही आपण करतो, नव्हे आपल्या नव्या वाङ्:मयाची मुळे जुन्यांतच सापडतात. कालिदासाचे काव्य वा नाटक वाचताना कुठच्यातरी परक्या संस्कृतीतील मूल्ये आपण पारखीत आहोत असे वाटत नाही. उद्योगपर्वातील कुंती (पितृप्रधान संस्कृतीचा एक बळी) जितक्या तळतळाटाने पितंर त्वेव गर्हेयं.... येनाहं कुन्तीभोजाय धनं धूतैरिवार्पिता॥ (महाभारत, उद्योगपर्व ८८,६१, संशोधित आवृत्ति)[१] असे म्हणते तितक्याच आवेगाने तिची मराठी बहीण म्हणते काळजाचा घड दिला परायाच्या हाती, तीच कुटुंबसंस्था, तीच व्यक्तीच्या हृदयाची ओढाताण आजही आहे.

तुकाराम घ्या, ज्ञानेश्वर घ्या, वा नामदेव घ्या. मराठीतील अभंगांचे जशाचे तसे भाषांतर उपनिषदांत सापडणे फारच सोपे काम आहे. मोठ्या कुळांत मुलगी द्यावी म्हणून स्मृति सांगतात. आजही प्रत्येक आई, सासूसासरा, दीर, जावा, नणंदा असलेल्या घरी मुलगी पडावी म्हणून धडपडते. इंद्र-वरूणाची पूजा चाले त्याचवेळी तैमातादि पिशाच्चांची, मलेरिया तापाच्या देवाची, जादूटोण्याने पूजा चाले. वृक्ष व वनस्पतीची दैवते व त्यांची क्षुद्र देवालये चैत्य ह्या नावाने महाभारतात व बुद्धजातकांत सापडतात, तीच आज वनदेवी, जाखाई, जोखाई, म्हसोबा, वेताळ म्हणून आहेतच.

इंद्र गेला पण इंद्रमुख म्हणून वेळूचा स्तंभ उभारून त्यावर गुढी आपण आजही बांधतो. वरूण देवघरांतून गेला, पण श्रावण्यापौर्णिमेचा त्याचा नारळ चुकत नाही. यज्ञ व यज्ञीय बोकड गेले, पण रेडा, बकरे, कोंबडी ह्यांचे बळी दैवतांना नित्य दिले जात आहेतच. नवे रोज येते आहे, पण जुने आपण टाकून दिलेले नाही. नवेजुने, प्रौढ व प्राथमिक सर्व काही

[१] (माझ्या दु:खी जीवनाबद्दल मी दुर्योधनाला दोष देत नाही) तर माझ्या बापालाच दोष देते. एखाद्या सौद्यासाठी धन द्यावे तसे त्याने मला कुन्तीभोजाला देऊन टाकले.

शेजारी शेजारी रचून ठेवलेले आहे. अनेक दैवतवाद आहेत, सगुण एकेश्वरी संप्रदाय आहे, निर्गुण ब्रह्माचे पण तत्त्वज्ञान आहे. पुनर्जन्मावर अजूनपर्यंत विश्वास आहे. जो प्रकार मनोमय संस्कृतीचा, तोच वस्तुरूप संस्कृतीचा आहे. उत्खननांत दोन हजार वर्षापूर्वी सापडलेले पदार्थ आज कोठे ना कोठे वापरांत आहेत. आम्ही आमच्यातले जुने, अप्रौढ, म्हणून जसे टाकले नाही, तशी आमच्या देशांतील वन्य जमातीची शिकारही केली नाही. ते आमच्यापासून फार दूर आहेत असे आम्हाला वाटतच नाही. पूर्वजांपासून आम्ही जरी भिन्न असलो तरी जो सामाजिक बदल होत गेला तो स्मरणांत ठेवीत ठेवीत, रामकृष्णादि अलौकिक पुरूषांचे अनुसरण करण्याचे ध्येय उरांशी बाळगीत आतापर्यंतचा मार्ग आक्रमीत आहोत. पूर्वजांचा इतिहास, त्यांचे वाङ्:मय त्यांचे तत्त्वज्ञान आजही आपले म्हणून अभ्यासतो व जर काही त्याज्य सापडले-व तसे त्याज्य व गर्ह्य पुष्कळच आहे- तरी ते निंदता निंदता वा टाकता टाकता त्याच्याकडे ममत्वाच्या भावनेने पाहतो.

हेच ते अनुस्मरणाचे व परंपरेच्या आणि संस्कृतीच्या अखंडिततेचे तत्व. ओ ऋतो स्मर कृतं स्मर हे आपल्या संस्कृतीचें सूत्र म्हणून सांगता येईल. कर्माची आठवण ठेव. संचिताचे निराकरण करणे असेल तरीसुद्धा कर्माची आठवण ठेवली तर ते होईल. हेच सूत्र समाजव्यवस्थेतही सापडते. जोपर्यंत पूर्वजांचे स्मरण आहे तोपर्यंत कुलाची एकता रहाते. जोपर्यंत मेलेल्यांना पिंड पोचतो तोपर्यंत मृत व जिवंत एका समाजाचे घटक रहातात. जोपर्यंत पूर्वजांचे स्मरण ममत्वाने होते तोपर्यंत ते संस्कृतीने उत्पन्न केलेल्या स्वर्गात आनंदोपभोगाचे धनी असतात. विस्मरण झाले की परंपरा खंडते व ते स्वर्गच्युत होतात. त्यांचे मानाचे स्थान हरपते. ते विस्मृतीच्या नरकांत खिचपत पडतात. ही कल्पना महाभारतात अरण्यपर्वातील एका सुंदर कथेत सांगितली आहे. इंद्रद्युम्न नांवाचा प्राचीनतम काळांतला स्वर्गात गेलेला एक राजा पुण्यक्षय झाला म्हणून पृथ्वीवर आला व आपल्याला कोणी स्मरते का ते शोधू लागला. पहिल्याने तो मार्कंडेय ऋषि दीर्घायु म्हणून त्यांच्याकडे गेला पण त्यांना तो आठवेना म्हणून त्यांच्यापेक्षांही वृद्ध अशा प्राकारकर्ण नांवाच्या घुबडाकडे ते दोघे गेले. त्यालाही तो आठवेना म्हणून ते एका सरोवरांकाठी रहात असलेल्या नाडीजंघ नांवाच्या बगळ्याकडे गेले.

बगळा म्हणाला, मला काही कोणी इंद्रद्युम्न नाही बाबा आठवत, पण ह्याच तळ्यांत एक अतिवृद्ध, हजारो वर्षे जगलेले अकूपार नांवाचे कासव रहाते त्याला हाक मारून विचारुंया. अकूपाराला हाक मारून विचारता ते क्षणमात्र स्तब्ध राहिले व नंतर डोळ्यांत अश्रु आणून भरल्या गळयाने म्हणाले, वा, त्या महात्म्या इंद्रद्युम्नाला मी कसा विसरेन? त्याच्या यज्ञीय अग्निचितीजवळ मी कितीदा बसलो असेन आणि त्याने दक्षिणा दिलेल्या असंख्य गाईच्या खुरांनी व दान करताना सोडलेल्या पाण्याने तर हे तळे उत्पन्न झालेले आहे. कासव हे म्हणतो न म्हणतो तोच स्वर्गातून देवांचे विमान येऊन राजाला परत स्वर्गात घेऊन गेले.

व्यक्तीच्या जीवनक्रमात व्यक्तिमत्वाच्या विकासाचे जे तत्त्व तेच संस्कृतीच्या एकतेचे तत्व. जन्माला आल्यापासून व्यक्ति सारखी वाढत व बदलत असते. चुका, अडमुठेपणा, बावळटपणा सारखा हातून होत असतो.लहानपणी व तारूण्यात

हातून जे जे घडत असते ते ते त्यावेळी योग्यच वाटते; पण सिंहावलोकनांत त्या अनुभूती कोत्या वाटतात. पण मोठ्या माणसाने वर्तन व विचार आणि व्यक्तिमत्व त्या सर्व पूर्वानुभूतीशी निगडीत असते. लहानपणी अमक्या दिवशी असा गाढवपणा केला तो मीच; परीक्षा पास होण्यासाठी मारुतीला खडीसाखर बोलणारा मीच, एका मूर्ख पोरीपायी जीव द्यावयाला निघणारा मीच, निरनिराळे मनोरथ रचणारा मीच असे शेकडो मी निर्माण होतात, विलीन होतात, प्रगल्भित होतात. पण ते सर्व एका मीच्या व्यक्तिमत्वांत सामावलेले असतात.

जेव्हा ह्या निरनिराळ्या मींची विसंगति अनिवार होते, तेव्हा व्यक्तीचे एकत्व नष्ट होऊन- जेकिल-हाइडसारखी अवस्था होते. व्यक्तीमत्वाच्या अखंडिततेच्याबद्दलही आपल्या वाङ्‌मयांतून काही कथा सापडतात. मित्रसह हा सूर्यवंशातील एक सदाचरणी सत्वशील राजा होता. त्याची कांही चूक नसता त्याचे हातून अपराध घडला म्हणून शापामुळे तो नरभक्षक राक्षस झाला व ज्या गुरुने आकसाने शाप दिला त्या वरिष्ठाच्या मुलांनाच त्याने खाऊन टाकले, अशी एक कथा आहे. व्यक्तिमत्त्वाच्या एकात्मेचे सूत्र कशा तऱ्हेने ताणले तर खंडते ह्याचे ही कथा एक उत्कृष्ट उदाहरण आहे. ह्याही पेक्षा सरस उदाहरण म्हणजे भारतातील अंबेची कथा. काशी राजकन्या अंबा शाल्वाधिपतीवर प्रेम करीत होती. ती व तिच्या बहिणी ह्यांचे स्वंयवर होते, तेव्हा शाल्वाला तिने माळ घालण्याचे ठरवले. पण तिच्या दुर्दैवाने भीष्माने तिचे हरण केले. इतकेच नाही, तर त्यावेळच्या प्रघाताप्रमाणे तिच्याशी स्वत: लग्न न करता आपल्या दुर्बल व क्षयी भावाशी तिचे लग्न करण्याचा घाट घातला. भीष्माची करुणा भाकून अंबा शाल्वाकडे परत गेली पण त्या नादानानेही तिचा अव्हेर केला व भग्नहृदय अंबेने स्वत:ला जाळून घेतले. यौवनाच्या देहलीवर प्रणयाची स्वप्ने रंगवणारी अंबा मेली व ज्याचे जीवितकार्य केवळ सूड आहे, ज्याला पुरुषत्व वा स्त्रीत्वही नाही, जो नुसता सूडाचा अविष्कार, अशा शिखंडीच्या रुपाने ती जन्मास आली. व्यक्तिमत्वाची परंपरा पूर्णपणे खंडली; इतकी की नुसते मनच नाही तर शरीरही त्यासाठी निराळे घ्यावे लागले. संस्कृतीच्या इतिहासात अंबेला तोड नाही. मित्रसहसदृश उदाहरणे मात्र पुष्कळ आहेत.

भारतीय संस्कृतीत हे अनुस्मरण व अनुकरण-ही ममत्वाची भावना- आजतागायत शिल्लक आहे म्हणून ती संस्कृति एक आहे. ह्या उलट खंडित परंपरेची उदाहरणेही जगाच्या इतिहासात पुष्कळ आहेत. नील नदीच्या काठी प्राचीन काळी एक समृद्ध संस्कृती सारखी उत्क्रांत होत होती. ही संस्कृती सतत सहा हजार वर्षे अखंडित टिकली. राज्यकारभारांत उलथापालथी कितीदा झाल्या, हायक्सॉस, ग्रीक, रोमन वगैरे परकीय लोकांनी तेथे राज्य केले पण संस्कृती खंडित झाली नाही. पण आठव्या नवव्या शतकांत मुसलमान राज्यकर्त्यांच्या ताब्यांत हा देश गेल्याबरोबर संस्कृतीची परंपरा पूर्णतया तुटली. भूमि तीच, लोक रक्ताने बऱ्हंशी पहिल्यासारखेच, पण समाजजीवन व मूल्ये मात्र सर्वस्वी भिन्न अशी स्थिति आज आहे. भाषा पूर्वीची नाही-धर्म पूर्वीचा नाही-पूर्वीच्या संस्कृतीबद्दल काडीमात्र ममत्व नाही, अशी परिस्थिति आज तेथे आहे. मिसरी संस्कृतीचा इतिहास म्हणून एका पुस्तकांत आजतागायचे वृत्त लिहिता येईल. देश एक, पुस्तक एक, पण कथा एका संस्कृतीची खासच नव्हे.

भारतीय संस्कृती व महाराष्ट्रीय संस्कृती

भारतीय संस्कृती ह्या दृष्टीने खंडित नाही; मधले काही दुवे जरी झिजले असले तरी परंपरा नष्ट झाली नाही. भारतीय संस्कृती ही इतर संस्कृतीच्या संघर्षाने व साहचर्याने निर्माण झालेली आहे. त्यापैकीच एक प्रादेशिक संस्कृती म्हणजे महाराष्ट्रीय संस्कृती. ह्या संस्कृतीला भारतीय संस्कृतीचे पाठबळ आहे. भारताच्या इतिहासशिवाय ती कळणारही नाही. त्याचप्रमाणे तिचे आयुष्य शेजारच्या प्रादेशिक संस्कृतीशी निगडीत आहे. पण एकाच घराण्यातील व्यक्तींना जे व्यक्तिमत्त्व असते ते तिलाही आहे आणि ते समजून घेण्याचा आजचा प्रयत्न आहे.

प्रादेशिक संस्कृतीच्या अभ्यासकाला लवकरच आढळून येते की, प्रादेशिक मर्यादेबाहेर गेल्याखेरीज स्वत:च्या राष्ट्राच्या संस्कृतीचे स्वरूप नीट कळून येत नाही. गंगेच्या खोऱ्यांतील लोकांची कुटुंबसंस्था, कर्नाटकांतील कुटुंबसंस्था, महाभारतात आढळून येणारी कुटुंबसंस्था ह्यांचे जेव्हा थोडेतरी आकलन झाले, तेव्हा महाराष्ट्रांतील कुटुंबसंस्थेचे इंगित मला काही अंशाने तरी कळले. महाराष्ट्राच्या माणसांचे शरीरदृष्टया वर्गीकरण करतांना गुजराथ, उत्तरप्रदेश, तेलंगण व कर्नाटक वगैरे प्रांतातील लोकांचे वर्गीकरण करणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे जगांतील निरनिराळ्या मनुष्यवंशांचे ज्ञान होणे अत्यावश्यक आहे. अश्मयुगाचा महाराष्ट्राचा इतिहास जाणावयाचा असेल तर महाराष्ट्राबाहेरच्या चारी दिशांना भटकले पाहिजे. कधी कधी आपल्या स्वत:च्या प्रदेशांत हवे ते सापडत नाही पण बाहेरच्या प्रदेशांतील संशोधनाने घरच्या संशोधनास मदत होते. त्यामुळे एखादी संशोधन संस्था पुण्यास - महाराष्ट्रात-असूनही तेथले लोक महाराष्ट्राच्या बाहेर संशोधन करतात म्हणून त्यांच्याविरूद्ध गवगवा करण्याने त्या माणसांचे किंवा संस्थेचेच नुकसान होते असे नाही तर संशोधनकार्याचेही नुकसान होते. त्यांतूनही भाषा, इतिहास, समाजशास्त्र, प्राचीन संस्कृतीच्या-विशेषत: अश्मयुगाच्या-संशोधनाचे शास्त्र हे विषयच असे आहेत की, ते सर्वस्वी प्रादेशिक राहू शकत नाहीत.

आम्ही प्रादेशिक तत्त्वावर देशविभागणी मागतो व आमच्या संस्कृतीचे संशोधन करतो ते आमच्याभोवती तारेचे कुंपण बांधण्यासाठी नसून, शेजारी-शेजारी म्हणून सुखांत नांदून स्पर्धा व वैरभाव टाळून एकमेकांच्या साहाय्याने सर्व भारताचे सांस्कृतिक जीवन समृद्ध करण्यासाठीच होय. महाराष्ट्राची संस्कृती अभ्यासणे म्हणजे आत्मशोधन आहे. परद्वेष नव्हे. भारतीय राष्ट्रसंघाच्या एकत्र कुटुंबातील संबंध सुलभ व सुखावह करण्यासाठी प्रादेशिक संस्कृतीप्रमाणे राष्ट्रसीमा आखून द्याव्यात असा आमचा आग्रह आहे. ह्याउपर हेतुविपर्यास करणारा बुद्धि पुर:सर तसे करीत असेल तर अशांची समजूत घालणे अशक्य म्हणून तो नाद सोडून देऊन आपले कार्य आपण करीत राहिले पाहिजे.

संस्कृती म्हणजे काय-तिचे रुप काय-तिची निर्मिती कशी होते ह्याची कल्पना आपल्याला थोडक्यात दिली. कुठच्याही संस्कृतीचे स्वरूप काय हे समजून घ्यायचे तर ती कुठच्या भूमीत रुजली, त्या भूमीचे वैशिष्ट्य काय हे समजून घ्यावे लागते. कारण मनुष्याच्या जीवनाला आधारभूत ही भूतधारिणी पृथ्वी आहे. ती ज्या तऱ्हेचे अन्नवस्त्र देईल त्यावर बऱ्याच अंशाने-निदान प्राथमिक अवस्थेत-मनुष्याचे दैनंदिन जीवन अवलंबून असते. ती भूमि दळणवळणाच्या वाटेवर, प्रवासाला सुखावह

आहे की जगाच्या कानाकोपऱ्यात पडलेली, दुर्गम अशी आहे हेही पाहणे फार आवश्यक आहे. संस्कृती ही मनुष्याची सामाजिक निर्मिती आहे व निरनिराळ्या मानवसमाजांच्या संघर्षाने व सहजीवनाने तिचा नाश वा विकास होत असतो हे समजले म्हणजे ज्या भूमीवर संस्कृती रूजते त्या भूमीचे रुप समजणे अत्यावश्यक आहे हे उघडच आहे. त्याचप्रमाणे संस्कृतीला जरी व्यक्ती-निरपेक्ष असे काही स्वतंत्र जीवन असले तरी संस्कृतीचे निर्माते, उपभोक्ते, संवर्धक माणसेच असल्यामुळे ज्या संस्कृतीचा अभ्यास करावयाचा ती कोणत्या माणसांनी पाळली, लालन केली, वाढविली तेही अभ्यासले पाहिजे. त्यानंतर त्या संस्कृतीची अंगोपांगे- समाजसंस्था, भाषा, वाङ्:मय धर्म काय आहेत असे पाहिले म्हणजे त्याचे स्वरूप ऐतिहासिक अभ्यासशिवाय समजणे शक्य नाही हे ध्यानांत येईलच याप्रमाणे ह्या सर्वांचा सांगोपांग अभ्यास केल्याशिवाय त्याचे यथार्थ विवेचन करता यावयाचे नाही. ह्यावरून आपण माझ्यावर केवढी बिकट जबाबदारी टाकली आहे हे लक्षांत घ्या. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे स्वरुप संपूर्णतया दाखवणे मला शक्य होईलसे दिसत नाही; पण त्या प्रांतांतील एक क्षुद्र प्रवासी म्हणून मला ज्ञात झालेले विभाग मी शक्यतो आपणांस दाखवीन, त्यायोगे माझ्या पुढच्या पिढीतील जिज्ञासूंना मार्गदर्शन होईल व ज्या प्रदेशांत मला शिरता आले नाही ते त्यांना सुलभ होऊन ते धडाडीने व आत्मविश्वाने पुढे जातील अशी आशा बाळगून मी भीतभीत पण आपल्या सहानुभूतीवर व चांगुलपणावर विसंबून हा विषय हाती घेतला आहे.

(मराठी लोकांची संस्कृति - इरावती कर्वे, आवृत्ति १९५१ मधून साभार)


निवेदन

(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

१. प्रकाशन स्थळ : ६४, आनंद पार्क, पुणे - ४११ ००७.

२. प्रकाशन काळ : त्रैमासिक

३. मुद्रक, प्रकाशक,

संपादक : रामचंद्र केशव मुटाटकर

राष्ट्रीयत्व : भारतीय

पत्ता : ६४, आनंद पार्क, पुणे - ४११ ००७.

४. स्वामीत्व : महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

मी, रा.के. मुटाटकर जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीनुसार खरा आहे.

३१ जानेवारी २००६ रा. के. मुटाटकर

प्रकाशक




## हाकारा अंक सूची

१९८० - १. जबरन जोत जंगल जमीन २. आदिवासी व शिक्षण
३. आदिवासी वनसंवर्धन ४. आदिवासी साहित्य व कला

१९८१ - १. दलितांना सवलती व राखीव जागा
२. आदिवासी व आरोग्य ३. वनशेती व संवर्धन
४. रोजगार हमी योजना

१९८२ - १. धरणे व विकास २. धरणे व विकास
३-४. जंगल व्यवस्थापन

१९८३ - १. आदिवासी व दारु
२.आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी
३. प्रा. सरदार गौरव अंक
४. आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न

१९८४ - १-२ आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य
३. आदिवासी स्त्री ४. आदिवासी आरोग्य व शिक्षण

१९८५ - १. आदिवासी संघटन २. जमीन हस्तांतर
३. आदिवासी महिला ४. आदिवासी व सरकार

१९८६ - १. जंगल व धरण २. आदिवासी कला
३. आदिवासी व वेठबिगारी
४. आदिवासीविषयक ग्रंथ : मानवशास्त्र परिचय

१९८७ - १. भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
२. आदिवासी आणी सांस्कृतिक बदल
३-४. राष्ट्रीय वननितीचा प्रश्न

१९८८ - १. सवलती अपहरणाची समस्या
२. आदिवासी साहित्य
३-४. आदिवासी समाज व संस्कृती

१९८९ - १-२. डॉ. वेरिअर एल्विन विशेषांक
३-४. व्यवसाय मार्गदर्शन

१९९० - १-२. महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
३. जागतिक आदिवासी
४. गं. बा. सरदार स्मृति विशेषांक

१९९१ - १. आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक
२. आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या
३. आदिवासी जिवन व संस्कृती

१९९२ - १-२. आदिवासी समाज जीवन
३-४. अनुताई वाघ विशेषांक

१९९३ - १-२. आदिवासी धर्म, सण व उत्सव
३-४. धरण - विस्थापन व पुनर्वसन

१९९४ - १. आदिवासी संस्कृती
२. आदिवासी एकता परिषद
३. आदिवासी विकासाची सैध्दांतिक भुमिका
४. आदिवासी जमाती

१९९५ - १-२. राणीपूर अभ्यास विशेषांक
३. कुपोषण विशेषांक ४. पर्यावरण विशेषांक

१९९६ - १. आदिवासी जमाती
२. महाराष्ट्र, ओरिसा आदिवासी अध्ययन
३. आदिवासी जमाती
४. आदिवासी शिक्षण

१९९७ - १-२. वारली लोकगिते व बोलीभाषा
३. पंचायत राज विशेषांक
४. साहित्य संमेलन विशेषांक

१९९८ - १. वृक्ष लागवड व संवर्धन विशेषांक
२. आदिवासी व प्रशासन
३-४. आदिवासी समाज व संस्कृती

१९९९ - १. आदिवासी व आर्थिक धोरण
२. आदिवासी विकास व संस्कृती
३-४. बोर्डी परिसर अभ्यास

२००० - १. आदिवासी जीवन, कला व मराठी साहित्य
२. स्त्रिया आणि आरोग्य
३. पाणी टंचाई आणी पाणलोट विकास
४. आदिवासी जीवन व संस्कृती

२००१ - १-२. अस्मिता व विकास विशेषांक
३. आदिवासी समाज व शासन
४. अस्मिता व विकास : दिशा २००१

२००२ - १. आदिवासी व उपेक्षित समाज : अस्मिता आणी विकास
२-३. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : महाराष्ट्र
४. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प :
पर्यायी उपाययोजना

२००३ - १-२. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : मध्यप्रदेश
३. आदिवासी समाज ४. आदिवासी संस्कृती

२००४ - १. पुस्तक परिचय २. ?
३-४ आदिवासी विकास धोरण

२००५ - १. प्रस्तावित वनकायदा
२. डॉ. बानू कोयाजी स्मृती विशेषांक
३ -४ आरोग्य व्यवस्था व शिक्षण - नंदूरबार अभ्यास

# पुणे विद्यापीठ
## समाजशास्त्र व मानवशास्त्र विभाग
### १९६१-६२



खुर्चीवर बसलेले : (डावीकडून तिसरे) प्रा. राजकुमार गुलाटी, प्रा. विद्याधर पुंडलिक
प्रा. य.भा. दामले, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, कुलगुरु, पुणे विद्यापीठ
डॉ. इरावती कर्वे, विभागप्रमुख, समाजशास्त्र व मानवशास्त्र विभाग,
प्रा. रा. के. मुटाटकर (उजवीकडून चौथे)